**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११३४
निर्णय दिनांक १८-०८-२००९

१. श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक,पुणे-१
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
मध्यवर्ती इमारत,पुणे-१
विद्यमान जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता,
एकात्मिकृत घटक,पुणे-१.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि.१४.०८.२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रासोबत अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दि.१९.०५.२००९ रोजीचे एक पत्र जोडले आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेल्या दि. १९.०५.२००९ रोजीच्या पत्रामध्ये, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी त्यांच्या दि.०७.१२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याचे व प्राप्त माहितीबद्दल त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे अपिलार्थीने कबूल केले आहे आणि या

पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्यात यावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने व खुद्द अपिलार्थीने त्यांचेआयोगाकडे विचाराधीन असलेले अपील निकाली काढण्याची विनंती केली असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.११३४/०८, दि.२६.०५.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मनिष भगवानदास अग्रवाल,ए-५१,नाथनगर,सिंधी कॉलनीच्या मागे,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत घटक,पुणे-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,पुणे-१ यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११४३
निर्णय दिनांक १८-०८-२००९

१. श्री. विष्णू महादेव आंधळे, : अपिलार्थी
मु.मरळवाडी,पो.मांडवा,ता.परळी (वै.), जि. बीड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, परळी वैजनाथ,जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,ग्रामपंचायत, मरळवाडी, ता. परळी वैजनाथ, जि.बीड.

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ,जि.बीड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे दि.१७.०८.२००९ रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दि. ०७.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती

त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून, प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले आहे. त्यामुळे विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती त्यांनी या अर्जामध्ये आयोगास केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडील विचाराधीन अपील रद्द करण्याची विनंती केली असल्याने, अपिलार्थीची विनंती मान्य करण्यात येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.११४३/०८, दि.११.०६.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विष्णू महादेव आंधळे,मु.मरळवाडी,पो.मांडवा,ता.परळी (वै.), जि. बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत, मरळवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, परळी वैजनाथ,जि.बीड यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११३३
निर्णय दिनांक १८-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दादासाहेब सोनाजीराव पठाडे,<br>पैठण,जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद, पैठण,जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०८.२००७ रोजी नोंदविलेले व दि.१७.०६.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५.०४.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगर परिषद, पैठणच्या कार्यक्षेत्रातील बांधकाम परवान्यासंदर्भात एकूण सहा मुद्यांद्वारे जानेवारी, २००३ ते मार्च, २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२२.०५.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०७.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही व या माहितीची त्यांना अत्यंत आवश्यकता आहे. अपिलार्थीच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि.१५.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होती. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही.एवढेच नव्हेतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.०७.२००७ रोजी दिलेल्या निर्णयाचे देखील त्यांनी अद्यापपावेतो पालन केलेले नाही. त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली किंवा कसे हे ही आयोगास त्यांच्या अनुपस्थितीमुळे कळण्यास मार्ग नाही. मात्र या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन व अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे

पालन न करुन स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक कर्मचारी, ज्यांना अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे सर्वजण या प्रकरणी एकत्रितपणे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न होण्यासाठी जबाबदार ठरत आहेत . सबब उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधित सहायक कर्मचारी यांनी, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यासाठी जन माहिती अधिकारी व त्यांचे संबंधित सहायक कर्मचारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य टपालाद्वारे पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व या प्रकरणाच्या संदर्भातील त्यांचे सहायक कर्मचारी यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकत्रित एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.दादासाहेब सोनाजीराव पठाडे, 'आशिर्वाद निवास', स्वराज ॲटोजवळ, माधवनगर, पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाव्दारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११३५
निर्णय दिनांक १८-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शाह शेख रहीम पिता शाह शेख इमाम कादरी शाह,<br>रा.नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा वक्फ अधिकारी,नांदेड | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,औरंगाबाद | | |

### निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दि.२४.१२.२००७ रोजीच्या त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे माहिती मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२५.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या या प्रकरणाची कोणतीही सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबित ठेवल्या कारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४.१२.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ

अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वजिराबाद, नांदेड येथील मस्जिदीच्या कार्यकारिणीबाबत, जमाखर्चाचा गोषवारा व बांधकामास सक्षम अधिकाऱ्याकडून घेतलेल्या परवानगीबाबत, वक्फ ॲक्ट १९५४ नुसार कार्यकारिणीच्या स्थापनेपासून सन २००६-०७ पर्यंतच्या कालावधीची काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२५.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्यामुळे अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, या मस्जिदच्या सर्व मिळकती पूर्वी त्यांच्या ताब्यात होत्या. तथापि ही मस्जिद सध्या ज्या व्यवस्थापनाच्या ताब्यात आहे, त्यांनी अपिलार्थीच्या मिळकतीची परस्पर विक्री केली,व या सर्व प्रकरणाची माहिती अपिलार्थीच्या मिळकतीशी संबंधित असल्यामुळे त्यांना या माहितीची आवश्यकता आहे. अपिलार्थीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी, वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी,वक्फ बोर्ड,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी नांदेड यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शाह शेख रहीम पिता शाह शेख इमाम कादरी, गल्ली नं.१, पिरबुऱ्हाणनगर,नांदेड-४३१६०५.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११३७
निर्णय दिनांक १८-०८-२००९

१. श्री. संजय सोपानराव गायकवाड, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (पुरवठा विभाग),
तहसील कार्यालय, मुदखेड,जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, मुदखेड, जि.नांदेड

त्रयस्थ पक्ष : अब्दुल हमीद अब्दुल नबी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ३१.०३.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे माहिती मागितली असता, ती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत न दिल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, सदर प्रकरण जन अपिलीय अधिकारी यांनी प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे - मुदखेड तालुक्यातील त्रयस्थ पक्ष तथा अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. अब्दुल हमीद अब्दुल नबी परवाना क्र.२८/९८ यांना शासनाकडून मिळणाऱ्या रॉकेलच्या के.एल. प्रमाणे त्यांचे स्टॉक रजिस्टर व त्यांना वाटप केलेल्या रजिस्टरच्या सत्यप्रती, तसेच त्यांनी वाटप केलेल्या रॉकेल वाटप बील पुस्तिकेच्या सत्यप्रती, तसेच पुरवठा निरीक्षक यांनी केलेल्या मासिक तपासणी अहवालाच्या सत्यप्रती व शासनाकडून दिल्या गेलेल्या रॉकेल टँकरच्या पोचपावत्यांच्या सत्यप्रती - ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सन २००२ ते २००७ या कालावधीशी संबंधित होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, श्री. अ.हमीद अ.नबी,अर्धघाऊक रॉकेल विक्रेता यांच्याकडून मागविण्यात येत असून संबंधिताकडून माहिती हस्तगत करुन ती अपिलार्थीस देण्यासाठी वेळ लागेल, असे अपिलार्थीस अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०१.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केलेले द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी प्रभारी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे. तथापि ती माहिती घेऊन जाण्यासाठी अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित न राहिल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. तसेच अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाकडील जी माहिती मागविली आहे त्या माहितीशी संबंधित अभिलेख्यांची चोरी झाली असून यासंदर्भात त्रयस्थ पक्षाने

पोलीसांकडे केलेल्या त्यांच्याकडील दि. ३०.०१.२००८ रोजी केलेल्या फिर्यादीची प्रत (एफ.आय.आर.)क्र. ११७९३८ त्यांना अपिलार्थीस देता येईल.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती ही त्रयस्थ पक्षाकडे उपलब्ध नव्हती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी पुरवठा निरीक्षक यांनी तपासणी केलेल्या मासिक पाहणी अहवालाच्या सत्यप्रती व शासनाकडून दिले गेलेले रॉकेल व पुरवठा ही माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडे जीवनावश्यक वस्तुच्या वितरण पध्दतीचे अवलोकन करता, उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ०२.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सरसकट माहिती अपिलार्थीस देण्यासाठी वेळ लागेल, असे अपिलार्थीस कळविले. त्रयस्थ पक्षाकडील माहिती चोरीला गेल्याचे जन माहिती अधिकारी यांना समजल्यानंतर त्यांनी याप्रकरणी त्यांच्याकडील माहिती व त्रयस्थ पक्षाने पोलीसांकडे नोंदविलेल्या एफ.आय.आर.ची प्रत, ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी कोणतेही सकारात्मक प्रयत्न केले नाहीत व अपिलार्थी हे त्यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वत: येतील, या अपेक्षेने त्यांनी अपिलार्थीस माहिती पुरविली नाही. वास्तविक अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे माहिती मागितली असताना, अपिलार्थी ही माहिती घेऊन जाण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जातील, अशाप्रकारची जन माहिती अधिकारी यांनी अपेक्षा करणे सर्वथा गैर व चुकीचे आहे. यातून एकच अर्थ निघतो तो असा की संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्जच मूळात नीट वाचलेला नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या एकूण वर्तनातून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभावच स्पष्ट होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत करुन दिलेल्या माहितीवरुन, त्यावेळी श्री. ए.डी.जोशी यांच्याकडे नायब तहसीलदार तथा जन माहिती अधिकारी या पदाचा कार्यभार होता. तथापि ते आता नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्यामुळे

त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईसंदर्भात आयोग कोणतेही आदेश देत नाही. मात्र सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी इ:तपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील,त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित माहिती त्यांनी, अपिलार्थीस, त्रयस्थ पक्षाने दाखल केलेल्या एफ.आय.आर.च्या प्रतीसह, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. संजय सोपानराव गायकवाड,रा.'श्रध्दा निवास', सिध्दार्थ हॉस्टेलमागे, लालवाडी,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा विभाग),तहसील कार्यालय, मुदखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुदखेड,जि.नांदेड यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११३९
निर्णय दिनांक १८-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सोनवणे सुधाकर आनंदा,<br>ता.शिरुर (कासार),जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी,<br>पंचायत समिती, शिरुर (कासार),जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद,बीड | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०३.२००८ रोजी आपले आदेश पारित केले परंतु त्यामध्ये अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश न दिल्यामुळे त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे व आपल्या मूळ अर्जातील विनामूल्य माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७.०१.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित जानेवारी, २००२ ते

डिसेंबर २००७ या कालावधीतील शिरुर तालुक्यात सर्व शिक्षा अभियान, शालेय शिक्षण, पोषण आहार, शिष्यवृत्ती, शालेय बांधकाम, शाळा दुरुस्तीच्या संदर्भात एकूण १५ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली असून या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २५.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे कळवून व त्याचबरोबर यातील जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही, ती संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून अपिलार्थीस घेण्याचे सूचित केले व त्याचबरोबर अपिलार्थीस माहितीच्या छायाप्रती देण्यासाठी त्यांच्याकडे आकस्मिक खर्चासाठी निधी उपलब्ध नसल्याचेही त्यांनी या पत्राद्वारे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०३.२००८ रोजी आपले आदेश पारित करुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने व ती पुरविण्यासाठी आर्थिक तरतुद उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस माहितीचे अवलोकन करण्याची विनंती करावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१३ व १५ वगळता उर्वरित माहिती तयार आहे. मुद्दा क्र. १३ व मुद्दा क्र.१५

च्या संदर्भातील माहिती जिल्हा परिषदेच्या संबंधित शाळांकडे उपलब्ध आहे. अपिलार्थीचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याच्या प्रमाणपत्रामध्ये अपिलार्थी सन १९९७-९८ च्या सर्वेक्षण यादीतील व्यक्ती असल्याचे दिसून येत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्र.१३ व १५ द्वारे विचारलेली माहिती संबंधित शाळेकडे उपलब्ध असल्याने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) मधील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठवून त्याची प्रत अपिलार्थीस देणे भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ती अपिलार्थीस तपासणीसाठी ते उपलब्ध करुन देण्यासाठी तयार आहेत. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या प्रती का उपलब्ध करुन देऊ शकत नाहीत असे आयोगाने जन माहिती अधिकारी यांना विचारल्यानंतर त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत प्रमाणात असून ती माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे आर्थिक तरतुद नाही. जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद लक्षात घेता, अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून तपासणीसाठी प्रथम पाहून घ्यावी. या माहितीतील ज्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस हव्या आहेत त्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये तात्काळ व विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात व तसेच जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१३ व १५ च्या संदर्भातील माहिती जिल्हा परिषदेच्या

शाळांकडे उपलब्ध असते, असे आयोगास अवगत केले आहे. यासंदर्भात त्यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १३ व १५ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्या चुकीमुळे अपिलार्थीस प्राप्त होऊ न शकल्यामुळे ही माहिती त्यांना आता संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना येथे असे सूचित करण्यात येते की,अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याच्या दृष्टीने त्यांनी जन माहिती अधिकारी यांना आवश्यक ते अनुदान उपलब्ध करुन द्यावे, जेणेकरुन जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीमध्ये विनामूल्य उपलब्ध करुन देऊ शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सोनवणे सुधाकर आनंदा,मु. तागडगांव, ता.शिरुर (कासार),जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती, शिरुर (कासार),जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ),जिल्हा परिषद,बीड यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११४०
निर्णय दिनांक १८-०८-२००९

१. श्री. सुनील रघुनाथ जगताप, अंबाजोगाई,जि.बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, तहसील, अंबाजोगाई, जि.बीड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२.०१.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात दि. ०१.०४.२००० ते दि.३१.०३.२००७ या कालावधीमध्ये दाखल झालेल्या विविध बांधकामाच्या एन.ए.प्रकरणासंदर्भात काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामधील एन.ए.प्रकरणाच्या नोंद रजिस्टरच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती व अपिलार्थीने नमूद केलेल्या एकूण बारा एन.ए.प्रकरणाच्या संदर्भातील संचिकेच्या दस्तऐवजाच्या (पुराव्यासाठी देण्यात आलेल्या कागदपत्रांच्या) झेरॉक्स प्रती, यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २९.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ही माहिती अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातून विनामूल्य घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र स्वीकारण्यास अपिलार्थीने नकार दिला. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले पत्र स्वीकारण्यास नकार दिल्याच्या घटनेच्या संदर्भात संबंधित शिपायाने गावाच्या पोलीस पाटलाच्या उपस्थितीत पंचनामा केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ११.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.०३.२००८ रोजी आपला निर्णय देऊन अपिलार्थीस दोन दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देऊ केली. तथापि अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले. तदनंतर आयोगाकडील नोटीस

त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परत एकदा दि. १३.०८.२००९ रोजी अपिलार्थीस शिपायामार्फत पाठविली असता, अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्याचे नाकारले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून ते ही माहिती विनामूल्य पुरवण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर, या अर्जासंदर्भातील पुढील सर्व घडामोडी ज्ञात करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्त्व अर्जदाराचे असते. याप्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत. त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात तयार आहे व ती केव्हाही उपलब्ध होऊ शकेल, असे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्याकडील दि.२९.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळविले व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०८.२००९ रोजी देखील अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न केले. मात्र अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करुनही ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वीकारण्यास नकार दिला.जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस देऊ केलेली माहिती आयोगास दाखविली, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी माहिती देऊ केली असताना देखील अपिलार्थीने माहिती न स्वीकारुन व आपले उत्तरदायित्त्व अधिनियमातील तरतुदीप्रमाणे न पाळल्याने, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच

जबाबदार असल्याचे आढळून आल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १८-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुनिल रघुनाथ जगताप, रा. संघर्षनगर (वडारवाडा), रेस्ट हाऊसजवळ, अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७५०
निर्णय दिनांक १८-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. पुनमचंद रुपचंद चव्हाण,<br>ता.जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>बदनापूर,जि.जालना | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषि अधिकारी,<br>जालना | | |

विद्यमान जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,
बदनापूर,जि.जालना

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी,
बदनापूर,जि.जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०७.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६.०३.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील एकूण ३९ गट नंबरामधील

जमिनीत त्यांच्या कार्यालयाने केलेल्या मातीनाला बांधकामाच्या कामावरील मजूरांची नावे, लिहिलेल्या हजेरीपटाच्या तसेच मोजमापपुस्तिकांच्या छायाप्रतीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१०.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसाठीच्या अर्जातील माहिती अपिलार्थीस कोणत्या कामाच्यासंदर्भात हवी आहे, याचा नेमका बोध होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले व स्वयंस्पष्ट पत्रव्यवहार करुन माहिती मागण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२६.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०६.२००७ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या अभिप्रायाशी सहमती दर्शवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली व त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याककडून माहिती प्राप्त न झाल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, त्यांच्या कार्यालयातर्फे एका गट क्रमांकात अनेक वॉटरशेडची कामे घेतली जातात. तथापि अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये वॉटरशेडचा निश्चित उल्लेख केला नसल्याने त्यांना अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविता आली नाही. तसेच त्यांच्या दि. १०.०४.२००७ रोजीच्या पत्रास अपिलार्थीने कोणतेही उत्तर न दिल्याने त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिलेली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यापक प्रमाणात माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने त्यांना निश्चित कामासंदर्भात माहिती मागितली नाही. त्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता अपिलार्थीने गावाचे नाव, गट क्रमांक व या गट क्रमांकातील मातीनाला बंधाऱ्याची कामे असा स्पष्ट उल्लेख केल्याचे दिसून येते. समजा एखाद्या गट क्रमांकामध्ये जर मातीनाला बंधाऱ्याची काही कामे केली असतील तर त्या कामांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे कशाप्रकारे संबोधण्यात येते अथवा त्यांना कशाप्रकारे क्रमांक दिला जातो याची माहिती अपिलार्थीस असणे येथे अपेक्षित नाही. अपिलार्थीने एखाद्या गट क्रमांकामधील मातीनाला बंधाऱ्याच्या कामासंदर्भात माहिती मागविली आहे याचा अर्थ गट क्रमांकामधील सर्व मातीनाला बंधाऱ्यांच्या कामाबाबत अपिलार्थीस माहिती आवश्यक आहे, असा होतो. सबब जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीने त्यांच्याकडे नेमक्या माहितीची मागणी केली नाही हा युक्तिवाद, अमान्य करण्यात येऊन त्यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १८-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पुनमचंद रुपचंद चव्हाण, मु.गावंदरी तांडा, पो.जटवाडा,ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, बदनापूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बदनापूर,जि.जालना यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११४१
निर्णय दिनांक १८-०८-२००९

१. श्री. गणेश साहेबराव लांडगे, माजलगाव,जि.बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, माजलगाव, जि.बीड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव, जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२.११.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड व माजलगाव गोदामात शासनाकडून धान्याचे ट्रक न येता परस्पर खुल्या बाजारात विक्री होत असल्याबाबत या विषयावर एकूण चार मुद्यांद्वारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - माजलगाव व दिंद्रुड या दोन्ही शासकीय गोदामात दरमहा किती मेट्रीक टन धान्य येते, या गोदामावर माहे एप्रिल, २००७ ते माहे सप्टेंबर, २००७ या सहा महिन्याच्या धान्य नियतनाची प्रत तसेच नियतनानुसार वेळोवेळी प्राप्त धान्याच्या

T.P.(Transport Permission) च्या सहा महिन्याच्या झेरॉक्स प्रती, माहे एप्रिल,२००७ ते सप्टेंबर, २००७ या सहा महिन्यात दोन्ही गोदामात धान्य प्राप्त झाल्यानंतर त्या धान्याची विविध नोंदवहयात घेण्यात आलेल्या नोंदीच्या रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती, दोन्ही गोदामास विविध योजनेखाली धान्य येते त्या योजनांची लेखी माहिती व शासनाच्या जी.आर.ची प्रत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाद्वारे अपेक्षिली होती व त्यांनी त्यांच्या मूळ अर्जामध्ये आवश्यक असलेल्या माहितीशी संबंधित कालावधी, "१५ दिवसांच्या आत" असा दर्शविला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०५.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी कोणते आदेश दिले, हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी अथवा त्यांचा कोणताही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे त्या कालावधीचा निश्चित उल्लेख त्यांनी या अर्जामध्ये केलेला नाही व त्यामुळे

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित मुद्दा क्र.२ ते ४ शी संबंधित माहिती ही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने, देय होत आहे. ही माहिती अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना अवघड वाटावे, किंवा ती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याची कोणतीही शक्यता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी संभवत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली त्यांच्या अर्जातील ( मुद्दा क्र.१ वगळता) संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत टपालाद्वारे व विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक (संबंधित गोदामरक्षक) अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. त्यांचे म्हणणे मांडण्याकरिता त्यांना एक संधी देण्याच्या दृष्टीकोनातून संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सहायक यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास ते जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.२ ते ४च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत टपालाने विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सहायक (संबंधित गोदामरक्षक) या सर्वांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणेश साहेबराव लांडगे,पंचशीलनगर (मंजरथ रोड), माजलगाव, ता.माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, माजलगाव,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११४२
निर्णय दिनांक १८-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. बाबूराव आसरुबा चोरमले,<br>ता.गेवराई, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय, गेवराई, जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, गेवराई, जि.बीड | | |

त्रयस्थ पक्ष: श्री. कचरु साहेबराव पारेकर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची आणि शिस्तभंगाची कार्यवाही करावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. पारेकर कचरु साहेबराव, रा. रेवकी, पो.देवकी, ता.गेवराई यांचे रेशनकार्ड अनुक्रमांक व्ही.पी.३२७७६५ व अर्ज क्र. ९६७१५४ च्या प्रतींची माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १५.०५.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि यासंदर्भात त्यांनी कोणताही निर्णय दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत नाही. तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे इष्ट राहील, असे आयोगास या टप्प्यावर वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि-नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १८-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. बाबूराव आसरुबा चोरमले, रा.रेवकी पो.देवकी,ता.गेवराई,जि.बीड

२. जन माहिती अधिकारी , तहसील कार्यालय,गेवराई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,गेवराई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११४४
निर्णय दिनांक १८-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. हिवराळे गजानन व्यंकटराव,<br>मुखेड,जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>ग्राम पंचायत,थोटवाडी,ता.मुखेड,<br>जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती,मुखेड,जि.नांदेड | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,
ग्रामपंचायत,थोटवाडी,ता.मुखेड,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून,या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. थोटवाडी, ग्रामपंचायतीस सन २००३-२००७ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या अनुदानातून केलेल्या विविध कामांसंदर्भात व्यापक व्याप्तीची माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१०००/- इतके शासन निर्णयाप्रमाणे भरणा करण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या शुल्काचा कुठलाही तपशील पुरविलेला नाही.जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार कोणतीही कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०३.२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना विनामूल्य व त्वरित पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त होऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच या प्रकरणी अपिलार्थीस जन अपिलीय

अधिकारी यांनी आदेशित करुनही कोणतीही माहिती न देऊन, जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांना शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, थोटवाडी,ता.मुखेड,जि.नांदेड श्री. के.जे.मोमीन यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गजानन व्यंकटराव हिवराळे,तालुका सहसचिव,भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन तालुका शाखा मुखेड,फॉरेस्ट ऑफीसजवळ,ता.मुखेड,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, थोटवाडी, ता.मुखेड, जि.नांदेड यांना

या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,मुखेड, ता.मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११३८
निर्णय दिनांक १८-०८-२००९

१. श्री. सुधीर प्रधान, : अपिलार्थी
रा.नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
शहर वाहतुक पोलीस शाखा,नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा पोलीस अधीक्षक,
नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : पोलीस निरीक्षक,
शहर वाहतुक शाखा,नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्याने व तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी न घेतल्याने दंडात्मक कारवाईसाठी त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २९.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड शहरामध्ये जड व इतर वाहनांच्या प्रवेश निर्बंधाबाबतच्या आदेशाच्या आणि नियमावलीच्या दि. ०१.०४.२००७ ते २६.०१.२००८ या कालावधीच्या प्रती शीघ्र टपालाद्वारे मागितल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रतीकरीता माहितीपोटीचे शुल्क रु.३१६२/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१९.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १८.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दि. २९.०१.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दि.१६.०८.२००८ रोजी विनामूल्य पुरविली असून अपिलार्थी हे प्राप्त माहितीवर समाधानी आहेत व यासंदर्भात त्यांची काहीही तक्रार नसल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दि.१६.०८.२००८ रोजीच्या पत्राव्दारे लिहून दिलेले आहे. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी अपिलार्थीचे जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दि. १६.०८.२००८ रोजीचे पत्र आयोगास सादर केले आहे. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी मागणी केलेली माहिती प्राप्त झाल्याची कबूली दिली असल्याचे दिसून येत आहे.

आशाप्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०६.२००८ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर दि. १६.०८.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे या प्रकरणी सिध्द होत असल्याने व तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठी अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीस आवश्यक ती संपूर्ण माहिती

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील क्र.११३८/०८, दि.२६.०६.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १८-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सुधीर प्रधान, सुदर्शन नॅशनल न्यूज चॅनल, मेनरोड,शिवाजीनगर,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,शहर वाहतुक शाखा,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२५

निर्णय दिनांक २४-०८-२००९

१ श्रीमती अलकादेवी लक्ष्मणराव आढाव : अपिलार्थी
पार्वती निवास, लोहार गल्ली, राहुरी, तालुका राहुरी,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
तथा शिक्षणाधिकारी, वेतन पथक, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक,
प्राथमिक, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : सचिव, बालविद्यामंदिर, राहुरी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने ज्या प्रकरणाविषयी त्यांच्याकडे माहितीची मागणी केली त्या प्रकरणाशी संबंधित माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ करुन अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे दंडात्मक

कार्यवाही करावी व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याबाबत आदेश पारीत करावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील बाल विद्या मंदिर राहुरीच्या पगार बिलासंदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

१. बाल विद्या मंदिर, राहुरीचे पगार बिलासोबत जोडलेल्या विद्यामंदिर सेवकांची सह. पत संस्थेच्या पोहच पावत्या (ऑक्टोबर २००७ ते नोव्हेबर २००८).

२. बाल विद्या मंदिर, राहुरीचे नोव्हे ०८ चे पगार बिलाची नक्कल प्रत.

३. शिक्षण उप संचालक (पुणे) यांचे ३/१०/०८ ३/११/०८ चे पत्राप्रमाणे आपण पाठविलेल्या चौकशी अहवालाची नक्कल प्रत.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा दिनांक २१-११-२००८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षतः २६-११-२००८ रोजी प्राप्त झाला. या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती शाळेशी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांच्याशी संबंधित असल्याने ती त्यांच्याकडून परस्पर घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे विनादिनांकाचे प्रथम अपील केले. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०-०३-२००९ रोजी त्यांच्याकडे सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणीसाठी अपिलार्थी या अनुपस्थित राहिल्या होत्या त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०४-२००९ रोजीच्या त्यांच्या कार्यालयाच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी एकूण ११२ रुपये इतक्या रकमेचा कोषागारात भरणा करुन माहिती घेऊन जाण्याचे

सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कारवाई न करता अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी, त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती तयार असून अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्याची विनंती करुन देखील अपिलार्थीने ही माहिती त्यांच्याकडून नेली नाही. अपिलार्थीस ही माहिती ते सशुल्क देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे, तथापि हा प्रतिसाद चुकीचा आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या कार्यालयाच्या वेतन व भविष्य निर्वाह निधी पथकाकडे उपलब्ध असतांना त्यांनी अपिलार्थीस शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडून वेगळयाने माहिती मागविण्याचे सुचविले ही त्यांची कृती सर्वथा गैर व चुकीची आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज प्रथमतः शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे केला होता त्यामुळे वेतन व भविष्य निर्वाह निधी पथकाकडून ही माहिती घेऊन ती अपिलार्थीस शिक्षणाधिकाऱ्यांनी पुरविणे या ठिकाणी अधिनियमातील तरतुदीशी संयुक्तीक राहिले असते तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील जो भाग संबंधित शाळेशी संबधित होता त्या भागापुरती माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी संबंधित शाळेकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे त्यांना अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मधील तरतुदीप्रमाणे अनिवार्य होते.

तथापि त्यांनी अशा प्रकारे अपेक्षित असलेली कारवाई केली नाही व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहिले.अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचा मूळ अर्ज पूर्णतः भरलेला नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीसाठी अपिलार्थी हे अनुपस्थित राहिले आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या पगारातील, संबंधित मुख्याध्यापकाने वजा केलेली रक्कम, आता अपिलार्थीस दोन महिन्यापूर्वी देण्यात आली असून संबंधित मुख्याध्यापकाच्या पगारातून रकमेची वसूली करण्यात आलेली आहे. हे पाहता त्यामुळे अपिलार्थीने ज्या उद्देशाकरिता माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता तो त्यांचा उद्देश सफल झाल्याचे आयोगास दिसून येत आहे. तथापि एवढे होऊनही अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास दिलेला प्रथम प्रतिसाद चुकीचा सिध्द होत असल्याने त्यांना आता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीपासून कोणत्याही असद्‌हेतूने दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील संबधित जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची विनंती आयोग मान्य करत नाही, मात्र येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांना सतर्कतेने कार्यवाही करण्याची सूचना आयोगातर्फे करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती अलकादेवी लक्ष्मणराव आढाव पार्वती निवास, लोहार गल्ली, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, प्राथमिक, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२६

निर्णय दिनांक  २४-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र मुरलीधर शिंदे,<br>मु. पो. मांडवे, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अध्यक्ष / सचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी सेवा संघ,<br>आदर्श प्राथमिक शाळेजवळ, अहिल्यानगर, अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा धर्मादाय आयुक्त, धर्मादाय आयुक्त कार्यालय,<br>अहमदनगर | : प्रतिवादी |

प्रत्यक्षतः  जन अपिलीय अधिकारी  :  सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे अध्यक्ष /

सचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी सेवा संघ, अहमदनगर यांना उद्देशून त्यांच्या कार्यालयाशी संबधित सन १९९१ ते २००८ या कालावधीतील संस्थेच्या पदाधिका-यासंदर्भात व इतर मुद्दयावरील काही माहिती टपालाने मागितली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे दिनांक २५-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व सात दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित संस्थेच्या सचिवांना आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व संबंधित संस्थेचे पदाधिकारी यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नाहीत. सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, सहायक धर्मादाय आयुक्त यांनी त्यांच्या दिनांक ११-१२-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे अपिलार्थीस माहिती देण्याचे संबंधित संस्थेच्या सचिवांना आदेशित केले. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांना आवश्यक असलेली माहिती एका खाजगी संस्थेकडे, जी सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्या मार्फत नोंदणीकृत झालेली आहे त्या संस्थेविषयी काही माहिती मागितली आहे. खाजगी संस्थांच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांच्याकडील दिनांक क्रमांक

५२९४/२००८ संदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ, नागपूर विरुध्द मुख्य विश्वस्त गोविंद रामनंद सद्‌गुरु महाराज रामदासी संस्थान, साखरखेर्डा यांच्या संदर्भात दिलेला निर्णय या प्रकरणी विचार घेणे आयोगास गरजेचे वाटते. या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी दिलेल्या आदेशाचा काही भाग खालीलप्रमाणे उध्दृत केला आहे.

".......... It is , therefore, clear from the provisions of this definition that the Act cannot apply to the public Trust. Any public trust, therefore, is not at all covered by the definition of the public authority. .......... If any person interested in the information of the trust, he can definitely apply to the Charity Commissioner under the provisions of the Public Trust Act to have such information, which the Charity Commissioner may deem fit to be provided. But as far as Right to Information Act is concerned, there is no need for any public trust to appoint any Information Officer and to entertain any such application under the Right to Information Act."

मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचे वरील आदेश पाहता या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे माहितीची मागणी केली आहे त्या संस्थेस ती सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची असल्याने माहिती अधिकार अधिनियम मूळात लागू होत नसल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणी असेही सपष्ट करण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे त्यांच्या कार्यालयाच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काम करु शकतात. या प्रकरणी अपिलार्थीने ज्या संस्थेकडे ही माहिती मागितली आहे त्या संस्थेचा व सहायक धर्मादाय आयुक्त यांचा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रत्यक्षपणे सरळ संबंध येत नाही.

अपिलार्थीने जर ही माहिती सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर सहायक धर्मादाय आयुक्त यांनी आदेश देणे उचित झाले असते. त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आदेश देखील अवैध होत आहेत. या सर्व बाबी एकत्रितपणे विचारात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राजेंद्र मुरलीधर शिंदे, मु. पो. मांडवे, तालुका पाथर्डी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष / सचिव, पुण्श्लोक अहिल्यादेवी सेवा संघ, आदर्श प्राथमिक शाळेजवळ, अहिल्यानगर, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२७

निर्णय दिनांक २४-०८-२००९

१ श्री. दादा गुलाब देशमुख, : अपिलार्थी

लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप कार्यकारी अभियंता,

जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांचे माहितीपोटीचे जन माहिती अधिकारी यांनी, एकूण दहा रुपये इतके शुल्क आकारुन त्यांना फक्त दीड पानाची व अपूर्ण माहिती दिली. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जाणुन बुजून चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांच्यावर, प्रतिदिनी २५० इतक्या रकमेची शास्ती लावण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित प्राप्त झालेल्या निधीचा तपशील, शाखा अभियंत्याची नांवे, वरिष्ठ अधिका-यांच्या निर्देशानाच्या टिपणीची प्रत, त्यांच्या कार्यालयातील एकूण कामांची संख्या, शाखा अभियंत्यांची नांवे इत्यादी संदर्भात एकूण १४ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १२-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ०९-०२-२००९ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत माहिती दिल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्या-कडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ९ व १० शी संबंधित माहिती वगळता उर्वरित माहिती मिळाल्याचे मान्य केले. तसेच त्यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त दीड पानाची माहिती देऊनही त्यांना ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी दहा रुपये इतके शुल्क आकारले आहे व अद्यापही त्यांना त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ९ व १० शी संबधित माहिती मिळाली नाही ती त्यांना त्वरित प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली होती त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक ७, ९ व १० शी संबधित माहिती ते अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबधित एकूण १४ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. त्यातील बहुतांश माहितीचे स्वरुप हे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारे असल्याचे दिसून येत आहे, जे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. आज रोजी अपील सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ९ व १० शी संबंधितच युक्तिवाद केला असल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १० व ११ हे या निर्णयामध्ये प्रामुख्याने विचारात घेण्यात येत आहेत. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ७, ९ व १० चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या-कडून त्यांच्या कार्यालयात कार्यरत शाखा अभियंत्यांची नांवे, ते या पदावर कधीपासून कार्यरत आहेत तो कालावधी व त्यांचे निवासी पत्ते अपेक्षित असल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे "शाखा अभियंता हे बदलीच्या ठिकाणीच राहतात की अन्य ठिकाणी (माहिती साध्या कागदावर द्यावी)" अशी माहिती मागितली आहे. या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात व त्यांचे मत अपेक्षित करणारी माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. तसेच मुद्दा क्रमांक १० मधील परत हीच माहिती शाखा अभियंते बदलीच्या ठिकाणी शासकीय निवासस्थानात राहतात की खाजगी भाडोत्री निवासस्थानात राहतात त्यांच्या वास्तव्याचा पुरावा म्हणून भाडे पावती, गॅस कार्डाची छायांकीत प्रत, लाईट बील अशा प्रकारची माहिती मागविली आहे. अपिलार्थीने अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षिले असल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांचे व्यक्तिगत अभिप्राय व त्यांची वैयक्तीक मते अथवा त्यांच्या कृतीबद्दलची कारणे विचारणे हे अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १० शी संबंधित या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. तथापि शाखा अभियंत्यांच्या निश्चित पत्त्यांची माहिती अपिलार्थीस देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या शाखा अभियंत्याची नावे, ते कोणत्या तारखेपासून या पदावर कार्यरत आहेत आणि त्यांचे पत्ते ही माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस दीड पानाची माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोार कबूल केले आहे. या प्रकरणी अपिलार्थीस प्रथमतः माहिती देतांना अपूर्ण माहिती दिल्याने आणि चुकीचे शुल्क आकारल्याने अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आता अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य देय होत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून त्यांनी प्रथमतः स्वीकारलेले शुल्क रुपये दहा इतके अपिलार्थीस याच कालावधीमध्ये परत करावे लागेल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १० व्दारे संबधित शाखा अभियंत्याच्या भाडे पावती, लाईट बील, गॅस कार्ड छायांकीत प्रती मागितल्या आहे. या प्रकरणी असे स्पष्ट करण्यात येते की, शासनाच्या कार्यालयाची सर्वसाधारण कार्यपध्दत लक्षात घेता अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही स्वरुपात उपलब्ध असणे संभवत नाही अथवा ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे राहत नसते, किंवा तशी त्यांची कोणतीही जबाबदारी नाही, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या-कडून देय होणार नाही / उपलब्ध करुन देता येणार नाही.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती आता त्यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी स्वतः उपस्थित राहून प्राप्त करुन घ्यावी लागेल असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये इतके अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दादा गुलाब देशमुख, लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२८

निर्णय दिनांक २४-०८-२००९

१ श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर, : अपिलार्थी
रा. भराडगल्ली, नेहरु मार्केट मागे, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.प्र.), अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नगर रचनाकार, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यांनी प्रथम अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली परंतु जन माहिती अधिकारी यांच्यावर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबधित मुख्य राज्य माहिती आयुक्त यांनी दिलेल्या आदेशासंदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद जन माहिती अधिकारी यांच्याकडून न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-१२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे अनुमान काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपला लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला व अपिलामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ४ ची माहिती त्यांना देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली. तथापि तोंडी युक्तिवादामध्ये अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक १ ते ४ या मुद्दयांचा मुद्देनिहाय परामर्श घेतला असता अपिलार्थीस मुद्दा क्रमांक २ वगळता उर्वरित मुद्दयावरील माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये कबूल केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी देखील

त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला असून या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असेही नमूद केले आहे की, अपिलार्थी हे माहिती मिळूनही ते माहिती अधिकार कायद्याचा दुरुपयोग करुन वैयक्तीक वाद निर्माण करत आहेत. त्यांना माहिती देण्याची प्रशासनाची तयारी असूनही ते वांरवार तक्रार अर्ज करत असल्याने त्यांचे विचाराधीन अपील फेटाळणे योग्य होईल.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या चारही मुद्दयावरील माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ वगळता उर्वरित तीन मुद्दयावरील माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने त्यांच्या तोंडी युक्तिवादामध्ये आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे मुख्य राज्य माहिती आयुक्तांचे आदेश जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ज्या दिवशी प्राप्त झाले आहेत त्या दिनांकाच्या पानाच्या झेरॉक्स प्रतीची मागणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे ती माहिती अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत देण्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी लागेल हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधित माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तात्रय प्रभाकर शेकटकर, रा. भराडगल्ली, नेहरु मार्केट मागे, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२९

निर्णय दिनांक २४-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अभिजीत सी. पुप्पाल,<br>३०१ आदर्श क्लासिक, खिस्त गल्ली, अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी (महसूल), अहमदनगर | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | तहसीलदार (सामान्य प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने व अपूर्ण माहिती पुरविली असल्याने त्यांच्यावर व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर शास्तीची कार्यवाही करावी आणि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य पुरविण्याचे आदेश आयोगाने द्यावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या संदर्भात एकूण चार मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. यातील मुद्दा क्रमांक ३ व ४ च्या संदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्दयाशी संबंधित अभिलेख्याची तपासणी करण्याची व मुद्दा क्रमांक १ व २ शी संबंधित माहिती त्यांना प्रत्यक्षतः उपलब्ध करुन देण्याची जन माहिती अधिकारी यांना विनंती केली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर आणि लीड बँक ऑफिसर, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, अहमदनगर यांच्याशी संबंधित असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी दिनांक १४-१०-२००८ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत संबधितांच्याकडे दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली व अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती ती या पत्राव्दारे पुरविली आहे. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-१२-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि ही मुदत संपून गेल्यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये असे स्पष्ट केले की, त्यांना अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांची यादी, त्यांना शासनातर्फे देण्यात येत असलेले निवृती वेतन व स्वातंत्र्य सैनिकांना निवृती वेतन देण्याची योजना कधीपासून लागू झाली या मुद्दयासंदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. त्यांना या मुद्दयासंबंधी प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या विषयावर त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-१०-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली असून यासंदर्भात त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्याची तपासणी देखील अपिलार्थीने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये केलेली आहे. त्यांच्याकडे फक्त अहमदनगर तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांची माहिती होती. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस अहमदनगर तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांची यादी पुरविली तसेच त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांनी संबंधित लिड बँक ऑफिसर यांच्याशी संपर्क साधूनही त्यांनी अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती अपूर्ण असल्याचे वाटत आहे. अपिलार्थीस संपूर्ण अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांची यादी देण्यासाठी आता त्यांना संबंधित तहसीलदारांशी संपर्क साधून नंतर ती माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल व ही माहिती ते अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिलेल्या चार मुद्दयापैकी दोन मुद्दयावरील माहितीशी संबंधित अभिलेख्यांची तपासणी अपिलार्थीने केली आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अहमदनगर जिल्ह्यातील संपूर्ण स्वातंत्र्य सैनिकांची यादी, त्यांना मिळणारे सेवानिवृती वेतन, ही योजना केव्हापासून लागू झाली त्यासंबंधीचे आदेश ही माहिती देणे भाग आहे. त्यापैकी स्वातंत्र्य सैनिकांना

निवृती वेतन ही योजना दिनांक १८-०५-१९८३ पासून लागू झाली असल्याच्या शासन निर्णयाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त अहमदनगर जिल्ह्यातील सर्व स्वातंत्र्य सैनिकांची यादी व त्यांना मिळणारे निवृत्ती वेतन यावरील माहिती देणे बाकी आहे. ही माहिती अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे हे पाहता व ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित अहमदनगर जिल्ह्यातील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अभिजीत सी. पुप्पाल, ३०१ आदर्श क्लासिक, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सामान्य प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय,

अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३०/०९

निर्णय दिनांक २४-०८-२००९

१ श्री. अरुण सोपान वाबळे, : अपिलार्थी
मु. पो. गुहा, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
मुळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक ०५-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील मुळा धरण शाखेतील "२७०१" या शिर्षाखालील दिनांक ०१-०४-२००६ ते ३१-०३-२००७ या कालावधीत झालेल्या कामांची माहिती मागितली

होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मंजूर कामांची व निविदाची यादी आणि या कामाच्या कार्यारंभ आदेशाच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली मुळा धरण शाखेकडील २७०१ या शिर्षाखाली केलेल्या कामांच्या बिलाच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०२-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०२-२००९ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. मात्र या नंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील सर्व मुद्दयासंबंधात संबंधित कामाच्या बिलाच्या प्रती माहितीमध्ये समाविष्ट असल्याचे त्यांना वाटल्यावरुन त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस बिलाच्या प्रती पुरविल्या व तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर दिनांक २६-०२-२००९ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविली व अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये ३४ इतके त्यांना परत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक ०५-०१-००९ रोजी व तदनंतर दिनांक २६-०२-२००९

रोजी अपेक्षित संपूर्ण माहिती पुरविल्याचे आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथमतः ही माहिती देण्यासाठी घेतलेले शुल्क रुपये ३४ इतके त्यांना परत केले आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हेतूतः माहिती देण्यासाठी टाळले किंवा अपिलार्थीपासून त्यांनी मागितलेली माहिती दुष्ट हेतूने दडविली असल्याचे आयोगास निःसंशयपणे आढळून येत नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या पातळीवर अपिलार्थीस अधिनियमाव्दारे माहिती पुरविली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतर देखील त्यांनी अपिलार्थीस अपेक्षित माहिती विनामूल्य पुरविली आहे त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्ती लावण्याची कारवाई करण्यासाठी आयोग आदेश देत नाही, परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जाचा नीटपणे अभ्यास न करता अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती पुरविली असल्याचे येथे सिध्द होत आहे. त्यामुळे त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे भविष्यात प्राप्त होणा-या प्रत्येक माहितीसाठीच्या अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी अशी आयोगाची सूचना त्यांना देण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांनी चूक केली आहे तथापि ही चूक त्यांनी कोणत्याही असद्हेतूने केल्याचे अथवा अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळण्यासाठी मुद्दामहून केली असल्याचे आढळून येत नाही

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अरुण सोपान वाबळे, मु.पो. गुहा, तालुका राहुरी, जि. अहमदनगर

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता मूळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११९३

निर्णय दिनांक २४-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. एल. एस. कोल्हे,<br>इंदिरा पथ, कोपरगांव, तालुका कोपरगांव,<br>जिल्हा अहमदनगर | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०५-२००८ रोजीच्या अर्जावर काय कार्यवाही केली, व इतर विषयासंदर्भात एकूण सहा मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. तथापि विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-१०-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून समक्ष पाहण्यासाठी उपलब्ध करुन घेण्याचे व यामधून त्यांना जी माहिती पाहिजे आहे त्याच्या छायाप्रति सशुल्क प्राप्त करुन घ्याव्या असे अपिलार्थीस सूचित केले. तथापि हा निर्णय अपिलार्थीस न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या दिनांक ०६-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दहा दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे आश्वासीत केले आणि आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज मूळात त्यांना प्राप्त झाला नाही. अपिलार्थीने प्रथमतः जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले त्यावेळी तो प्राप्त झाला. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. तसेच प्रथम अपील अर्जाच्या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर होते. जन अपिलीय अधिकारी यांनी असे आदेश दिले की, "आपल्या अर्जातील माहिती आपण या कार्यालयात येऊन समक्ष अथवा जी

पाहिजे आहे त्याच्या छायाप्रती  विहित रक्कम भरुन घेऊन जाऊ शकतील." मात्र अपिलार्थीस आवश्यक ती माहिती अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन न देण्यामागची कारणे आयोगास अशी सांगितली की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार होती.  तथापि अपिलार्थी ही माहिती त्यांच्याकडून स्वीकारण्यासाठी उपस्थित न राहिल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.  यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे टपालाने माहिती मागविली असल्याने व या पोटीचे शुल्क भरण्यासाठी अपिलार्थी तयार असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती  त्यांच्या मूळ अर्जातील विनंतीप्रमाणे त्यांना टपालाने पाठविणे भाग होते.  तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती न केल्याने अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी  यांची अशाप्रकारची कृती सर्वथा गैर व चुकीची असल्याचे सिध्द होत आहे.  अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता  अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी जन माहिती अधिकारी तयार आहेत हे पाहता असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या विचाराधीन मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एल. एस. कोल्हे, इंदिरा पथ, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११९४

निर्णय दिनांक २४-०८-२००९

१ श्री. शिरीष गंगाधर धर्माधिकारी, : अपिलार्थी
सातभाई मळा, दिल्ली दरवाजा,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
अधीक्षक अभियंता (स्थापत्य),
म. रा. वि. पारेषण कंपनी, नाशिक रोड, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता (स्थापत्य),
म. रा. वि. पारेषण कंपनी, विद्युत भवन, नाशिक रोड,
नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. सुभाष कर्नावट

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी या दोघांनीही त्यांच्या अर्जावर कोणतेही उत्तर न दिल्यामुळे व माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. सुभाष कर्नावट यांच्या दिनांक ०४-०२-२००८, ०१-०१-२००८, १७-१२-२००७, १३-१२-२००७, १२-१२-२००७, १६-११-२००७ या तारखांना दिलेल्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली याची माहिती रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले प्रथम अपील हे संबंधितांना प्राप्त झाले आहे किंवा कसे व हा अर्ज व प्रथम अपील अर्ज जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे मूळात पाठविले गेले आहेत किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या व पुराव्याअभावी आयोगास आढळून येत नाही. या मुदयावर खुलासा करण्यासाठी व आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगासमोर अपिलार्थी किंवा जन माहिती अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित नाही, हे पाहता

आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिरीष गंगाधर धर्माधिकारी, सातभाई मळा, दिल्ली दरवाजा, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता (स्थापत्य), म. रा. वि. पारेषण कंपनी, नाशिक रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, अधीक्षक अभियंता (स्थापत्य), म. रा. वि. पारेषण कंपनी, विद्युत भवन, नाशिक रोड, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११९५

निर्णय दिनांक २४-०८-२००९

१ श्री. अे. के. आनंद, : अपिलार्थी

वर्षा स्टोअर्स समोर, महानगरपालिका रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा न्यायालय, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा न्यायाधीश-१ व अति. सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अर्जातील माहिती देण्याचे शुल्लक कारणास्तव नाकारले. जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय न दिल्याने आणि माहिती अधिकार अधिनियमाविषयी न्यायालयासारख्या संस्थेने अनादर दाखविला असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मा. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, कोर्ट क्रमांक १, अहमदनगर यांनी पास केलेल्या डिक्री क्रमांक ३६५/२००१ च्या संदर्भात काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०५-२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेला अर्ज विहित नमुन्यात नसल्याचे अपिलार्थीस कळविले. तसेच या अर्जावर दहा रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट तिकिट त्यांच्या अर्जाला लावले नसल्याच्या कारणावरुन अपिलार्थीस माहिती नाकारली. या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या संदर्भात स्वतंत्र आदेश पारित न करता त्यांच्याकडील अभिलेख्यावर निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील दिनांक २७-०६-२००८ फेटाळले. अपिलार्थीचे सदर अपील फेटाळतांना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलावर आवश्यक त्या किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प त्यांच्या प्रथम अर्जासोबत न जोडल्यामुळे अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले असल्याचे नमूद केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे काम जिल्हा

न्यायालयामार्फत पार पाडले जाते. त्याचप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणाही अर्जदाराने माहितीसाठीचा अर्ज केल्यास अर्जदाराला त्यांच्याकडे माहिती मागतांना एका ठराविक प्रपत्रामध्ये व १२ रुपये इतक्या किंमतीच्या कोर्ट फी तिकिटासह हा अर्ज करणे भाग असते, तथापि अपिलार्थीने या प्रकरणी १२ रुपये ऐवजी फक्त १० रुपये इतक्याच किंमतीचे कोर्ट फी तिकिट डकविले त्यामुळे त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज फेटाळून लावला व हा अर्ज फेटाळून लावतांना आवश्यक ती कारणे दिलेली आहेत. तसेच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करतांना ४० रुपये इतक्या किंमतीच्या कोर्ट स्टॅम्प ऐवजी २० रुपये किंमतीची पोस्टल ऑर्डर त्यांच्या प्रथम अपील अर्जासोबत जोडली असल्याने अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी फेटाळून लावला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने हे अपील केले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, मा. न्यायालय हे अधिनियमातील कलम २ (ज) (क) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण आहे, आणि अशा प्रकारच्या प्राधिकरणाच्या समुचित शासनाने अधिनियमातील कलम २७ उप कलम २ अन्वये माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीची अंमलबजावणी करण्याकरीता स्वतःचे वेगळे नियम केले आहेत व त्या नियमातील तरतुदींचे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यावरील प्रथम अपील अर्ज करतांना पालन केले नाही, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचेकडे केलेले त्यांचे प्रथम अपील देखील जन अपिलीय अधिकारी यांनी फेटाळून लावले आहे. अशा परिस्थितीत अपिलार्थीने मूळात मा. न्यायालयाकडे माहिती मागतांना व त्यावरील अपील करतांना मा. न्यायालयाने या संदर्भात विहित केलेल्या मूळ शर्तीचे पालन न केल्यामुळे त्यांना न्यायालयाकडून कोणतीही माहिती आता देय होत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अे. के. आनंद, वर्षा स्टोअर्स समोर, महानगरपालिका रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश-१ व अति. सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११९६

निर्णय दिनांक २४-०८-२००९

१ श्री. बापूसाहेब उत्तमराव पालवे, : अपिलार्थी
रा. प्लॉट नंबर ५८, गुरुकुल सोसायटी, पाईप लाईन रोड,
सावेडी, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अपर पोलीस अधीक्षक,
राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस अधीक्षक,
राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्यानंतर ३० दिवसाची विर्निदिष्ट केलेली मुदत संपूनही त्यांना अपिलाबाबत काहीही कळविले नाही, असे नमूद करुन त्यांना उपरोक्त प्रकरणी माहिती देण्यासाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हेतूपुरस्सर टाळाटाळ करीत असून संबंधितावर अधिनियमातील कलम २० (१) च्या

तरतुदीप्रमाणे शास्तीची कार्यवाही करण्याची विनंती  त्यांनी आयोगास या अपील अर्जामध्ये  केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोलीस स्टेशन क्रांती चौक येथे दाखल केलेल्या कलम ३७६, ३५४, ३४८, ३४ भादवि या गुन्ह्यासंदर्भात दिनांक २२ एप्रिल २००७ ते ३१ मे २००८ या कालावधीतील काही माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही.  त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपिलार्थी  व  जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप लक्षात घेता अपिलार्थीच्या दिनांक ०९-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अपर पोलीस अधीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद यांनी या टप्प्यावर प्रथमतः सुनावणी घेऊन यासंदर्भात आपले आदेश पारित करणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, अपर पोलीस अधीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपर पोलीस अधीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश पारित करावेत.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बापूसाहेब उत्तमराव पालवे, रा. प्लॉट नंबर ५८, गुरुकुल सोसायटी, पाईप लाईन रोड, सावेडी, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११९७

निर्णय दिनांक २४-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बापूसाहेब उत्तमराव पालवे,<br>रा. प्लॉट नंबर ५८, गुरुकुल सोसायटी, पाईप लाईन रोड,<br>सावेडी, अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ), औरंगाबाद शहर,<br>औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद शहर,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), औरंगाबाद शहर, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरुनही, माहिती प्राप्त झाली नाही व त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याच प्रकारची सुनावणी

घेतली नाही. अशा प्रकारे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचा भंग केल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ) औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील दिनांक ०३-०४-२००६ ते १३-०४-२००६ व ०४-०९-२००६ ते २५-०९-२००६ या कालावधीतील पोलीस उप आयुक्त कार्यालयामधील ठेवण्यात आलेल्या आवक जावक रजिस्टर व गोपनीय आवक जावक रजिस्टरमध्ये घेण्यात आलेल्या नोंदीची झेरॉक्स प्रत ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर पोलीस उप आयुक्त (परिमंडळ) औरंगाबाद यांनी दिनांक २२-०९-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), औरंगाबाद यांच्याकडे पाठवून ती अपिलार्थीस सशुल्क देण्यासाठी सूचित केले. तथापि सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांनी अपिलार्थीस ही माहिती हस्तांतरित न केल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही. अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाल्याचे आयोगास अवगत केले. त्यांनी आयोगास असे सपष्ट केले की, त्यांनी सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांना, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १२० इतक्या रकमेची मनीऑर्डर पाठविली व ती सहायक पोलीस आयुक्त कार्यालयास दिनांक २०-१०-२००८ रोजी प्राप्त झाली. तथापि आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही त्यांना सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांच्याकडून दिनांक ०८-१२-२००८ रोजी माहिती पाठविण्यात आली व ती अपिलार्थीस त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर दिनांक २१-१२-२००८ रोजी प्राप्त झाली. प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांचे कोणतेही आक्षेप नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी दिनांक ०८-१२-२००८ रोजी पाठवून दिली असून अपिलार्थीची मनीऑर्डर ज्या लेखाधिका-याला प्राप्त झाली त्या लेखाधिका-याने जन माहिती अधिकारी यांना यासंदर्भात कोणतीही कल्पना दिली नसल्यामुळे अपिलार्थीस वेळेत माहिती प्राप्त होण्यासाठी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज केल्यानंतर सशुल्क प्राप्त झाली आहे. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना १२० रुपयांची मनीऑर्डर केली व ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने स्विकृत केली. वास्तविक पाहता अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास पोलीस उप आयुक्त (परिमंडळ) यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊनही अंतीमतः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांच्या बेपर्वाईमुळे अपिलार्थीस माहिती मिळण्यासाठी विहित केलेली मुदत व्यपगत झाली व माहिती देण्यासाठी विलंब झाला. त्यामुळे आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून

प्राप्त झालेली माहिती ही अधिनियमातील विहीत तरतुदीपेक्षा विलंबाने प्राप्त झाली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, त्यांच्याकडून माहितीपोटी घेतलेले शुल्क रुपये १२० इतके परत करावे लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकृत केलेले शुल्क रुपये १२० इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे. अपिलार्थीस माहिती विलंबाने प्राप्त होण्यासाठी पोलीस आयुक्त कार्यालयातील सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांचे सर्व संबंधित सहायक या प्रकरणी जबाबदार असल्याचे आयोगास आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता, या प्रकरणी सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांच्या कार्यालयातील अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्यासाठी संबंधित असलेले सर्व सहायक जबाबदार ठरत आहेत. उपरोक्त प्रकरणी त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे पालन न करुन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील या प्रकरणाशी संबंधित सर्व सहायकांवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत त्यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये १२० इतके त्यांना परत करावे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. बापूसाहेब उत्तमराव पालवे, रा. प्लॉट नंबर ५८, गुरुकुल सोसायटी, पाईप लाईन रोड, सावेडी, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), औरंगाबाद शहर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), औरंगाबाद शहर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७५३

निर्णय दिनांक २४-०८-२००९

१ श्रीमती रत्नमाला सुरेश बोरसे, : अपिलार्थी
स्मृती हौसिंग सोसायटी, बाबु गेनू मार्ग, आगरकर (मळा),
स्टेशन रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा पोलीस पाटील, अमराळे,
मु. पो. अमराळे, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा पोलीस अधीक्षक, धुळे

त्रयस्थ पक्ष : श्री. संजय सुकलाल बोरसे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे पोलीस पाटील, अमराळे यांच्याकडे अमराळे गावामध्ये सन २००५ ते २००७ या कालावधीतील बोगस डॉक्टरची माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" अमराळे गावात बोगस वैद्यकीय व्यवसाय करीत असलेले डॉ. संजय सुकलाल बोरसे यांच्याबद्दल आजपर्यंत तपशीलवार सविस्तर माहिती मिळावी. "

अपिलार्थीच्या या अर्जास पोलीस पाटील अमराळे यांनी त्यांच्या विनादिनांकाच्या पत्राने उत्तर पाठविले असून अपिलार्थीस असे कळविले आहे की, अपिलार्थीने विचारलेल्या माहितीशी संबंधित वैद्यकीय क्षेत्रातले त्यांना कुठल्याही प्रकारचे ज्ञान नसल्याने ते अपिलार्थीस यासंदर्भात काही सांगू शकत नाहीत. पोलीस पाटील अमराळे यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, धुळे यांच्याकडे दिनांक ११-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. पोलीस अधीक्षक, धुळे यांनी अपिलार्थीचा हा अपील अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, धुळे यांच्याकडे दिनांक २०-०९-२००७ रोजी पुढील कार्यवाहीसाठी पाठविला व त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली. तथापि अशा प्रकारे पत्रव्यवहार करुनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २४-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, पोलीस पाटील, अमराळे, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या वतीने त्यांच्या प्रतिनिधीने जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडून प्राप्त झालेली कागदपत्रे आयोगास सादर केली असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, श्री. संजय सुकलाल बोरसे हे बी. ई. एम. एस. ईलेक्ट्रोपॅथी पदवीधारक असून मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक २२-१२-२००६ च्या निणर्यानुसार ते ईलेक्ट्रोपॅथी पध्दतीने सदर व्यवसाय करण्यास पात्र आहेत.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अमराळे या गावाच्या पोलीस पाटलाकडे जन माहिती अधिकारी म्हणून अर्ज केला आहे. संबंधित पोलीस पाटलाची जन माहिती अधिकारी म्हणून कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाने नियुक्ती केलेली नाही. तसेच अपिलार्थीने या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षकाकडे प्रथम अपील केले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक यांची माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार या प्रकरणाशी संबंधित असलेल्या प्राधिकरणातर्फे जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेलेली नाही. अपिलार्थीने आपल्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, ही माहिती त्यांनी मोघम स्वरुपात मागितली असल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारे अपिलार्थीने मोघम स्वरुपात माहिती अधिकारी म्हणून नेमणूक न केलेले जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीस माहिती मागविणे व या प्रकरणाशी कोणताही संबंध नसलेल्या अधिका-याकडे जन अपिलीय अधिकारी म्हणून प्रथम अपील करणे या सर्व गोष्टी परस्परविरोधी आहेत आणि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी त्या कोणत्याही प्रकारे सुसंगत नाही. त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्रीमती रत्नमाला सुरेश बोरसे, स्मृती हौसिंग सोसायटी, बाबु गेनू मार्ग, आगरकर (मळा), स्टेशन रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा पोलीस पाटील, अमराळे, मु. पो. अमराळे, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक, धुळे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/८/रामाआ/अपील/सिआर/११५६
निर्णय दिनांक २५-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर,<br>पैठण, जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा,<br>मुख्याधिकारी,<br>नगरपरिषद, पैठण,जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास नकार दिला व जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.०५.२००८ रोजी दिलेल्या आदेशाचे जन माहिती अधिकारी यांनी पालन न केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३.०२.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे पैठण शहरातील, रस्ता अनुदान अंतर्गत, धनगरवाडा ते खळवाडी (पांदी रस्ता) या झालेल्या कामासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - टेंडर निविदा,तुलनात्मक तक्ता, इस्टीमेट, मोजमाप पुस्तिका रेकॉर्ड

नक्कल, ठेकेदारांना देण्यात आलेल्या धनादेश क्रमांक व दिनांक, काम पूर्णत्त्वाच्या प्रमाणपत्राच्या कागदपत्रांची नक्कल - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३१.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१२.०५.२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील दि. ०९.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे रजिस्टर्ड पोस्टाने माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात लिहिलेल्या पत्त्यावर अपिलार्थी उपलब्ध न झाल्याने माहितीचे पाकीट जन माहिती अधिकारी यांना परत प्राप्त झाले. तदनंतर अपिलार्थीने दि.२०.०६.२००८ रोजी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्वीकारली. तथापि तत्पूर्वी अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नसल्याचा युक्तिवाद केला. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने ही माहिती दि.२०.०६.२००८ रोजी व्यक्तिशः स्वीकारल्याचा त्यांच्याकडील पुरावा आयोगासमोर सादर केला. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादात प्रतिपादन केल्याप्रमाणे, त्यांना नेमक्या कोणत्या मुद्यावर माहिती प्राप्त झाली नाही, यावर अपिलार्थी फारसे स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. २०.०६.२००८ रोजी व्यक्तिशः माहिती पुरविली आहे. यासंदर्भात त्यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद

आयोगास सादर केला असून या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झाल्याचे, मान्य केले आहे. या विलंबाप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्याकडील संबंधित विभागातील कर्मचाऱ्याकडून माहिती प्राप्त न झाल्याचे व अतिरिक्त कामाचा व्याप ही कारणे दर्शविली आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने दि. १३.०२.२००८ रोजी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्रथमतः दि. ०९.०६.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १२.०५.२००८ रोजी अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेश पारित करुनही जन माहिती अधिकारी यांना ही माहिती देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर २७ दिवसांचा विलंब लावला आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, अपिलार्थीस ही माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत देणे हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या आवाक्याबाहेरचे काम होते, असे आयोगास वाटत नाही. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांच्या कार्यालयातील या प्रकरणाशी सरळ संबंधित असलेल्या बांधकाम विभागाकडून त्यांना ही माहिती वेळेवर प्राप्त न होण्यासाठी बांधकाम विभागातील संबंधित कर्मचारी हे जबाबदार आहेत व केवळ त्यांच्यामूळेच अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना विलंब झाला. या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार अर्जदारास माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या सर्व सहायक कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता, या प्रकरणी मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असलेल्या बांधकाम विभागाचे कर्मचारी जबाबदार असल्याचे दिसून येते. त्यांच्या अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याच्या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. उपरोक्त

प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी त्यांनी एकूण ८७ दिवसाचा विलंब लावल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. सबब त्यांनी अशाप्रकारे लावलेल्या एकूण ८७ दिवसांच्या असमर्थनीय विलंबाबाबत या सर्व संबंधित सहायक कर्मचाऱ्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रु. २५०/- याप्रमाणे एकूण ८७ दिवसांच्या विलंबासाठी एकूण रु. २१,७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय वंचित ठेवण्यासाठी जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. संबंधित सर्व कर्मचारी, हा खुलासा आयोगास हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ सादर करतील याची दक्षता मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. २०.०६.२००८ रोजी व्यक्तिशः माहिती प्राप्त झाली असल्याने ते अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांचे या प्रकरणातील सहायक कर्मचारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी त्यांनी लावलेल्या एकूण ८७ दिवसांच्या विलंबाबाबत या सर्व संबंधित सहायक कर्मचाऱ्यावर एकूण ८७ दिवसांच्या विलंबासाठी एकूण रु. २१,७५०/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस

दिवसांच्या आत आयोगास (मुख्याधिकारी,नगरपरिषद,पैठण यांच्यामार्फत) सरळ सादर करावा.

३. मुख्याधिकारी, नगरपरिषद यांनी या प्रकरणाशी संबंधित त्यांच्या कार्यालयाशी संबंधित हा खुलासा आयोगास हे आदेश निर्गमित झ ााल्यापासून तीस दिवसांच्या आत सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : २५-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सोमेश्वर जनार्धन आहेर,मु. पो. स्वयंभू निवास, जैनपूरा, पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,नगरपरिषद, पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११५७
निर्णय दिनांक २५-०८-२००९

१. श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
उपपोलीस अधीक्षक,
लाचलुचपत (भ्रष्टाचार) प्रतिबंधक,
जिल्हा कार्यालय,लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो,
नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो,नांदेड.

त्रयस्थ पक्ष : श्री. काळगे, पोलीस जमादार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे नाकारले, असे नमूद केले आहे. अपिलार्थीस ज्या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारली व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम फेटाळले, ती कारणे अपिलार्थीस मान्य नसल्याचे देखील त्यांनी अर्जामध्ये नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५.०३.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. काळगे, पोलीस जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक जिल्हा कार्यालय, लातूर यांच्यासंदर्भात व त्यांच्याविरुध्द जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात एकूण आठ मुद्यांद्वारे दि. ३१.०१.२००८ ते दि. ०५.०३.२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती स्पीड पोस्टाने मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०८.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही मुद्यांवरील माहिती नाकारली व काही मुद्यांवरील माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०९.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२३.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील अधिनियमातील कलम ८(१)(जी) व (जे)नुसार फेटाळले.जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी त्रयस्थ पक्षासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या विरुध्द आलेल्या तक्रार अर्जाची चौकशी त्यांच्या कार्यालयातर्फे पूर्ण करुन घेण्यात आली असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज ज्यावेळी केला होता, त्यावेळी अपिलार्थीविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारअर्जावर लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत चौकशी चालू होती. त्यामुळे त्यांनी अपिलार्थीस काही मुद्यांवर माहिती देण्याचे नाकारले व काही मुद्यांवर अपिलार्थीस दि. ०८.०४.२००८ रोजी माहिती दिली. परंतु आता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधातील प्रकरणातील चौकशीची सर्व कार्यवाही पूर्ण झाली असल्याने, ही माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (जी) च्या तरतुदीच्या अधीन राहून उघड करण्यास काहीही हरकत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता त्या अर्जातील मुद्दा क्र. ६ शी संबंधित माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्यावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.६ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी पूर्णतया विसंगत असल्याचे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीपैकी अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे, ती ज्या स्वरुपात आहे, त्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया आहे. त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अथवा त्यांचे अभिप्राय, त्यांची मते अपेक्षित करणारी “माहिती” मागणे अधिनियमातील तरतुदींच्या व्याप्ती बाहेरचे असल्यामुळे, हे त्यांना अनुज्ञेय नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.६ द्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या विरुध्द प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाची प्रत मागितली आहे. तथापि या तक्रारीची प्रत अपिलार्थीस दिल्याने अधिनियमातील कलम ८ (१) (जी) चा भंग होईल असे जन माहिती अधिकारी यांना वाटत आहे. यासंदर्भात त्यांना असे सुचित

करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या विरुध्द प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाची प्रत व इतर कागदपत्रे देतांना यामध्ये तक्रारदाराचे नांव व पत्ता उघड होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.६ वगळता, उर्वरित सात मुद्यांवरील देय माहिती त्यांना सात दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ६ वगळता, उर्वरित सर्व मुद्यांवरील, अधिनियमातील कलम ८ (१) (जी) च्या तरतुदीस छेद न देणारी अपिलार्थीस देय असणारी, माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य स्पीड पोस्टाद्वारे पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ६ व अधिनियमातील कलम ८ (१) (जी) च्या तरतुदीस छेद देणारी माहिती वगळता, उर्वरित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य स्पीड पोस्टाद्वारे पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील, एन-९,एच १६४/०३, श्रीकृष्णनगर, टि.व्ही. सेंटर चौकाजवळ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, स्नेहनगर पोलीस कॉलनी, ब्लॉक कोयना, श्रीनगररोड,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, स्नेहनगर पोलीस कॉलनी, ब्लॉक कोयना, श्रीनगररोड,नांदेड यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११५८
निर्णय दिनांक  २५-०८-२००९

१. श्री. धर्मराज आप्पाराव पट्टे, बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद

प्रत्यक्षतः तत्कालीन जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०८.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून आयोगास अशी विनंती केली आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक अधिनियमाचा भंग केला असल्यामुळे त्यांच्यावर दंड लावण्यात यावा व शिस्तभंग विषयक कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८.०१.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे बीड शहरातील तलाठी भवन या इमारतीविषयी एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सरकारी प्लॉटचे क्षेत्रफळ, तलाठी भवनचे बांधकामाची रक्कम, बांधकामाचा नकाशा व झालेला खर्च, तलाठी

भवनाच्या पाठीमागे रिकामी जागा पत्र्याचे शेड कोणाच्या मालकीचे आहे,तसेच जन माहिती अधिकारी यांच्या जागा भाडयाने कधी दिले? शासकीय जागा भाडयाने हवी असल्यास करावयाच्या कायदेशीर कारवाईबाबत माहिती व तलाठीभवनाची जागा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने भाडयाने दिली आहे काय? - या मुद्यांचा समावेश होता. या अपील अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने यानंतर अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे  दि.०५.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले.जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने  व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख केला आहे. तथापि यासंदर्भातील वैध पुरावा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः दि. ०२.०२.२००८ रोजी सादर केल्यानंतर त्यांनी दि. १८.०२.२००८ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः माहितीसाठीचा अर्ज दाखल करताना त्यांनी अर्जासोबत ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा

कोणताही वैध पुरावा जोडला नव्हता. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सूचना दिल्यानंतर अपिलार्थीने दि. ०२.०२.२००८ रोजी प्रथमतः जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचा वैध पुरावा सादर केला. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीचा अर्जाचा दि. ०२.०२.२००८ असा समजण्यात येत आहे. हा दिनांक पाहिल्यास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिल्याचे आढळून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १८.०२.२००८ रोजी दिली असली तरी ती माहिती मुद्देसुद नाही. प्रत्येक मुद्याच्या क्रमांकासमोर त्या मुद्याशी संबंधित माहिती अपिलार्थीस देणे अभिप्रेत असताना, त्या माहितीशी संबंधित नसलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. त्यामुळे या प्रकरणी आता अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती देण्याच्याच प्रश्न फक्त विचारार्थ शिल्लक राहिला आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अशी मुद्देनिहाय माहिती सात दिवसांच्या आत अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ मध्ये अपिलार्थीने - सरकारी प्लॉटचे क्षेत्रफळ ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असता, त्यांनी अपिलार्थीस सरकारी प्लॉटचे क्षेत्रफळ न कळविता, प्रत्यक्ष बांधकामाचे क्षेत्रफळ कळविले. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत नाही. सर्व सरकारी इमारतीचे विश्वस्त म्हणून ही माहिती कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती त्यांच्या कार्यालयातील पी.आर.बी. रजिस्टरवरुन घेऊन ती अपिलार्थीस पुरवावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येते.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने माहिती दडविली असल्याचे अथवा माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याचे आयोगास आढळून येत नाही. या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची हाताळणी जन माहिती अधिकारी यांनी अत्यंत निष्काळजीने केल्याचे मात्र येथे सिध्द होत आहे. याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या प्रत्येक अर्जावर सतर्कतेने कार्यवाही करावी, अशा सूचना देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना मुद्देनिहाय, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. धर्मराज अप्पाराव पट्टे, सहयोगनगर, डी.पी.रोड,बीड-४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११५९
निर्णय दिनांक २५-०८-२००९

१. श्री. दिनकर गोविंदराव मस्के, बीड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, शिक्षण उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निरीक्षक, व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी, प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद.
जन अपिलीय अधिकारी : सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद
त्रयस्थ पक्षः श्रीमती कांता रामदास खोसे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, दि. २५.०२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती कांता रामदास खोसे यांची नेमणूक व मान्यतेसंदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि ही माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने

दि.३१.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. तदनंतर दि. १७.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी पाठविलेले पत्र अपिलार्थीस मिळाले, परंतु अपिलार्थीस कोणतीही माहिती त्यांनी द्वितीय अपील अर्ज दाखल करेपर्यंत प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील अर्जाव्दारे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २०(२) प्रमाणे कारवाई करण्यात यावी व अपिलार्थीस विनामूल्य माहिती मिळावी असे जन माहिती अधिकारी यांना आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५.०२.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री बंकटस्वामी (व्यवसायिक अभ्यासक्रम) कनिष्ठ महाविद्यालय,बीड येथील क्लार्क,श्रीमती कांता रामदास खोसे यांची नेमणूक व मान्यतेसंदर्भात एकूण तीन मुद्यांद्वारे शीघ्र टपालाने माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने बंकटस्वामी महाविद्यालय व्यवस्थापनाने व्यवसायिक अभ्यासक्रमांतर्गत क्लार्कचे पद भरण्यासाठी दिलेल्या प्रस्तावासंदर्भात दिलेल्या मान्यतेच्या आदेशाची प्रमाणित प्रत, हे पद अनुसूचित जमातीचे (महिला आरक्षण ३३ टक्के) आरक्षण असताना खुल्या प्रवर्गातील संस्थेच्या कोषाध्यक्षाची कन्या हिची नेमणूक कशी केली व त्यावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने काय कार्यवाही केली. याबाबतचा खुलासा व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती आणि श्रीमती कांता रामदास खोसे यांच्या पदास जन माहिती अधिकारी यांची मान्यता मिळण्यासाठी संस्थेने पाठविलेल्या प्रस्तावाची प्रमाणित प्रत व या पदास मान्यता दिली असल्यास मान्यतापत्राची प्रत. - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २८.०२.२००८ रोजी प्रत्यक्षात प्राप्त झाला, तदनंतर त्यांनी अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती अपिलार्थीस पुरविली व मुद्दा क्र. २ व ३ च्या संदर्भात अपिलार्थीस असे कळविले की, श्रीमती कांता रामदास खोसे यांच्या

नेमणूकीस मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव त्यांच्या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३१.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०३.२००८ रोजी माहिती दिल्याचे परत कळविले व जन माहिती अधिकारी यांच्या दि. १८.०३.२००८ रोजीच्या पत्राची प्रत अपिलार्थीस पुन:श्च पाठविली. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित व अपिलार्थी आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली तीन मुद्यावरील माहितीपैकी, दोन मुद्दे त्यांच्या दैनंदिन कार्यालयाशी संबंधित नाहीत. तसेच त्यांच्याकडे कोणत्याही शिक्षण संस्थेचे, त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूकीसंदर्भातील मान्यतेचे प्रस्ताव सरळ प्राप्त होत नाहीत, तर संबंधित जिल्हयाचे, जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे त्यांना सादर केले जातात. अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्याकडे माहिती मागविली होती त्यावेळी त्यांच्याकडे श्रीमती कांता रामदास खोसे यांच्या नेमणूकीसंदर्भातील व नियुक्तीच्या संदर्भातील प्रस्तावास मान्यता देण्याच्या संदर्भातील कोणतेही कागदपत्रे मूळात उपलब्ध नसल्याने ही माहिती अपिलार्थीस त्यावेळी देण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीन मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. त्यापैकी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ शी संबंधित उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलाशाची मागणी केली आहे. जे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीस धरुन नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबाबतचे अथवा कोणत्याही निर्णयाबाबत खुलासे अथवा स्पष्टीकरणे मागविणे, हे अधिनियमातील तरतुदींशी पूर्णतया विसंगत आहे. त्यामुळै अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही खुलासा देय होत नाही. याही उपर श्रीमती कांता रामदास खोसे यांना नेमणूक देणे हा विषय कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांच्याशी सरळ संबंधित नाही. श्रीमती कांता रामदास खोसे यांची नेमणूक श्री बंकट स्वामी व्यवस्थापनाने केली असल्याचे आयोगाकडील उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत आहे. त्यामुळे श्रीमती कांता रामदास खोसे यांची नेमणूक कशी केली गेली, ही माहिती बंकट स्वामी महाविद्यालयाच्या व्यपस्थापनाकडेच उपलब्ध असू शकेल, त्यामुळे अपिलार्थीस या मुद्यावर माहिती हवी असल्यास, श्री बंकट स्वामी महाविद्यालय, जे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार एक स्वतंत्र सार्वजनिक प्राधिकरण आहे, त्यांच्याकडे श्रीमती कांता रामदास खोसे यांच्या नेमणूकीबाबतच्या अभिलेख्यांची तपासणी करण्यास स्वतंत्र अर्जाद्वारे मागणी करावी, म्हणजे त्यांना विचाराधीन अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती मिळू शकेल, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, श्री बंकटस्वामी महाविद्यालय या संस्थेने जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्रीमती कांता रामदास खोसे यांच्या पदास मान्यता देण्याचा प्रस्ताव मूळात पाठविला नव्हता तर हा प्रस्ताव बंकटस्वामी महाविद्यालयाने जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी, बीड यांच्याकडे या प्रकरणी पाठविणे येथे अभिप्रेत होते. जन माहिती अधिकारी यांची सर्वसाधारण कार्यपध्दती पाहता,अशाप्रकारचे प्रस्ताव

त्यांना जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी यांच्याकडून प्राप्त होत असताना, अपिलार्थीने उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांच्या कार्यालयाकडे ज्यावेळी या माहितीची मागणी केली होती, त्यावेळी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्या दि. १८.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिल्याचे दिसून येते. परंतु श्रीमती कांता रामदास खोसे यांच्या नेमणूकीबाबतचा प्रस्ताव जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण बीड यांच्या कार्यालयाकडून जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या दि. ०६.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे म्हणजे अपिलार्थीने या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केल्यानंतर प्राप्त झाला असून या प्रस्तावावर जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.०७.२००९ रोजी आपला निर्णय संबंधितांना कळविला आहे. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्याच्यादृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांना उपरोक्त प्रकरणी श्रीमती कांता रामदास खोसे यांच्या नेमणूकीबाबत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,बीड यांच्या कार्यालयाने त्यांच्याकडे पाठविलेल्या दि. ०६.०४.२००९ रोजीच्या पत्रासोबतचा संबंधित प्रस्ताव व जन माहिती अधिकारी यांनी दि. ०४.०७.२००९ रोजी त्यांना संबंधित जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकाऱ्यास परत केलेल्या प्रस्तावाची व त्यांच्या अभिप्रायाची प्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, जेणेकरुन अपिलार्थीस या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण माहिती प्राप्त होऊ शकेल.

वरील घटनाक्रमाचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडे उपलब्ध माहिती दिली आहे, ही माहिती अपिलार्थीस देण्याचे जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही असद्हेतूने टाळल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यामुळे त्यांच्यावर अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जातील विनंतीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेवर शास्तीची अथवा शिस्तभंगाच्या शिफारशी संबंधित कोणतीही कारवाई आयोग आदेशित करीत नाही. मात्र अपिलार्थीस माहिती उपलब्ध

होण्याच्यादृष्टीने, वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाच्या दि. ०४.०७.२००९ रोजीच्या पत्राची व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,बीड यांच्या कार्यालयाने दि.०६.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २५-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिनकर गोविंदराव मस्के, रा.मु.गवळवाडी,पो.पालवण, ता.जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक,व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी,प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकाल पत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११६०
निर्णय दिनांक २५-०८-२००९

१. श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, : अपिलार्थी
मु.पो.सताळा (खुर्द), ता.अहमदपूर,जि.लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपजिल्हाधिकारी,उदगीर,
जि.लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,उदगीर,
जि.लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपविभागीय अधिकारी,उदगीर, जि.लातूर
जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना न्यायालयीन कामकाजासाठी अत्यंत आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे बुध्दीपूर्वक टाळल्याने संबंधितांवर राज्य माहिती आयोगाकडून केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम कलम १८ (३) (ख) आणि २० अन्वये दंड व शिस्तभंगाची कारवाई होण्यासाठी त्यांनी आयोगाकडे सदर अर्ज केला आहे. तसेच अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये असेही नमूद केले आहे की, त्यांना अनावश्यक व दिशाभूल करणारी माहिती जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर उपलब्ध करुन दिलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९.०३.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी उदगीर यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

"१) इ.स.१९९१-९२ याच आर्थिक वर्षात महाराष्ट्र शासनाच्या रो.ह.यो.अंतर्गत फलोत्पादन योजनेमार्फत बँक धनादेशानेच ठोक खरेदी करण्यात आलेल्या पायाभूत रासायनिक खतांचे आणि रासायनिक औषधांचे शासनमान्य रेकॉर्डस् सत्यप्रतीत विनाविलंब उपलब्ध करुन घेण्यासाठी मा. उपविभागीय अधिकाऱ्यांनी लिखीत केलेल्या संपूर्ण कार्यवाहीची सत्यप्रतीत माहिती मला अत्यंत आवश्यक आहे.

२) इ.स. १९९१-९२ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र शासनाच्या रो.ह.यो.अंतर्गत फलोत्पादन योजनेच्या एम.बी.रजिस्टर क्रमांक ७२८२० मधील पान नं.२ व ७ मध्ये लिखीत नोंदवण्यात आलेल्या नोंदीनुसार सदर योजनेमार्फत वस्तुरुपानेच पुरवठा करण्यात येणाऱ्या पायाभूत रासायनिक खतांची आणि रासायनिक औषधांचा परस्पर अपहार केलेलाच असल्याचे सत्य व अचूक मूल्यमापन करवून घेण्यासाठी मा. उपविभागीय अधिकाऱ्यांनी लिखीत केलेल्या संपूर्ण कार्यवाहीची सत्यप्रतीत माहिती मला अत्यंत आवश्यक आहे.

करिता मे.साहेबांनी वरील प्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या रो.ह.यो.अंतर्गत फलोत्पादन योजनेतील भ्रष्टाचार निर्मुलनार्थ, मा. उपविभागीय अधिकाऱ्यांनी लिखीत पार पाडलेल्या संपूर्ण कार्यवाहीची सत्यप्रतीत माहिती मला उपलब्ध करुन देण्याची विनाविलंब व्यवस्था करावी."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट केली व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.८/- इतके चलनाद्वारे भरण्याचे सूचित करुन माहिती हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीस ही माहिती दि. १६.०४.२००८ रोजी प्रत्यक्षात उपलब्ध करुन देण्यात आली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने

अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २५.०४.२००८ रोजी परत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज उपविभागीय अधिकारी,उदगीर यांनी उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडे दि. २५.०४.२००८ रोजी पाठविला. त्या अनुषंगाने उपविभागीय कृषि अधिकाऱ्याने अपिलार्थीस दि. २८.०५.२००८ रोजी आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून सशुल्क घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस अपेक्षेप्रमाणे माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. २५.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी म्हणून ज्यांची नियुक्ती झाली आहे, अशा प्राधिकरणाकडून अद्यापपावेतो सुनावणी झाली नाही. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपिलीय प्राधिकरण म्हणून अपर जिल्हाधिकारी, लातूर यांची नियुक्ती झालेली आहे. सबब अपर जिल्हाधिकारी, लातूर तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दि. २५.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी लातूर यांनी अपिलार्थीच्या दि.२५.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हरिश्चंद्र शंकरराव महाळंकर, मु.पो.सताळा (खुर्द), ता.अहमदपूर,जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,उदगीर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११६१
निर्णय दिनांक २५-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. गणाचार्य सांब विश्वनाथ,<br>गंगाखेड,जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,गंगाखेड,जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, परभणी | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०६.२००८ रोजी नोंदविलेले व दि. २७.०८.२००८ रोजी फेर नोंदणी झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून गंगाखेड शहरातील सर्व्हेनंबर २४८ च्या संदर्भातील कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, तहसीलदार,गंगाखेड यांनी दिलेल्या ७/१२ च्या उताऱ्यावरुन कोणतीही माहिती स्पष्ट होत नाही तसेच या प्रकरणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांची जबानी त्या कार्यालयातील कारकुनाने लिहून घेतली परंतु तहसीलदार, गंगाखेड व उपविभागीय अधिकारी यांनी त्यांना वेळेच्या आत माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९.१२.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ

अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे गंगाखेड शहरातील सर्व्हेनंबर २४८ च्या संदर्भातील माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सर्व्हेनंबर २४८ ची मालकी कोणाची आहे, सर्व्हेनंबर २४८ मौ. गंगाखेड हे कोणाच्या मालकीचे आहे, सर्वे नं. २४८ मौ. गंगाखेडचे क्षेत्रफळ, या सर्वेनंबरच्या जमिनी कोणत्या प्रयोजनासाठी देण्यात आल्या आहेत, याबाबतचा क्षेत्रफळनिहाय,वर्षनिहाय मोबदल्याचा तपशील, वाटप करण्यात आलेल्या जमिनीचा किती मोबदला शासनास देण्यात आला व आज स.नं.२४८ मध्ये कोणती संस्था अथवा व्यक्ती काबीज आहेत व किती क्षेत्रफळ शिल्लक आहे ? तसेच अतिक्रमण धारकांच्या नोंदवहीची नक्कल -या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सर्व्हेनंबर २४८ च्या ७/१२ च्या प्रती व अतिक्रमण धारकाच्या नोंदवहीची नक्कल विनामूल्य उपलब्ध करुन दिली. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याचा पुरावा म्हणून अपिलार्थीची पोचसही असलेल्या कागदपत्रांच्या नकला जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केल्या. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले असल्याचे दिसून येत आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी मुद्देनिहाय माहिती पुरविलेली नाही.अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झालेल्या कथित माहितीवर अपिलार्थी हे समाधानी असल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून सर्व्हेनंबर २४८ च्या संदर्भातील संपूर्ण क्षेत्रफळाचा तपशील हवा असल्याचे दिसून येत आहे. मात्र असा तपशील उपलब्ध होण्याकरिता, या सर्व्हेनंबरची मोजणी होणे आवश्यक असल्याचे जन माहिती अधिकारी यांचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, आता या सर्व्हेनंबरची तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयाकडून एकदा मोजणी करुन घ्यावी व ही मोजणी झाल्यानंतर प्राप्त माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. तूर्तास त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार न हाताळून दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल जिल्हाधिकारी,परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्याच्या संदर्भात वरील निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे कार्यवाही करावी व तूर्तास हे आदेश निर्गमित होताच त्यांच्याकडे उपलब्ध असलेली मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरावावी.

३. जिल्हाधिकारी, परभणी यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणाचार्य सांब विश्वनाथ, काकाणी कॉम्प्लेक्स, नवा मोंढा, गंगाखेड, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगाखेड, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११६२

निर्णय दिनांक २५-०८-२००९

१ श्री. नारायण ग्यानबा बापमारे, : अपिलार्थी
रा. मंगरुळ नं. १, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, उपविभाग, माजलगांव, तालुका माजलगांव,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०७-२००७ रोजी नोंदविलेले व दिनांक २७-०६-२००८ रोजी फेर नोंदणी झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये निर्णय देऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर हजर नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती दिल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, अपिलार्थीने ज्या सहायक अभियंत्याकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी माहिती मागितली होती त्या सहायक अभियंत्यास दिनांक ३१-०१-२००७ रोजी अपघात झाला व त्यामुळे ते रजेवर गेले व परिणामी अपिलार्थीस विलंबाने माहिती प्राप्त झाली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त होण्याचे कारण म्हणजे संबंधित जन माहिती अधिकारी यांना झालेला अपघात असेच म्हणावे लागेल. तथापि सार्वजनिक प्राधिकरणामध्ये एखादा माहिती अधिकारी काही कारणास्तव रजेवर गेल्यास तात्काळ दुस-या अधिका-याची त्या पदावर नेमणूक करण्याची पध्दत रुढ आहे. त्यामुळे या प्रकरणात अपिलार्थीस माहिती देण्यासाठी निश्चितपणे

कोणत्या जन माहिती अधिका-याकडून विलंब लागला आहे याची कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, अंबाजोगाई यांनी चौकशी करावी व आवश्यकता वाटल्यास संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी अशी शिफारस त्यांना करण्यात येत आहे.

अपिलार्थीस प्राप्त झालेल्या माहितीच्या दर्ज्याबाबत अपिलार्थीने कोणतेही अभिप्राय आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये नोंदविलेले नाहीत अथवा त्यांचे अभिप्राय तोंडी युक्तिवादाव्दारे करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीचे त्यांच्या प्राप्त माहितीवर कोणतेही अभिप्राय नाहीत असे अनुमान काढण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, अंबाजोगाई यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग-विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नारायण ग्यानबा बापमारे, रा. मंगरुळ नं. १, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११६३

निर्णय दिनांक २५-०८-२००९

१ श्री. मोतीराम गयबू काळे, : अपिलार्थी
मु. जानापुरी, पो. वडेपुरी एस. आर. टी. तालुका लोहा,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,
अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही. अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००१ ते २००६ या कालावधीतील संपूर्ण

ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत झालेल्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत ही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०४-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, मात्र यासंदर्भात त्यांनी आपले कोणतेही आदेश पारीत केले नाहीत. अपिलार्थीच्या यासंदर्भात आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०४-२००८ रोजी सुनावणी ठेऊनही ती सुनावणी घेण्यात आली नाही.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर हजर नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोतीराम गयबू काळे, मु. जानापुरी, पो. वडेपुरी S.R.T., तालुका लोहा, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११६४

निर्णय दिनांक २५-०८-२००९

१ श्री. सुधीर प्रधान, : अपिलार्थी

पितृस्मृती ४, अशोकनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा अधीक्षक अभियंता कार्यालय, सार्वजनिक बांधकाम

विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. बी. जे. जोशी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड अंतर्गत कार्यरत असलेले शाखा अभियंता श्री. बी. जे. जोशी यांच्याबाबत चालू असलेल्या

चौकशी अहवालाची माहिती न देता दिशाभूल करणारी माहिती दिल्यामुळे दंडात्मक कार्यवाहीस्तव त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्रयस्थ पक्ष श्री. बी. जे. जोशी यांच्यावर विविध कारणास्तव चालू असलेल्या चौकशीच्या प्रती, श्री. बी. जे. जोशी यांच्याबाबतीत कार्यवाहीसाठी प्राप्त तक्रार अर्जाच्या प्रती, श्री. बी. जे. जोशी यांच्याबाबतीत नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या अधिका-याची पदनामनिहाय यादी, श्री. बी. जे. जोशी यांच्यावर कोणत्या प्रकारची कार्यवाही होणे अपेक्षित आहे याची लेखी स्वरुपात माहिती - ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज अधीक्षक अभियंता, नांदेड सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्याकडे केला होता. सदर अर्ज जन माहिती अधिकारी, अधीक्षक अभियंता, नांदेड सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड यांच्या कार्यालयाने या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०१-२००८ रोजी पाठविला व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांनी यानंतर दिनांक २९-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीसाठीचे एकूण ५५ रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने यापूर्वीच अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०१-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी हा निर्णय दिनांक १५-०३-२००८ रोजी सुनावणी घेऊन दिला होता. सुनावणीच्या वेळी दिलेल्या तोंडी आदेशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०३-२००८ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य

पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्रयस्थ पक्षासंदर्भात त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीची व त्यावर करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबतची सर्व उपलब्ध माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०३-२००८ रोजी पुरविली आहे. काही प्रकरणी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ यांच्या कार्यालयामार्फत चौकशी अद्याप पूर्ण व्हावयाची आहे व या कार्यवाहीची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे अद्यापपावेतो दक्षता व गुण नियंत्रण मंडळ यांच्याकडून अप्राप्त आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे तक्रारीच्या चौकशी अहवालाच्या प्रतीची मागणी केलेली आहे. तथापि यातील ज्या प्रकरणावर जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत कारवाई करण्यात आली आहे त्या सर्व प्रकरणाची माहिती त्यांनी अपिलार्थीस दिलेली आहे. अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या चौकशी अहवालाची प्रत अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध झालेली नाही, त्यामुळे त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीने अर्ज करतेवेळी त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध होती ती संपूर्ण माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अथवा अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही दिशाभूल करणारी कशी आहे हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नसल्याने व तसेच चालू असलेल्या चौकशीचे अहवाल उघड केल्याने अधिनिमातील कलम ८ (१)

मधील तरतुदींचा भंग होण्याची शक्यता असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुधीर प्रधान, पितृस्मृती ४, अशोकनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११६५

निर्णय दिनांक २५-०८-२००९

१ श्री. मोहंमद अन्वरउल्ला खान, : अपिलार्थी

९-४-५५५, कय्युम प्लॉटस्, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,

नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (उत्तर), नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली असता त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी

दिनांक ०२-०४-२००८ रोजीच्या निर्णयाव्दारे अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शासकीय तंत्रनिकेतन नांदेड येथील नवीन व जुन्या इमारतीवर दुरुस्तीच्या झालेल्या कामासंदर्भात सन २००६-०७ व २००७-०८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०४-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही अपिलार्थीस त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज सादर करेपर्यंत माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिनांक २१-०८-२००९ रोजी दिल्याचे आयोगास अवगत केले व अपिलार्थीस ही माहिती दिनांक २१-०८-२००९ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीची पोचसही त्यांनी आयोगास सादर केली. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे लेखी युक्तिवाद सादर केला, त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतर त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली. त्यांच्या अधिनस्त त्यांचे या प्रकरणाशी संबंधित सहाय्यक अधिकारी / कर्मचारी यांना त्यांच्या कार्यालयाने वेळोवेळी लेखी सूचना देऊनही, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध न करुन दिल्यामुळे, ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न उपलब्ध करुन देण्यासाठी श्री. पी. पी. देशपांडे, तत्कालीन उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (उत्तर), नांदेड, श्री. बी. जे. जोशी, तत्कालीन शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (उत्तर), नांदेड व तत्कालीन लेखापरिक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड कार्यालय हे जबाबदार असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीस ही माहिती सर्वसाधारण परिस्थितीत दिनांक ०८-०२-२००८ रोजी अगर तत्पूर्वी उपलब्ध होणे अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत असतांना देखील अपिलार्थीस ही माहिती अंदाजे एक वर्ष व सात महिने इतक्या विलंबाने जन माहिती अधिकारी यांनी पुरविल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) मध्ये जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक / कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देण्यासाठी नांदेड सार्वजनिक बांधकाम विभागातील श्री. देशपांडे, उप अभियंता, श्री. जोशी, शाखा

अभियंता व श्री. डी. आर. वाघमारे, लेखा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग हे एकत्रितपणे जबाबदार असल्याचे आढळून येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना श्री. पी. पी. देशपांडे, तत्कालीन उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (उत्तर), नांदेड, श्री. बी. जे. जोशी, तत्कालीन शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (उत्तर), नांदेड व तत्कालीन लेखापरिक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड कार्यालय श्री. डी. आर. वाघमारे यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश देण्यात येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना श्री. पी. पी. देशपांडे, तत्कालीन उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (उत्तर), नांदेड, श्री. बी. जे. जोशी, तत्कालीन शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (उत्तर), नांदेड व तत्कालीन लेखापरिक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड कार्यालय श्री. डी. आर.

वाघमारे यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मोहंमद अन्वरउल्ला खान, ९-४-५५५, कय्युम प्लॉटस्, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (उत्तर), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११६६

निर्णय दिनांक २५-०८-२००९

१ श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. धुमाकूळ,
सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, कार्यालय, भोकर, तालुका भोकर,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०८-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे किनवट व माहूर तालुक्यामध्ये चालू असलेल्या स्टोन क्रेशरच्या संदर्भात सन २००७ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या तालुक्यातील स्टोन क्रेशरवर चालू असलेल्या विद्युत मोटारी किती अश्वशक्तीच्या आहेत व या प्रकरणी दरमहा येत असलेल्या विद्युत बिलाच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व प्राप्त झालेली माहिती अपिलार्थीस चुकीची व खोटी असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात कोणताही निर्णय दिल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची व खोटी असल्याचे का वाटते याचे स्पष्टीकरण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिनांक २४-०३-२००८ रोजी दिलेल्या पत्रामध्ये केले आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी ते स्वतः अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती प्राप्त झाली

आहे परंतु ती त्यांना खोटी व चुकीची असल्याचे वाटत आहे. तेव्हा या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या स्तरावर अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होणे आयोगास या टप्प्यावर गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, भोकर, जिल्हा नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील. (जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची व त्यांच्या दिनांक ०८-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे).

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, भोकर, जिल्हा नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, सा. धुमाकूळ, सरस्वती कॉलनी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (सोबत : अपिलार्थीच्या दिनांक ०१-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची व दिनांक ०८-०२-००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत)

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११६७

निर्णय दिनांक   २५-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. किरण माणिकराव यादव,<br>आराधवाडी, तालुका तुळजापूर,<br>जिल्हा उस्मानाबाद | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सिंदफळ,<br>तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,<br>तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद | : प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही दखल घेतली नाही, त्यांना माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली, त्यांच्याशी चुकीचा पत्रव्यवहार केला त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी या अपिलाची सुनावणी न घेता माहिती अधिकार कायद्याची पायमल्ली केली आहे, त्यामुळे संबंधितावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सिंदफळ ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये यशवंत ग्राम समृध्दी योजना, बारावा वित्त आयोग, जवाहर योजना, दलित वस्ती सुधारणा या योजनेअंतर्गत झालेल्या कामासंदर्भात सन २००६ ते २००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सर्व कामांची फंडनिहाय यादी, अंदाजपत्रकीय रक्कम, पाहणी अहवालाच्या प्रती, कामे अंदाजपत्रकाप्रमाणे झाली आहेत काय, अंदाजपत्रकापेक्षा कमी किंवा जास्त असल्यास त्यांची टक्केवारी, सदरील सिमेंट कॉंक्रीट कामाचे टेस्ट रिपोर्ट, चालू वर्षात एकूण चालू कामांची संख्या, त्यांची अंदाजपत्रकीय रक्कम व कार्यारंभ आदेशाच्या प्रती व ग्रामपंचायतीमध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अर्जाच्या सत्यप्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थी सदर अर्ज ग्रामसेवक, ग्रामपंचायत सिंदफळ यांना देण्यासाठी गेले होते, परंतु ग्रामसेवक जागेवर उपस्थित नसल्याने त्यांनी सदर अर्ज पंचायत समितीच्या कार्यालयामार्फत ग्रामसेवकाकडे हस्तांतरीत केलेला आहे. गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे ग्रामसेवक, ग्रामपंचायत सिंदफळ यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती विहित मुदतीत पुरविण्याची सूचना केली. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०६-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि यावर कोणताही निर्णय पारीत केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. अपिलार्थीस अशा प्रकारे माहितीसाठीच्या प्रथम अर्जास व अपील अर्जास सर्व संबधितांकडून

नकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केल्याचे दिसून येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी ते स्वतः अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ वगळता उर्वरित ५ मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने उर्वरित पाच मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्यामुळे ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सिंदफळ यांनी अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे देणे भाग आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची मुदत व्यपगत झाली असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनमूल्य देणे भाग आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप लक्षात घेता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक तीन वगळता उर्वरित पाच मुद्दयांवरील संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत न देऊन अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. आज रोजी संबंधित ग्रामसेवक आयोगामोर उपस्थित नाहीत, त्यांना त्यांच्या बचावासाठी एक संधी देण्याच्या दृष्टीने संबधित ग्रामसेवक,

ग्रामपंचायत कार्यालय, सिंदफळ यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांना या प्रकरणी विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय विलंब लावल्याचे जन माहिती अधिकारी यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक तीन वगळता उर्वरित पाच मुद्दयांवरील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सिंदफळ यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २५-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. किरण माणिकराव यादव, आराधवाडी, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, सिंदफळ, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/ १३६२

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री.शर्मा अनिल एस., ... अपिलार्थी
रा.राळेगणसिध्दी,ता.पारनेर,जि.अहमदनगर

**विरुध्द**

२) शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, बीड ... जन माहिती अधिकारी

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, ... जन अपिलीय अधिकारी
जिल्हा परिषद, बीड

**निर्णय**

श्री.शर्मा अनिल एस.,रा.राळेगणसिध्दी,ता.पारनेर, जि.अहमदनगर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १२-०६-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २९-११-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक १२-०६-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर २१ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.शर्मा अनिल एस. रा.राळेगणसिध्दी,ता.पारनेर,जि.अहमदनगर यांना (युपीसीद्वारे)
२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, बीड
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड
२. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/ १३६४

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.शिवदास दामोधर शहाणे,<br>रा.अंबड, जि.जालना | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी,जि.जालना | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | उपविभागीय कृषि अधिकारी,<br>परतूर, जि.जालना | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.शिवदास दामोधर शहाणे, रा.अंबड, जि.जालना यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०५-०७-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ११-०६-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १२-०७-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेउुन दिनांक १३-०७-२००७ रोजी आपले आदेश पारित केले होते. या आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक ०५-०७-२००८ रोजी माहिती अधिकारी अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ६ महिने १९ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.शिवदास दामोधर शहाणे, रा.अंबड, जि.जालना यांना (युपीसीद्वारे)
२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी,जि.जालना
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जि.जालना
२. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/ १३६८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री.पवार छगन बाजीराव, मु.पो.बुवासाहेब नगर ,... अपिलार्थी
ता.कर्जत, जि.अहमदनगर

**विरुध्द**

२) मुख्याध्यापक, श्री.भैरवनाथ विद्यालय, ... जन माहिती अधिकारी
निमगांव गांगर्डा, ता.कर्जत, जि.अहमदनगर

३) मानद सचिव, यशवंत शिक्षण संस्था, ... जन अपिलीय अधिकारी
ता.कर्जत, जि.अहमदनगर

**निर्णय**

श्री.पवार छगन बाजीराव, मु.पो.बुवासाहेब नगर (पेट्रोलपंपाजवळ), ता.कर्जत, जि.अहमदनगर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २२-०२-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०३-०८-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०३-०८-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी

यांनी दिनांक २२-०२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर २ महिने १९ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.पवार छगन बाजीराव, मु.पो.बुवासाहेब नगर (पेट्रोलपंपाजवळ), ता.कर्जत, जि.अहमदनगर यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.भैरवनाथ विद्यालय,निमगांव गांगर्डा, ता.कर्जत, जि.अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा मानद सचिव, यशवंत शिक्षण संस्था, ता.कर्जत, जि.अहमदनगर

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११३६

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग,<br>रा.उदगीर, जि.लातूर | ... | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| २) | नगर परिषद,<br>उदगीर, जि.लातूर | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | विभागीय आयुक्त,<br>विभागीय आयुक्त कार्यालय,<br>औरंगाबाद | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग, रा.दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १९-०६-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २५-०९-२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १५-११-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक ३१-०१-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक १९-०६-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, प्रस्तुत व्दितीय अपिलात पूर्वी दि.२४.०४.२००८ रोजी मा.आयोगाने दिलेल्या निर्णयाचे जन माहिती अधिकारी यांनी पालन केले नसल्यामूळे मूळ अर्ज व प्रथम अपील तेच ठेवून सादर केले आहे.

एकदा अपीलावर निर्णय झाल्यावर त्यासंबंधी पुन्हा नव्याने अपील / रिव्हीजन ॲप्लीकेशन करता येत नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अब्दुल रहेमान ईस्माईल मलंग, दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद, उदगीर, जि.लातूर

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७८७

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. अमृतलाल लक्ष्मण भुरेवाले,<br>रा.जालना | ... | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| २) | अधिक्षक,भूमी अभिलेख,<br>जालना | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | उपसंचालक, भूमी अभिलेख,<br>औरंगाबाद | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.अमृतलाल लक्ष्मण भुरेवाले, पोस्ट ऑफिस रोड, काली कुर्ती, जालना यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २८-०४-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १३-१२-२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २४-०७-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक २०-१२-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक २८-०४-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे जन अपीलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आंत प्रस्तुत अपील दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १ महिना ८ दिवस विलंबाने

दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री. अमृतलाल लक्ष्मण भुरेवाले, पोस्ट ऑफिस रोड, काली कुर्ती, जालना यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, भूमी अभिलेख, जालना

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, भूमी अभिलेख, औरंगाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३७१/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.अनंत मधुकर लिहीणे,<br>रा.कर्जत, जि.अहमदनगर | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय,<br>अहमनगगर | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | जिल्हाधिकारी, अहमदनगर | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.अनंत मधुकर लिहीणे, रा.कर्जत, जि.अहमदनगर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०२-०२-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २२-०६-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २९-०८-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक ०२-०२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर २ महिने ०३ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.कन्हैयालाल छबुलाल जळगांवकर, १२, अनुपम हौसींग सोसायटी,शिंदे नगर, दादावाडीसमोर,जळगांव-४२५००१यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमनगगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/७७४/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.बलभीम प्रल्हाद आडसुळ,<br>मु.भोगजी, पो.रोलू, ता.कळंब<br>जि.उस्मानाबाद | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,<br>कळंब, जि.उस्मानाबाद | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख,<br>कळंब, जि.उस्मानाबाद | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री. बलभीम प्रल्हाद आडसुळ, मु.भोगजी,पो.रोलू,ता.कळंब,जि.उस्मानाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १५-०४-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १५-०४-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २४-०५-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक १५-०४-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १० महिने २१ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.बलभीम प्रल्हाद आडसुळ, रा.भोगजी, पो.रोलू, ता.कळंब, जि.उस्मानाबाद यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, कळंब, जि.उस्मानाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, कळंब, जि.उस्मानाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३७३/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री. चव्हाण पंडीत शेषराव, जिल्हा स्टेडीअम, उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद ... अपिलार्थी

**विरुध्द**

२) सह संचालक, क्रीडा व युवकसेवा, सचालनालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे ... जन माहिती अधिकारी

३) संचालक, क्रीडा व युवकसेवा, सचालनालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे ... जन अपिलीय अधिकारी

**निर्णय**

श्री. चव्हाण पंडीत शेषराव, जिल्हा स्टेडीअम, उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ३१-०३-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०७.०७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २३-०९-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १२-११-२००७ रोजी पारित केले आहे. सदर आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक ३१-०३-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपीलाचे निर्णयापासून ९० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १ महिने १७ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील

दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री. चव्हाण पंडीत शेषराव, जिल्हा स्टेडीअम, उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद, यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा सह संचालक, क्रीडा व युवकसेवा, सचालनालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, क्रीडा व युवकसेवा, सचालनालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३६९/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.गोविंद तानाजी शिलवट,<br>,शिवकृपा, महालक्ष्मीनगर, जेलरोड, नाशिक-४२२१०१ | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),<br>नाशिक शहर, नाशिक | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),<br>नाशिक शहर, नाशिक | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.गोविंद तानाजी शिलवट,शिवकृपा, महालक्ष्मीनगर, जेलरोड, नाशिक-४२२१०१ यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १६-०७-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०९-०१-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २९-०२-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक १६-०७-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १ महिने १६ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.गोविंद तानाजी शिलवट,शिवकृपा, महालक्ष्मीनगर, जेलरोड, नाशिक-४२२१०१ यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), नाशिक शहर, नाशिक

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), नाशिक शहर, नाशिक

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३८३/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री.कृष्णा बालाजीराव शिंदे, ... अपिलार्थी
मु.जोमेगांव, पो.उमरा, ता.लोहा,
जि.नांदेड

**विरुध्द**

२) तहसील कार्यालय, लोहा ... जन माहिती अधिकारी
जि.नांदेड

३) तहसीलदार, लोहा, ... जन अपिलीय अधिकारी
जि.नांदेड.

**निर्णय**

श्री.कृष्णा बालाजीराव शिंदे, मु.जोमेगांव, पो.उमरा, ता.लोहा, जि.नांदेड यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०७-०७-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १४-११-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २२-०१-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक ०७-०७-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १ महिने १६ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.कृष्णा बालाजीराव शिंदे, मु.जोमेगांव, पो.उमरा, ता.लोहा, जि.नांदेड यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, लोहा, जि.नांदेड

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहा, जि.नांदेड

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३७२/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.कन्हैयालाल छबुलाल जळगांवकर,<br>१२, अनुपम हौसींग सोसायटी,शिंदे नगर,<br>दादावाडीसमोर,जळगांव-४२५००१ | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | अध्यक्ष, वकील संघ खंडपीठ,<br>औरंगाबाद | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | अध्यक्ष, वकील संघ खंडपीठ,<br>औरंगाबाद | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.कन्हैयालाल छबुलाल जळगांवकर, १२, अनुपम हौसींग सोसायटी,शिंदे नगर, दादावाडीसमोर,जळगांव-४२५००१ यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०८.०५.२००७ (फेरसादर- २५.०६.२००८) रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १५-०७-२००५ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे कोणतेही प्रथम अपील दाखल केले नाही. त्यांनी दिनांक ०८-०५-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये थेट द्वितीय अपील आयोगासमोर दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, प्रस्तुतचे अपील महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००२ मधील तरतुदीअंतर्गत केलेल्या अर्जासंदर्भातील आहे तथापि हा कायदा आता निरसित झाला असल्यामूळे व माहिती अधिकार अधिनियम २००५ हा नवीन कायदा १२ ऑक्टोबर २००५ आता अस्तित्वात असल्याने या आयोगास मुळात अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय घेण्याची अधिकारीता रहात नसल्याने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.कन्हैयालाल छबुलाल जळगांवकर, १२, अनुपम हौसींग सोसायटी,शिंदे नगर, दादावाडीसमोर,जळगांव-४२५००१यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, वकील संघ खंडपीठ, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, वकील संघ खंडपीठ, औरंगाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३७०

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.कन्हैयालाल छबुलाल जळगांवकर,<br>१२, अनुपम हौसींग सोसायटी,शिंदे नगर,<br>दादावाडीसमोर,जळगांव-४२५००१ | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | मुख्य राजशिष्टाचार अधिकारी,<br>सा.प्र.विभाग, मंत्रालय, मुंबई | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | मुख्य राजशिष्टाचार अधिकारी,<br>सा.प्र.विभाग, मंत्रालय, मुंबई | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.कन्हैयालाल छबुलाल जळगांवकर, १२, अनुपम हौसींग सोसायटी,शिंदे नगर, दादावाडीसमोर,जळगांव-४२५००१ यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०१-०५-२००७ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०६.२००८ रोजी फेर नोंदणी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २५-१२-२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे विहीत मुदतीत प्रथम अपील दाखल केलेले नाही. अपिलार्थी यांनी दिनांक २५-०६-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने विहीत मुदतीत प्रथम अपील केलेले नाही. तसेच राज्य माहिती आयोगाकडे केलेले द्वितीय अपीलसुध्दा मूळ अर्जानंतर एक वर्ष ४ महिने इतक्या विलंबाने केलेले आहे. सबब,खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.कन्हैयालाल छबुलाल जळगांवकर, १२, अनुपम हौसींग सोसायटी,शिंदे नगर, दादावाडीसमोर,जळगांव-४२५००१ (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३८१

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. कचरु रामभाऊ टकळे, मु.पो. आंदोरा, ता. कळंब, जिल्हा उस्मानाबाद | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद उस्मानाबाद | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद | ... | जन अपिलीय अधिकारी |

**<u>निर्णय</u>**

श्री. कचरु रामभाऊ टकळे, मु.पो. आंदोरा, ता. कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०३-०६-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २४.०३.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक ०५-०५-२००८ रोजी पारित केले आहेत. सदर आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०६-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, उपरोक्त व्दितीय अपिलास विहीत शुल्काचा कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नाही. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसुचना क्र. आर.टी.आय. २००५ /सी.आर. ३१५/०५/५, दि.११.१०.२००५ अन्वये व्दितीय अपील विहित शुल्कासह दाखल करणे अनिवार्य आहे. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कचरु रामभाऊ टकळे, मु.पो. आंदोरा, ता. कळंब, जिल्हा उस्मानाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३७६/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री. कचरु रामभाऊ टकळे, मु.पो. आंदोरा, ता. कळंब, जिल्हा उस्मानाबाद ... अपिलार्थी

**विरुध्द**

२) गट विकास अधिकारी,पंचायत समिती, कळंब जिल्हा उस्मानाबाद ... जन माहिती अधिकारी

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद ... जन अपिलीय अधिकारी

**निर्णय**

श्री. कचरु रामभाऊ टकळे, मु.पो. आंदोरा, ता. कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०३-०६-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०६.०२.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १७-०३-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सुनावणी घेण्यात आलेली नाही. अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०६-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, उपरोक्त व्दितीय अपिलास विहीत शुल्काचा कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नाही. शासनाच्या सामान्य प्रशासन

विभागाच्या अधिसुचना क्र. आर.टी.आय. २००५ /सी.आर. ३१५/०५/५, दि.११.१०.२००५ अन्वये व्दितीय अपील विहित शुल्कासह दाखल करणे अनिवार्य आहे. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कचरु रामभाऊ टकळे, मु.पो. आंदोरा, ता. कळंब, जिल्हा उस्मानाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,पंचायत समिती, कळंब, जिल्हा उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३७७/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री. कचरु रामभाऊ टकळे, मु.पो. आंदोरा, ता. कळंब, जिल्हा उस्मानाबाद ... अपिलार्थी

**विरुध्द**

२) समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद उस्मानाबाद ... जन माहिती अधिकारी

३) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद ... जन अपिलीय अधिकारी

**निर्णय**

श्री. कचरु रामभाऊ टकळे, मु.पो. आंदोरा, ता. कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०३-०६-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २६.०३.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०७-०४-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक ०५-०५-२००८ रोजी पारित केले आहेत. सदर आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक ०३-०६-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, उपरोक्त व्दितीय अपिलास विहीत शुल्काचा कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नाही. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसुचना क्र. आर.टी.आय. २००५ /सी.आर. ३१५/०५/५, दि.११.१०.२००५ अन्वये व्दितीय अपील विहित शुल्कासह दाखल करणे अनिवार्य आहे. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कचरु रामभाऊ टकळे, मु.पो. आंदोरा, ता. कळंब, जिल्हा उस्मानाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३८९/१३९०/१३९१/१३९२/२००८

निर्णय दिनांक : ०१-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सौ.लिलावती अशोक कोल्हे,<br>५३, गांधीनगर, जिल्हापेठ, जळगांव | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

सौ.लिलावती अशोक कोल्हे, ५३, गांधीनगर, जिल्हापेठ, जळगांव यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०२-०७-२००७ फेरसादर ०२-०४-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे त्यानी दाखल केलेली चार द्वितीय अपीले आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०३-०९-२००५ रोजीच्या चार स्वतंत्र अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०६-१०-२००५ रोजी प्रथम अपीले दाखल केली होती. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेउुन दिनांक ०२-०३-२००७ रोजी आपले आदेश पारित केले होते. या आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक ०२-०७-

२००७ रोजी माहिती अधिकारी अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, प्रस्तुतचे अपील जून्या कायद्याखाली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी उशीरा निर्णय दिले असल्याचे दिसते. तथापि त्यानंतर मूळ कायदा निरसित झाला असल्यामुळे द्वितीय अपील करता येत नाही. जी द्वितीय अपिले, विहीत तारखेपर्यत म्हणजेच १२ ऑक्टोबर,२००५ पर्यत दाखल झाली असतील त्यावरच उपलोकायुक्त यांनी निर्णय देणे अपेक्षित होते. व या तारखेनंतर जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेल्या माहितीच्या अर्जासंदर्भात कलम १९ मधील प्रक्रिया पूर्ण करुन सादर केलेल्या व्दितीय अपिलावर आयोगाने निर्णय देणे अपेक्षित आहे. प्रस्तुत चारही अपिले विहीत मुदतीनंतर सादर केली असल्यामुळे  खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपिलार्थीची चारही अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक :   २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. सौ.लिलावती अशोक कोल्हे, ५३, गांधीनगर, जिल्हापेठ, जळगांव यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२१८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री.मलंग अब्दुल रहेमान मो.इस्माईल, ... अपिलार्थी
रा.दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर

**विरुध्द**

२) मुख्याध्यापक, ... जन माहिती अधिकारी
हजरत मियॉ शॉ खादरी उर्दू प्रा.शा.
वाढवणा (बु), ता.उदगीर, जि.लातूर

३) सचिव, ... जन अपिलीय अधिकारी
डॉ.झाकेर हूसेन शिक्षण प्रसारक मंडळ
व्दारा संचलित हजरत मिर्या शॉ खादरी उर्दू
प्रा.शा. वाढवणा (बु), ता.उदगीर, जि.लातूर

**निर्णय**

श्री.मलंग अब्दुल रहेमान मो.इस्माईल, रा.दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०४-१२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २२-०१-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २७-०५-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी

यांनी दिनांक ०४-१२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर २ महिने १० दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.मलंग अब्दुल रहेमान मो.इस्माईल, रा.दबीरपुरा, उदगीर, जि.लातूर यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, हजरत मियॉ शॉ खादरी उर्दू प्रा.शा. वाढवणा (बु), ता.उदगीर, जि.लातूर

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, डॉ.झाकेर हूसेन शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचलित हजरत मियॉ शॉ खादरी उर्दू प्रा.शा. वाढवणा (बु), ता.उदगीर, जि.लातूर

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३८५

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मोहमंद रईसोद्दीन मो.शुजाउद्दीन,<br>रा.औरंगाबाद | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>औरंगाबाद | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,<br>औरंगाबाद | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.मोहमंद रईसोद्दीन मो.शुजाउद्दीन, घर नं. ३-१-६२, बारुदगरनाला, औरंगाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ११-०४-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ११-०१-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०३-०८-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक ३१-०८-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक ११-०४-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे जन अपीलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आंत प्रस्तुत अपील दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ४ महिने ११ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.मोहमंद रईसोद्दीन मो.शुजाउद्दीन, घर नं. ३-१-६२, बारुदगरनाला, औरंगाबाद यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३७५/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा. नांदगाव ... अपिलार्थी
पो. गांजुर, ता. चाकूर, जि. लातूर

**विरुध्द**

२) तलाठी सज्जा गांजुर, ता. चाकूर, जि. लातूर ... जन माहिती अधिकारी

३) मंडळ अधिकारी कार्यालय, वडवळ (ना), ... जन अपिलीय अधिकारी
वडवळ (ना) ता.चाकूर, जिल्हा लातूर

**निर्णय**

श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा. नांदगाव, पो. गांजुर, ता. चाकूर, जि. लातूर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०८-०८-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २१-०२-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २९-०३-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक ०८-०८-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १ महिने २ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा. नांदगाव, पो. गांजुर, ता. चाकूर, जि. लातूर (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी सज्जा गांजुर, ता. चाकूर, जि. लातूर

३. जन अपिलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी कार्यालय, वडवळ (ना) ता.चाकूर, जिल्हा लातूर

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३८२/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री. नारायन गुलाबचंद बन्सवाल, ... अपिलार्थी
५-११-२०, पदमपूरा औरंगाबाद

**विरुध्द**

२) सहायक संचालक, नगररचना औरंगाबाद ... जन माहिती अधिकारी

३) आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद ... जन अपिलीय अधिकारी

**निर्णय**

श्री. नारायन गुलाबचंद बन्सवाल, ५-११-२०, पदमपूरा औरंगाबाद, यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०४-०२-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २३.०६.२००६/२८.०७.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १३-०९-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक ०६-१०-२००६ रोजी पारित केले आहे. सदर आदेशप्राप्त झाले नसल्यामूळे अपिलार्थी यांनी दिनांक ०४-०२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपीलाचा निर्णय झाला नसल्यास अपिल दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १ वर्ष १७ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री. नारायन गुलाबचंद बन्सवाल, ५-११-२०, पदमपूरा औरंगाबाद. (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना औरंगाबाद.

३. जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त महानगरपालिका, औरंगाबाद.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/ १३६७

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.पवार गुंडू हरिसींग,<br>मु.पो.नाईकनगर, सुंदरवाडी,<br>ता.उमरगा,जि.उस्मानाबाद | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | वन परिमंडळ अधिकारी, तालुका कार्यालय,<br>उमरगा, जि.उस्मानाबाद | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | उपविभागीय वन अधिकारी<br>उस्मानाबाद | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.पवार गुंडू हरिसींग, मु.पो.नाईकनगर,सुंदरवाडी, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २७-०६-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २८-०७-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १३-१२-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक २७-०६-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर २ महिने १४ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.पवार गुंडू हरिसींग, मु.पो.नाईकनगर, सुंदरवाडी, ता.उमरगा,जि.उस्मानाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिमंडळ अधिकारी, तालुका कार्यालय, उमरगा, जि.उस्मानाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी,उस्मानाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३८०/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री. रमेशचंद श्रीरामजी रामावत, माहिती अधिकारमंच ... अपिलार्थी
जेल कॉर्नर अंबाजोगाई, जि. बीड

**विरुध्द**

२) सर्कल वार्ड कर्मचारी (सहायक), उपविभागीय ... जन माहिती अधिकारी
कार्यालय, अंबाजोगाई

३) अप्पर जिल्हाधिकारी, बीड ... जन अपिलीय अधिकारी

**निर्णय**

श्री. रमेशचंद श्रीरामजी रामावत, माहिती अधिकारमंच, जेल कॉर्नर अंबाजोगाई, जि. बीड यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २४-०४-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २१-०९-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २०-१२-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३.०१.०७ रोजी आदेश पारित केले. सदर आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक २४-०४-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील अपीलाचा निर्णय प्राप्त झाल्यापासून दिवसांच्या आंत दाखल केले नसून

ते अनुज्ञेय कालावधीनंतर १ वर्ष १८ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री. रमेशचंद श्रीरामजी रामावत, माहिती अधिकारमंच, जेल कॉर्नर अंबाजोगाई, जि. बीड यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा सर्कल वार्ड कर्मचारी (सहायक), उपविभागीय कार्यालय, अंबाजोगाई

३. जन अपिलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, बीड

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३६३/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री.साईनाथ देवराम लंबे, ... अपिलार्थी

रा.पिंप्री अवघड, ता.राहुरी, जि.अहमदनगर

**विरुध्द**

२) ग्रामसेवक, ग्राम पंचायत, पिंप्री अवघड ... जन माहिती अधिकारी

ता.राहुरी, जि.अहमदनगर

३) गट विकास अधिकारी, ... जन अपिलीय अधिकारी

पंचायत समिती, राहुरी, जि.अहमदनगर

**निर्णय**

श्री.साईनाथ देवराम लंबे, रा.पिंप्री अवघड, ता.राहुरी, जि.अहमदनगर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ११-१२-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १६-०८-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १३-११-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवली होती तथापि कोणतेही आदेश पारित न केल्यामूळे अपिलार्थी यांनी दिनांक ११-१२-२००८ रोजी माहिती अधिकारी अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ८ महिने २१ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.साईनाथ देवराम लंबे,रा.पिंप्री अवघड, ता.राहुरी, जि.अहमदनगर यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत, पिंप्री अवघड ता.राहुरी, जि.अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, राहुरी, जि.अहमदनगर

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३६६/०८
निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. सलीम कासम पटेल वाहेगांवकर,<br>मलीक अंबर नगर, किराडपुरा,औरंगाबाद | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | व्यवस्थापक, वसंतराव नाईक वि.जा.व<br>भ.ज.विकास महामंडळ, औरंगाबाद | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | व्यवस्थापक, वसंतराव नाईक वि.जा.व<br>भ.ज.विकास महामंडळ, औरंगाबाद | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री. सलीम कासम पटेल वाहेगांवकर, मलीक अंबर नगर, किराडपुरा,औरंगाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १६-०६-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०३-१२-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाही. या अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झ ाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक १६-१०-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील जन अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसाच्या आंत प्रस्तुत अपील दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर २ महिने १३ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री. सलीम कासम पटेल वाहेगांवकर, मलीक अंबर नगर, किराडपुरा,औरंगाबाद यांना (युपीसीद्वारे)
२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, वसंतराव नाईक वि.जा.व भ.ज.विकास महामंडळ, औरंगाबाद
३. जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापक, वसंतराव नाईक वि.जा.व भ.ज.विकास महामंडळ, औरंगाबाद
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३८४/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.शर्मा राजेंद्र हरीनारायण,<br>रा.नांदेड | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | तहसील कार्यालय, मुखेड<br>जि.नांदेड | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | तहसीलदार, मुखेड<br>जि.नांदेड. | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.शर्मा राजेंद्र हरीनारायण, एस.पी.ऑफिसच्या मागे, वजिराबाद, नांदेड यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १६-०७-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २५-०१-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक १६-०७-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १ महिने २१ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.शर्मा राजेंद्र हरीनारायण, संपादक, नांदेड पोलखोल, एस.पी.ऑफिसच्या मागे, वजिराबाद, नांदेड यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, मुखेड, जि.नांदेड

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, जि.नांदेड

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३६५/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री.शिवदास दामोधर शहाणे, ... अपिलार्थी
रा.अंबड, जि.जालना

**विरुध्द**

२) तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी,जि.जालना ... जन माहिती अधिकारी

३) उपविभागीय कृषि अधिकारी, ... जन अपिलीय अधिकारी
परतूर, जि.जालना

**निर्णय**

श्री.शिवदास दामोधर शहाणे, रा.अंबड, जि.जालना यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०५-०७-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ११-०६-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १२-०७-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी ठेवली होती परंतू कोणतेही आदेश पारीत न केल्यामूळे अपिलार्थी यांनी दिनांक ०५-०७-२००८ रोजी माहिती अधिकारी अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ६ महिने १९ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.शिवदास दामोधर शहाणे, रा.अंबड, जि.जालना यांना (युपीसीद्वारे)
२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी,जि.जालना
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, जि.जालना
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२३१९/२००७

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.वसंत संपतराव मुंडे,<br>रा.परळी वैजनाथ, जि.बीड. | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | तालुका कृषी अधिकारी,<br>तालुका कृषी अधिकारी कार्यालय,<br>परळी वैजनाथ, जि.बीड | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | उपविभागीय कृषी अधिकारी,<br>उपविभाग, अंबाजोगाई, जि.बीड. | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.वंसत संपतराव मुंडे, रा.परळी वैजनाथ, बीड यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०७.११.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १८.१२.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १९.०१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक ०७.११.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ५ महिने ०९ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २५-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.वसंत संपतराव मुंडे, रा.गौरीकुंज, मार्केट, परळी वैजनाथ, ता.परळी, जि.बीड
२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, परळी वैजनाथ, जि.बीड
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, उपविभाग, अंबाजोगाई, जि.बीड
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३७८/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) व्यंकटराव नरसिंमलू सुंकरवार, रा. पो.राजेंन्द्रनगर किनवट, ता. किनवट जि. नांदेड-४३१८०४ ... अपिलार्थी

**विरुध्द**

२) मुख्याधिकारी, नगरपालिका कार्यालय, किनवट ... जन माहिती अधिकारी

३) जिल्हाधिकारी, नांदेड ... जन अपिलीय अधिकारी

**निर्णय**

व्यंकटराव नरसिंमलू सुंकरवार, रा. पो.राजेंन्द्रनगर, किनवट, ता. किनवट जि. नांदेड-४३१८०४ यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ३१-०५-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २४-०५-२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २१-०५-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक ३१-०५-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत प्रथम अपील विहीत मुदतीत दाखल केले नव्हते. अपिलार्थी यांनी त्यानंतर लगेच व्दितीय अपील दाखल केले आहे. मूळ अर्जाचे दिनांकापासून २ महिन्याचे आत प्रथम अपील व त्या अपिलासंबंधी अपिल तारखेपासून ४ महिन्याचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. या प्रकरणी

अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी व्यंकटराव नरसिंमलू सुंकरवार, रा. पो.राजेंन्द्रनगर यांनी (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपालिका कार्यालय, किनवट

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, नांदेड

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३७९/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री. विठ्ठल सांडु डवणे (कुंभार), रा.मु.पो. पळशी ता. सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद ... अपिलार्थी

**विरुध्द**

२) तालुका निरीक्षक भुमी अभिलेख, भुमी अभिलेख कार्यालय, सिल्लोड ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद ... जन माहिती अधिकारी

३) अधिक्षक भुमिअभिलेख कार्यालय, औरंगाबाद ... जन अपिलीय अधिकारी

**निर्णय**

श्री. विठ्ठल सांडु डवणे (कुभांर), रा.मु.पो. पळशी, ता. सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०८-०८-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २९-११-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २२-०२-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २२-०२-२००८ रोजी पारित केले आहे. सदर आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक ०८-०८-२००८ रोजी माहिती अधिकारी अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपीलाचे निर्णयापासून ९० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर २ महिने १६ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत

झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री. विठ्ठल सांडु डवणे (कुभांर), रा.मु.पो. पळशी, ता. सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भुमी अभिलेख, भुमी अभिलेख कार्यालय, सिल्लोड ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक भुमिअभिलेख कार्यालय, औरंगाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३७४/२००८

निर्णय दिनांक : २५-०८-२००९

१) श्री. वामन रंगनाथराव गोरे, वसमतरोड, परभणी ... अपिलार्थी

**विरुध्द**

२) उपवनसंरक्षक, परभणी, जिल्हा परभणी ... जन माहिती अधिकारी

३) उपवनसंरक्षक, परभणी, जिल्हा परभणी ... जन अपिलीय अधिकारी

**निर्णय**

श्री. वामन रंगनाथराव गोरे, वसमतरोड, परभणी यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०९-०४-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०९-०७-२००९ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २५-०९-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक ०९-०४-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर २ महिने १४ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील

दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद<br>दिनांक : २५-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**<br>राज्य माहिती आयुक्त,<br>खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री. वामन रंगनाथराव गोरे, वसमतरोड, परभणी यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा उपवनसंरक्षक, परभणी, जिल्हा परभणी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, परभणी, जिल्हा परभणी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७८८/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री. अंबादास दिगंबरराव डाफणे, ... अपिलार्थी
स्वातंत्र्यसैनिक कॉलनी, लोकमान्यनगर, परभणी

**विरुध्द**

२) पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, दैठणा, ... जन माहिती अधिकारी
तालुका जिल्हा परभणी

३) जिल्हा पोलीस अधिक्षक, परभणी ... जन अपिलीय अधिकारी

**निर्णय**

श्री. अंबादास दिगंबरराव डाफणे, स्वातंत्र्यसैनिक कॉलनी, लोकमान्यनगर, परभणी यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २६-११-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १६-१२-२००५ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १७-०१-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी

यांनी दिनांक २६-११-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे, प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ६ महिने ९ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील

दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६-०८-२००९** राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अंबादास दिगंबरराव डाफणे, स्वातंत्र्यसैनिक कॉलनी, लोकमान्यनगर, परभणी (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे, दैठणा, तालुका जिल्हा परभणी

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधिक्षक, परभणी

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७९७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री. अरुण प्रेमचंद बाकलीवाल, रा. पुरी ... अपिलार्थी
तालुका गंगापुर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

२) तहसीलदार, गंगापुर, जि. औरंगाबाद ... जन माहिती अधिकारी

३) उपविभागीय अधिकारी, वैजापूर , जि. औरंगाबाद ... जन अपिलीय अधिकारी

**निर्णय**

श्री. अरुण प्रेमचंद बाकलीवाल, रा. पुरी ,तालुका गंगापुर, जिल्हा औरंगाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १५-१०-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २१.०९.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०३-०११-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २७-११-२००६ रोजी पारित केले. सदर आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक १५-१०-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपिलाचे निर्णयापासून ९० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय

कालावधीनंतर ७ महिने १६ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण प्रेमचंद बाकलीवाल, रा. पुरी तालुका गंगापुर, जिल्हा औरंगाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापुर, जि. औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर , जि. औरंगाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३८८/०८

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती.भारती महादेव कोरडे,<br>रा.पारनेर, जि.अहमदनगर | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | जिल्हाधिकारी कार्यालय,<br>अहमदनगर | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | उपजिल्हाधिकारी (महसूल),<br>जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर | ... | जन अपिलीय अधिकारी |

**<u>निर्णय</u>**

श्रीमती भारती महादेव कोरडे, रा.पारनेर, जि.अहमदनगर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १५-०५-२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १८-११-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०१-०१-२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक २७-०१-२००९ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक १५-०५-२००९ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे जन अपीलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत प्रस्तुत अपील दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर २० दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २६-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती भारती महादेव कोरडे, महादेव गल्ली, मु.पो.पारनेर, ता.पारनेर, जि.अहमदनगर यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७८५/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री. भाऊ हरी जाधव, राजेश्वर कॉलनी ,राहुरी खुर्द, ... अपिलार्थी
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

२) कुलगुरु,महात्मा फुले कृषि विद्यापिठ, राहूरी ... जन माहिती अधिकारी
जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

श्री. भाऊ हरी जाधव, राजेश्वर कॉलनी, राहुरी खुर्द, जिल्हा अहमदनगर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २५-०७-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०४-०५-२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन प्रस्तुत अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी विहीत मुदतीत प्रथम अपील दाखल केले नाही. अपिलार्थी यांनी मूळ अर्ज केल्यानंतर लगेच दिनांक २५.०७.२००६ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे. अपिलार्थीने मूळ अर्जाचे दिनांकापासून २ महिन्याचे आत कलम १९(१) अन्वये प्रथम अपील व त्या अपिलमध्ये दिलेल्या

निर्णयासंदर्भात १२० दिवसांचे आत अथवा प्रथम अपील निर्णय प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांचे आत व्दितीय अपील दाखल करणे आवश्यक असते. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांचे प्रपत्र 'ब' आयोगास सादर केले नव्हते. त्यासंबंधी विचारणा केली असता, दि. ०८.०९.२००८ च्या पत्राद्वारे त्यांनी प्रथम अपील केले नव्हते तसेच प्रथम अपील न करता आयोगाकडे थेट तक्रार करता येते म्हणून तक्रार वजा अपील केले असल्याचे कळविले आहे. दि.२५.०७.२००६ रोजीचे विचाराधीन अपील पाहिले असता ते कलम १९(३) खालील अपील असल्याचे अपिलार्थीने स्पष्टपणे नमूद केले आहे. तसेच त्यांना अभिप्रेत असलेली तक्रार ही कायद्याच्या कलम १८ खाली करणे आवश्यक होते. या परिस्थितीत अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. भाऊ हरी जाधव, राजेश्वर कॉलनी, राहुरी खुर्द, जिल्हा अहमदनगर (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा कुलगुरु,महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जि.अहमदनगर

३. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७७८/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. चंद्रकांत प्रल्हादराव जाधव,<br>रा.कन्हेरवाडी, ता.कळंब,<br>जि.उस्मानाबाद | -- | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | कार्यकारी अभियंता,<br>लघुपाटबंधारे विभाग,<br>उस्मानाबाद | -- | जा माहिती अधिकारी |
| ३) | मुख्य अभियंता,<br>लघुपाटबंधारे विभाग,<br>औरंगाबाद | -- | जा अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.चंद्रकांत प्रल्हादराव जाधव, रा.कन्हेरवाडी, ता.कळंब, जि.उस्मानाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०४-०८-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०६-०५-२००५ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०४-०६-२००५ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाही. या अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न

झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक ०४-०८-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुतचे अपील पूर्वीच्या कायद्याखाली केलेल्या मूळ अर्जासंबंधीचे आहे.आता तो कायदा निरसित झाल्यानंतर हे अपील केले आहे. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.चंद्रकांत प्रल्हादराव जाधव,रा.कन्हेरवाडी,ता.कळंब,जि.उस्मानाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, उस्मानाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, औरंगाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३३०

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.चंद्रकांत शालीग्राम बनसोडे,<br>रा.औरंगाबाद | ... | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| २) | जिल्हा पुरवठा अधिकारी,<br>औरंगाबाद | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | अपर जिल्हाधिकारी,<br>औरंगाबाद | ... | जन अपिलीय अधिकारी |

**<u>निर्णय</u>**

श्री. चंद्रकांत शालीग्राम बनसोडे, राहुलनगर, मामाचौक, रेल्वेस्टेशनजवळ, औरंगाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १३-१२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १६-०८-२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २९-०९-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाही. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक १३-१२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील प्रथम अपील हे दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १० महिने १५ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६-०८-२००९** राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.चंद्रकांत शालीग्राम बनसोडे, राहुलनगर, मामाचौक, रेल्वेस्टेशनजवळ, औरंगाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७९०/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री. दे.म.अकोलकर, ३३ (अ), 'रेणुका', ... अपिलार्थी
छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

२) कक्ष अधिकारी , सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग ... जन माहिती अधिकारी
मंत्रालय, मुंबई

३) उप सचिव , सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग ... जन अपिलीय अधिकारी
मंत्रालय, मुंबई

**निर्णय**

श्री. दे.म.अकोलकर, ३३ (अ), 'रेणुका', छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०४-१०-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०२.०१.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १४-०२-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले नाहीत. अपिलार्थी यांनी दिनांक ०४-१०-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपीलाचे निर्णयापासून ९० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ३ महिने १५ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २६-०८-२००९** राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दे.म.अकोलकर, ३३ (अ), 'रेणुका' छत्रपतीनगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी , सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव , सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७९१/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री. शिंदे धनंजय सूर्यकांत, ... अपिलार्थी

मु.पो. थेरगांव, ता. शिरुर अनंतपाळ, जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

२) तालुका कृषि अधिकारी कार्यालय, ... जन माहिती अधिकारी

शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर

३) जिल्हा कृषि अधीक्षक, प्रशासकीय इमारत, लातुर ... जन अपिलीय अधिकारी

**<u>निर्णय</u>**

श्री. शिंदे धनंजय सूर्यकांत, मु.पो. थेरगांव, ता. शिरुर अनंतपाळ, जि.लातूर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०८-११-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १५-०६-००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १७-०६-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक ०८-११-२००७ रोजी माहिती अधिकार अधीायम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपिलाचे दिनांकापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर २१ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिंदे धनंजय सूर्यकांत मु.पो. थेरगांव, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कृषि अधीक्षक, प्रशासकीय इमारत, लातूर

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७९६/०७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री.भागवत राजाराम पाटील, ... अपिलार्थी
रा.जळगांव

**विरुध्द**

२) प्राचार्य, ... जन माहिती अधिकारी
श्री शेठ मुरलीधरजी मानसिंगका कला, विज्ञान व
वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा, जि.जळगांव

३) सह संचालक, ... जन अपिलीय अधिकारी
उच्च शिक्षण विभाग, जळगांव

**निर्णय**

श्री.भागवत राजाराम पाटील, रा.जळगांव यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २४-०६-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २६-०९-२००५ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०९-११-२००५ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही ओदश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक २४-०६-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांचा माहितीचा मूळ अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ खालील असून, तो कायदा निरसित झाला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या व्दितीय अपीलावर कार्यवाही करता येणार नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.भागवत राजाराम पाटील, वरद, प्लॉट नं. १८, गट नं. ४६६/७+८, विवेक कॉलनी, त्रिबंकनगर जवळ, जळगांव- ४२५ ००२ (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य श्री शेठ मुरलीधरजी मानसिंगका कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पाचोरा, जि.जळगांव

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक, उच्च शिक्षण विभाग, जळगांव

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७८६/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री. फारुख बाबू तगाले, ... अपिलार्थी
बाबा रमजान गल्ली, किनवट ता. किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

२) अन्न व नागरी पुरवठा अधिकारी, तहसील किनवट, ... जन माहिती अधिकारी
जि.नांदेड

३) तहसीलदार, किनवट, जि. नांदेड ... जन अपिलीय अधिकारी

**निर्णय**

श्री. फारुख बाबू तगाले, बाबा रमजान गल्ली, किनवट ता. किनवट, जिल्हा नांदेड यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १८-०७-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १५.०७.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २७-०८-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक १८-०७-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ६ महिने २४ इतक्या दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. फारुख बाबू तगाले, बाबा रमजान गल्ली, किनवट ता. किनवट, जिल्हा नांदेड (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा अन्न व नागरी पुरवठा अधिकारी, तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किनवट, जि. नांदेड

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७७३/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.गोडबोले चंद्रकांत,<br>देगावचाळ, बी.ए.नगर,<br>घर नं. २-२-१७२-१,<br>वजीराबाद, नांदेड | -- | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| २) | तहसील कार्यालय,<br>नांदेड | -- | जन माहिती अधिकारी |
| ३) | तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, नांदेड | -- | जन अपिलीय अधिकारी |

**<u>निर्णय</u>**

श्री.गोडबोले चंद्रकांत, देगावचाळ, बी.ए.नगर, घर नं.२-२-१७२-१, वजीराबाद, नांदेड यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०८-११-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १३-०३-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०६-०२-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे

अपिलार्थी यांनी दिनांक ०८-११-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय प्रस्तुत अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १ महिने ४ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.गोडबोले चंद्रकांत, देगावचाळ, बी.ए.नगर, घर नं.२-२-१७२-१, वजीराबाद, नांदेड (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, नांदेड

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११६१

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री. कचरु रामभाऊ टकले, ... अपिलार्थी
मु.पो. आंदोरा, ता. कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

२) सरपंच, ग्रामपंचायत आंदोरा, ता.कळंब, ... जन माहिती अधिकारी
जिल्हा उस्मानाबाद

३) गट विकास अधिकारी , पंचायत समिती ,कळंब, ... जन अपिलीय अधिकारी
जिल्हा उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक,
ग्रामपंचायत,आंदोरा,
ता.कळंब,जि.उस्मानाबाद

**<u>निर्णय</u>**

श्री. कचरु रामभाऊ टकले, मु.पो. आंदोरा ता. कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १८-०६-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २६.०२.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २८-०३-२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १२-०५-

२००८ रोजी पारित केले. तदनंतर अपिलार्थी यांनी दिनांक १८-०६-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, उपरोक्त व्दितीय अपिलास विहीत शुल्काचा कोर्ट फि स्टॅम्प लावलेला नाही. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसुचना क्र. आर.टी.आय. २००५ /सी.आर. ३१५/०५/५, दि.११.१०.२००५ अन्वये व्दितीय अपील विहित शुल्कासह दाखल करणे अनिवार्य आहे. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. कचरु रामभाऊ टकले, मु.पो. आंदोरा, ता. कळंब, जिल्हा उस्मानाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत आंदोरा, ता.कळंब जिल्हा उस्मानाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी , पंचायत समिती कळंब, जिल्हा उस्मानाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१३८७/०८

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.कांबळे जगन्नाथ बसवंतराव,<br>रा.साकोळ,व्दारा-प्रतीक मेन्स वेअर,<br>गंज पोस्टऑफिसजवळ, उदगीर, जि.लातूर | -- | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | प्राचार्य,<br>महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर,<br>जि.लातूर | -- | जन माहिती अधिकारी |
| ३) | सचिव,<br>एम.ई.सोसायटीचे महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,<br>उदगीर, जि.लातूर | -- | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.कांबळे जगन्नाथ बसवंतराव, द्वारा प्रतीक मेन्स वेअर, गंज पोस्टऑफीसजवळ, मु.पो.ता.उदगीर,जि.लातूर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १९-०४-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २७-०९-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १५-१०-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-१०-२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक १९-०४-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे जन अपीलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १ महिने २२ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.कांबळे जगन्नाथ बसवंतराव, द्वारा प्रतीक मेन्स वेअर, गंज पोस्टऑफीसजवळ, रेल्वेस्टेशन रोड, मु.पो.ता.उदगीर,जि.लातूर (युपीसीद्वारे)
२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर
३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, एम.ई. सोसायटीचे महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७७९/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.कोकाटे नाना कोंडिबा,<br>मु.पो.चिचोंडी पाटील,<br>ता.जि.अहमदनगर | -- | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| २) | सहायक वनसंरक्षक,<br>अहमदनगर | -- | जा माहिती अधिकारी |
| ३) | उप वनसंरक्षक,<br>अहमदनगर | -- | जा अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.कोकाटे नाना कोंडीबा, मु.पो. चिचोंडी पाटील, ता.जि.अहमदनगर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १५-११-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १५-०५-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दिनांक १२-०६-२००७ रोजी पारित केले. सदर आदेशाविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक १५-११-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील जन अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसाच्या आत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर २ महिने ४ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.कोकाटे नाना कोंडीबा, मु.पो.चिंचोडी पाटील, ता.जि.अहमदनगर (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, अहमदनगर

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, अहमदनगर

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७७१/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.लक्ष्मण गपपती सरडे,<br>मु.पो.पळसप, ता.जि.उस्मानाबाद. | -- | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत कार्यालय,पळसप<br>जि.उस्मानाबाद | -- | जन माहिती अधिकारी |
| ३) | गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय,<br>जि.उस्मानाबाद | -- | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.लक्ष्मण गणपती सरडे,मु.पो.पळसप,ता.जि.उस्मानाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १५-११-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १७-१०-२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २७-११-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २२-०१-२००७ रोजीच्या पत्रासोबत पारित केले. अपिलार्थी यांनी दिनांक १५-११-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००७ रोजी पारित केलेल्या आदेशापासून

९० दिवसांच्या आत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ७ महिने २२ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.लक्ष्मण गणपती सरडे,मु.पो.पळसप,ता.जि.उस्मानाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पळसप, ता.जि.उस्मानाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, उस्मानाबाद, ता.जि.उस्मानाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७७२/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.मग्गीरवार जनार्दन वैजनाथराव,<br>जायकवाडी प्रकल्प मंडळ,<br>जुन्या हायकोर्टामागे, औरंगाबाद | -- | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | कार्यकारी अभियंता,<br>जायकवाडी प्रकल्प जलनिस्सारण,<br>बांधकाम विभाग क्र.२, औसा रोड,<br>जि.लातूर | -- | जन माहिती अधिकारी |
| ३) | अधीक्षक अभियंता व प्रशासक,<br>लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड | -- | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.मग्गीरवार जनार्दन वैजनाथराव, जायकवाडी प्रकल्प मंडळ, जुन्या हायकोर्टामागे,औरंगाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २४-०४-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २६-०७-२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०२-०१-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे

अपिलार्थी यांनी दिनांक २४-०४-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय प्रस्तुत अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी मूळातच प्रथम अपील हे सहा महिने विलंबाने दाखल केले होते. तसेच द्वितीय अपिलात विषयामध्ये माहिती मागितली नसून, त्यांचे प्रलंबित प्रकरणी निर्णय घेण्याची व तो कळविण्याची विनंती केली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ 'च' मध्ये स्पष्ट केलेल्या '**माहिती**' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.मग्गीरवार जनार्दन वैजनाथराव, जायकवाडी प्रकल्प मंडळ, जुन्या हायकोर्टामागे,औरंगाबाद (युपीसीद्वारे)
२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी प्रकल्प जलनिस्सारण बांधकाम विभाग क्र.२, औसा रोड, लातूर
३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७७५/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.मोमीन इमाम घुडूसाब,<br>मोमीन गल्ली, लोहारा,<br>जि.उस्मानाबाद | -- | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| २) | उपविभागीय वन अधिकारी,<br>उस्मानाबाद | -- | जन माहिती अधिकारी |
| ३) | उपविभागीय वन अधिकारी,<br>उस्मानाबाद | -- | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.मोमीन इमाम घुडूसाब, मोमीन गल्ली, लोहारा, जि.उस्मानाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २२-११-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०६-०३-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ११-०४-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक २२-११-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ३ महिने ११ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.मोमीन इमान घुडूसाब, मोमीन गल्ली, लोहारा, जि.उस्मानाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, उस्मानाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१८७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री.नंदलाल जी. बठेजा, ... अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

२) उप अभियंता, ... जन माहिती अधिकारी
ल.पा.स्थानिक स्तर, उपविभाग अंबड
जि.जालना

३) कार्यकारी अभियंता, ... जन अपिलीय अधिकारी
ल.पा.स्थानिक स्तर, जालना

**निर्णय**

श्री. नंदलाल जी.बठेजा, संपादक हनुमान टाईम्स, मामा चौक, गवळीपुरा, जालना यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०६-१२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ३०-०४-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०८-०६-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. अपिलार्थी यांनी दिनांक ०६-१२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्याचे दिनांकापासून १२० दिवसात दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर २ महिने ०७ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २६-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.नंदलाल जी.बठेजा, संपादक हनुमान टाईम्स, मामा चौक, गवळीपुरा, जालना यांना (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ल.पा.स्थानिक स्तर, उपविभाग अंबड, जि. जालना

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ल.पा.स्थानिक स्तर, जालना

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७८४/०७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.प्रमोद प्रेमानंद भोसले,<br>मिशन कंपाऊंड, मोगलाई पोलीस चौकी समोर,<br>धुळे | -- | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| २) | विभाग नियंत्रक,<br>रा.प.विभागीय कार्यालय,<br>धुळे | -- | जन माहिती अधिकारी |
| ३) | विभाग नियंत्रक,<br>रा.प.विभागीय कार्यालय,<br>धुळे | -- | जन अपिलीय अधिकारी |

**<u>निर्णय</u>**

श्री.प्रमोद प्रेमानंद भोसले, मिशन कंपाऊंड, मोगलाई पोलीस चौकीसमोर, धुळे यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २१-०५-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ११-०८-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश ०५-०९-२००७ रोजी पारीत केले. त्यानंतर अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये दिनांक २१-०५-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०९.२००७ रोजी दिलेल्या निर्णयानंतर ९०

दिवसाचे आत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ५ महिने १० दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.प्रमोद प्रेमानंद भोसले, मिशन कंपाऊंड, मोगलाई पोलीस चौकीसमोर, धुळे (युपीसीद्वारे)
२. जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय, धुळे
३. जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय, धुळे
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७८३/०७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.शेख नुर शेख जॉबाज,<br>हजार खोली,मुस्लीमनगर,<br>मतिन किराणाजवळ, धुळे-४२४ ००१. | -- | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | पोलीस अधिक्षक, धुळे | -- | जन माहिती अधिकारी |
| ३) | पोलीस अधिक्षक, धुळे | -- | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.शेख नुर शेख जॉबाज, हजार खोली, मुस्लीमनगर, मतिन किराणाजवळ,धुळे-४२४००१ यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०७-११-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ०१-११-२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २४-११-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश आदेश पारित केले नाहीत. अपिलार्थी यांनी दिनांक ०७-११-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २४-११-२००६ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपिलानंतर १२० दिवसांच्या आत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ७ महिने ३ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी श्री.शेख नुर शेख जॉबाज, हजार खोली, मुस्लीमनगर, मतिन किराणाजवळ,धुळे-४२४००१ (युपीसीद्वारे)
२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, धुळे
३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, धुळे
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७८९

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री. सरदार हरजितसिंग तिरथसींग सहानी ... अपिलार्थी
५-१-५५/१, उस्मानपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

२) विशेष भूसंपादन अधिकारी , औरंगाबाद ... जन माहिती अधिकारी

३) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद ... जन अपिलीय अधिकारी

**<u>निर्णय</u>**

श्री. सरदार हरजितसिंग तिरथसींग सहानी ५-१-५५/१, उस्मानपुरा औरंगाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २५-०४-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ३०.०५.२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०३-०७-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न घेतल्याने अपिलार्थी यांनी दिनांक २५-०४-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते

अनुज्ञेय कालावधीनंतर ५ महिने २२  दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील

दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

(१) अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २६-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सरदार हारजितसिंग तिरथसींग सहानी ५-१-५५/१, उस्मानपुरा औरंगाबाद (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी , औरंगाबाद ता.जि.औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७७४/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.सोपानराव ग्यानोबाराव जोंधळे,<br>रा.वैशालीनगर, तरोडा बु., नांदेड | -- | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| २) | विशेष समाजकल्याण अधिकारी,<br>समाज कल्याण कार्यालय, नांदेड | -- | जन माहिती अधिकारी |
| ३) | विभागीय समाजकल्याण अधिकारी,<br>लातूर | -- | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.सोपानराव ग्यानोबाराव जोंधळे, रा.वैशालीनगर, तरोडा बु., नांदेड यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०३-१२-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक ३१-०१-२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०७-०३-२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाही. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक ०३-१२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ४ महिने २६ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.सोपानराव ग्यानोबाराव जोंधळे, रा.वैशालीनगर, तरोडा बु., नांदेड (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष समाजकल्याण अधिकारी, समाज कल्याण कार्यालय, नांदेड

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७८०/२००७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.सुरेश नारायण पारगांवकर,<br>रुख्मिणी नारायण बंगला, प्लॉट नं.डी-३२,<br>नवलेनगर, अहमदनगर | -- | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| २) | आयुक्त, महानगरपालिका,<br>अहमदनगर | -- | जन माहिती अधिकारी |
| ३) | उपायुक्त, महानगरपालिका,<br>अहमदनगर | -- | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.सुरेश नारायण पारगांवकर, द्वारा रुक्मीणी नारायण बंगला, प्लॉट नं.डी-३२, नवलेनगर, अहमदनगर यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक ०९-०३-२००७ रोजी केलेले अपील, त्यातील त्रुटींची पूर्तता करुन राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०५-२००८ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १३-०४-२००५ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०३-०५-२००५ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेउुन दिनांक ०५-१२-२००६ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशावर अपिलार्थी यांनी दिनांक ०९-०३-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, याप्रकरणी मूळ माहितीचा अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम-२००२ खाली केला होता. त्यावर विहीत मुदतीमध्ये दाखल केलेल्या द्वितीय अपिलावर मा.उपलोकायुक्तांनी निर्णय देवून जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या आदेशाचा फेरविचार करण्याचे निर्देश दिले होते. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून पूर्वीचा निर्णय ०५-१२-२००६ रोजी पारित केला. त्या निर्णयाविरुध्द हे द्वितीय अपील दिनांक ०९-०३-२००७ रोजी सादर केले होते. २००२ चा कायदा ज्यावेळी निरसित झाला त्या तारखेस प्रथम अथवा द्वितीय अपील प्रलंबित असल्यास ती संबंधित अपिलीय अधिकाऱ्यांनी निकाली काढण्याबद्दल कायद्यात तरतूद आहे. परंतु तो निर्णय मान्य नसल्यास पुन्हा द्वितीय अपील अथवा रिव्हयू पिटीशन दाखल करण्याची तरतूद नाही. या अपिलामध्ये मूळ माहितीचा अर्ज १३-०४-२००५ चा असून, उपलोकायुक्तांचा निर्णय दिनांक २२-०५-२००६ रोजी झाला असल्यामुळे हे अपील फेटाळण्या योग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.सुरेश नारायण पारगांवकर, द्वारा रुक्मीणी नारायण बंगला, प्लॉट नं.डी-३२, नवलेनगर, अहमदनगर (युपीसीद्वारे)
२. जन माहिती अधिकारी तथ आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर
३. जन अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, महानगरपालिका, अहमदनगर
४. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७८२

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री.सुर्यकांत संतोषराव पाटील, ... अपिलार्थी
औरंगाबाद

**विरुध्द**

२) उपनिबंधक, सहकारी संस्था, ... जन माहिती अधिकारी
औरंगाबाद

३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ... जन अपिलीय अधिकारी
औरंगाबाद

**निर्णय**

ॲड.सुर्यकांत संतोषराव पाटील, कौस्तुभ हार्मोनी हेरीटेज, सेक्टर जी/एन-५, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १५-११-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २७-१०-२००५ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १४-१२-२००५ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १८-०९-

२००६ रोजी पारित केले आहे. सदर आदेशाविरुध्दअपिलार्थी यांनी दिनांक १५-११-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील जन अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसाच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १ वर्ष २ महिने इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २६-०८-२००९

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. अपिलार्थी ॲड.सुर्यकांत संतोषराव पाटील, कौस्तुभ हार्मोनी हेरीटेज, सेक्टर जी/एन-५, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद यांना (युपीसीद्वारे)

२ जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७९२/०७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री.वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ, ... अपिलार्थी
गुरुप्रसाद, लासुररोड, गंगापुर,
जि.औरंगाबाद

**विरुध्द**

२) व्यवस्थापकीय संचालक, ... जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,
प्रियदर्शनी पार्क, नेपियन सी रोड,मुंबई

३) व्यवस्थापकीय संचालक, ... जन अपिलीय अधिकारी
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,.
प्रियदर्शनी पार्क, नेपियन सी रोड,मुंबई

**निर्णय**

श्री.वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ, गुरुप्रसाद, लासुररोड, गंगापुर, जि.औरंगाबाद यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक १०-०६-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २७-०६-२००५ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०६-०२-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक १०-०६-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांचा मूळ माहितीचा अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ खालील असून, तो कायदा आता निरसित झाला आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या व्दितीय अपीलावर कार्यवाही करता येणार नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. वाल्मिक विठ्ठलराव शिरसाठ, गुरुप्रसाद, लासुररोड, गंगापुर, ता.गंगापुर, जि.औरंगाबाद (युपीसीद्वारे)
२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, प्रियदर्शनी पार्क, नेपियन सी रोड,मुंबई
३. जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, प्रियदर्शनी पार्क, नेपियन सी रोड,मुंबई
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७९४

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

१) श्री. विजय गोविंद नागपुरे, ... अपिलार्थी
१९, कमलकुंज, श्रीरत्न कॉलनी , पिंप्राळा परीसर,
मुंदडा हायस्कूल जवळ,जळगाव

**विरुध्द**

२) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, बांभोरी, जळगाव ... जन माहिती अधिकारी

३) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, बांभोरी, जळगाव ... जन अपिलीय अधिकारी

**<u>निर्णय</u>**

श्री. विजय गोविंद नागपुरे, १९, कमलकुंज, श्रीरत्न कॉलनी, पिंप्राळा परीसर, मुंदडा हायस्कूलजवळ, जळगाव यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २८-०२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २५-०१-२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २७-०७-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांचेकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी

यांनी दिनांक २८-०२-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील केल्यापासून १२० दिवसांच्या आंत दाखल केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर १ महिना ४ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे

अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक -कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विजय गोविंद नागपुरे, १९ कमलकुंज श्रीरत्न कॉलनी, पिंप्राळा परीसर, मुंदडा हायस्कूल जवळ, जळगाव (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, बांभोरी, जळगाव

३. जन अपिलीय अधिकारी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, बांभोरी, जळगाव

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/ २७७७/०७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. विजयसिंग नथेसिंग राजपूत,<br>रा. शिंदखेडा, जि.धुळे | ... | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २) | ग्रामविकास अधिकारी<br>ग्रामपंचायत, शिंदखेडा,<br>जि.धुळे | ... | जन माहिती अधिकारी |
| ३) | गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, शिंदखेडा,<br>जि.धुळे | ... | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.विजयसिंग नथेसिंग राजपूत, शिंदखेडा,जि.धुळे यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २०-०३-२००७ रोजी (फेरसादर १२-०९-२००८) राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १२-०५-२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०५-०७-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.१०.२००६ रोजी आदेश पारित केले, सदरचे निर्णयाने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक २०-०३-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपिलीय अधिकारी यांचे निर्णयाचे दिनांकापासून ९० दिवसाच्या आत केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ४ महिने १५ दिवस विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.विजयसिंग नथेसिंग राजपूत, 'सकुबा' निवास, लोकनेते आमदार, कै.ठाणसिंग जिभाऊ चौक, शिंदखेडा,जि.धुळे (युपीसीद्वारे)
२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, शिंदखेडा, जि.धुळे
३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिंदखेडा, जि.धुळे
४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७७६/०७

निर्णय दिनांक : २६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री.विजय नथेसिंग राजपूत,<br>रा.शिंदखेडा, जि.धुळे | -- | अपिलार्थी |
| | **विरुध्द** | | |
| २) | ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रामपंचायत, शिंदखेडा,<br>जि.धुळे | -- | जन माहिती अधिकारी |
| ३) | गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती, शिंदखेडा,<br>जि.धुळे | -- | जन अपिलीय अधिकारी |

**निर्णय**

श्री.विजयसिंग नथेसिंग राजपूत, शिंदखेडा,जि.धुळे यांचे माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(३) अन्वये दिनांक २०.०३.२००७ रोजी (फेरसादर दि.१२.०९.२००८) राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

याप्रकरणी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहितीची मागणी केली होती. सदर माहिती न मिळाल्याचे कारणावरुन जन अपिलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०५-०७-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही अथवा आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही आदेश प्राप्त न झाल्यामुळे अपिलार्थी यांनी दिनांक २०-०३-२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

या अपिलाची तपासणी केली असता असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील हे प्रथम अपील दाखल केल्यापासून १२० दिवसांच्या आत केले नसून ते अनुज्ञेय कालावधीनंतर ४ महिने १५ दिवस इतक्या विलंबाने दाखल केले आहे. अपिलार्थी यांनी त्यांचे अपील दाखल करण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत कोणतेही संयुक्तिक कारण आयोगासमोर सादर केलेले नाही. ही बाब लक्षात घेता अपिलार्थीचे प्रस्तुतचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याचे आयोगाचे मत झाले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.विजयसिंग नथेसिंग राजपूत, "सकुबा" निवास, लोकनेते आमदार कै.ठाणसिंग जिभाऊ चौक,शिंदखेडा,जि.धुळे (युपीसीद्वारे)

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिंदखेडा, जि.धुळे

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शिंदखेडा, जि.धुळे

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११७६

निर्णय दिनांक २६-०८-२००९

१ श्री. संदिपान आप्पाराव थोरात, अपिलार्थी
व्दारा- मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, बीड लघुपाटबंधारे विभाग,
मुख्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प
मंडळ, परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २२-०२-२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातंर्गत केलेल्या अर्जानुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देता दिनांक ०१-०३-२००८ रोजी पत्र पाठवून अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ चा बोध होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस

माहिती अधिका-याकडे जाण्याचा आदेश दिला जो चुकीचा आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने समाधान न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यासाठी जाणीवपूर्वक कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांच्या-वर दिनांक २२-०३-२००८ पासून पुढे प्रत्येक दिवशी प्रतिदिनी २५० प्रमाणे शास्ती लावण्यात यावी, त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी व अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयासंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे शीघ्र टपालाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या कामांच्या गावांची नांवे, ती ज्या ठिकाणी केली त्यांच्या नकाशांची माहिती, सन २००४ ते २००७ या कालावधीमधील लेखा परीक्षण झालेल्या कामांची नांवे, लेखा परीक्षण झाल्याचा दिनांक, तसेच लेखापरीक्षण न झालेल्या कामांची नांवे कालावधीसह, दिनांक ०१-०१-२००७ ते ३१-१२-२००७ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी वापरलेली गाडी, त्या गाडीच्या देखभाल व दुरुस्तीचा झालेला खर्च, आपल्या कार्यालया अंतर्गत किती वाहने आहेत, त्यांच्या देखभाल व दुरुस्तीचा या कालावधीचा झालेला खर्च व दिनांक ०१-१०-२००७ ते ३०-१०-२००७ या कालावधीतील कार्यकारी अभियंता, बीड लघुपाटबंधारे विभाग मुख्यालय अंबाजोगाई यांनी केलेला कामाच्या नोंदी ज्या नोंदवहीवर घेतलेल्या आहेत त्या त्यांच्या दैनंदिनीच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात त्यांना निश्चितपणे कोणत्या योजनेतील कामांची माहिती हवी आहे त्याचा बोध अपिलार्थीच्या

अर्जावरुन होत नसल्याचे अपिलार्थीस कळविले व अपिलार्थीस स्पष्ट स्वरुपात माहिती मागविण्याचे सूचित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०४-२००८ रोजी अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे, स्पष्ट स्वरुपात मागणी करुन ही, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून त्यांच्याकडील अनेक योजने अंतर्गत कामे झालेली असून अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या योजनेतील व कोणत्या स्वरुपाच्या कामाची माहिती हवी आहे त्याचा बोध होत नसल्याने त्यांनी अपिलार्थीस प्रथमतः दिनांक ०१-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस तसे कळविले. याबाबतचा खुलासा अपिलार्थीने त्यांच्याकडील सूचनेप्रमाणे कधीही केला नाही. तसेच अपिलार्थीने या प्रकरणी त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ५५ इतके भरण्याचे दिनांक १६-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी कळविले होते, तथापि या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अद्यापपावेतो केलेला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना निश्चितपणे कोणत्या योजनेतील कामाची माहिती हवी आहे त्याचा खुलासा सादर केला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एकत्र करण्यास त्यांना तीस दिवस इतका

कालावधी लागेल व  अपिलार्थीने मागणी केलेली सर्व योजना अंतर्गत सर्व कामाची माहिती अपिलार्थीस देण्यात येईल असेही त्यांनी पुढे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक २२-०२-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे त्यांच्या कार्यक्षेत्रातील मोठी व्याप्ती असलेली माहिती मागितली आहे.  आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्याकडे तयार असलेली माहिती आयोगास दाखविली.  यावरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक ३ वगळता उर्वरित मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असल्याचे दिसून येते.  अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून जर खरोखरच माहिती प्राप्त करुन घ्यावयाची इच्छा असती तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०१-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्राप्त झालेल्या सूचनेनसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना ज्या योजनांच्या कामाची माहिती हवी होती  हे कळवावयास हवे होते, तथापि अपिलार्थीने अशी कोणतीही कार्यवाही न करता सरळ प्रथम अपील दाखल केले.  अपिलार्थीचे या प्रकरणातील वर्तन हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीसाठी पोषक नाही असे येथे  स्पष्टपणे नमूद करण्यात येत आहे.  अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीवर जन माहिती अधिकारी यांना काही शंका असतील व अर्जदारास जर खरोखरच माहितीची आवश्यकता असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या शंकाचे प्रथम  निरसन करणे गरजेचे आहे.  या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर नाकारले नाही ही बाब येथे महत्वाची आहे.  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रत्येक प्रतिसाद अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिला आहे, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांची इच्छा नव्हती किंवा अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी दृष्ट हेतूने दडवून ठेवली होती असेही म्हणता येणार नाही.  या सर्व बाबी पाहता अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे

शास्ती लावण्याची विनंती आयोग मान्य करत नाही, मात्र अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे देण्यात आलेल्या सर्व योजनातील उर्वरित संपूर्ण कामांची माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे देण्यात आलेल्या सर्व योजनातील उर्वरित संपूर्ण कामांची माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संदिपान आप्पाराव थोरात, व्दारा- मेडीसीन वर्ल्ड, मेन रोड, किल्ले धारुर, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, बीड लघुपाटबंधारे विभाग, मुख्यालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ,

परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११७२
निर्णय दिनांक: २६.०८.२००९

१. श्री. विष्णू भगवानराव ढवळे, : अपिलार्थी
रा.पैठण,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,पैठण,जि.औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : तहसीलदार,पैठण,जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.०८.२००८ रोजी फेर नोंदणी केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री. सनातन पूर्णाजी पटवर्धन, अव्वल कारकुन (पुरवठा),तहसील कार्यालय,पैठण,जि.औरंगाबाद यांच्यातर्फे अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि.२५.०८.२००९ रोजीचे एक पत्र सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील क्र.११७२/०८ हे ते स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन अपील मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात

येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.११७२/०८, दि.२०.०८.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः २६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. विष्णू भगवानराव ढवळे,ओंकार इलेक्ट्रॉनिक्स,ढोलेश्वर मंदिर परिसर, पैठण, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,पैठण, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११७०
निर्णय दिनांक: २६.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. राजू निलामन राठोड,<br>रा.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपवनसंरक्षक,<br>वनभवन,औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपवनसंरक्षक,<br>वनभवन,औरंगाबाद | | |

तत्कालीन जन माहिती अधिकारी : सहायक वनसंरक्षक,औरंगाबाद

सध्याचे जन माहिती अधिकारी : वनक्षेत्रपाल, जालना (उत्तर)

जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही. एवढेच नव्हेतर जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपावेतो माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.२७.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे मार्च, २००७ ते दि.२७.०२.२००८ या कालावधीमध्ये बदनापूर तालुक्यातील मातीनाला बांध योजनेअंतर्गत, उज्जैनपूर,आन्वी,कंडारी व हिवरा येथील माती नाला बांधकामावरील मजूरांच्या उपस्थितीचे आठवडी अहवाल, मोजमापपुस्तिका, गांव व गट नं. निहाय पूर्ण माहिती, अशाप्रकारची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मूळ अर्ज उपवनसंरक्षक,औरंगाबाद यांच्याकडे केला होता. तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जालना येथील वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याशी संबंधित असल्याने उपवनसंरक्षक कार्यालयाने सदरचा अर्ज दि. ०७.०३.२००८ रोजीच्या पत्राव्दारे संबंधितांच्याकडे पाठविला व त्याची एक प्रत अपिलार्थीस दिली. तथापि विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.०८.०५.२००८ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आठ दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (दक्षिण) (प्रा) यांनी अपिलार्थीस दि. ०७.०६.२००८ रोजी निरंक माहिती पुरविली. तथापि वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (उत्तर) (प्रा) यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की,त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आवश्यक असून त्यांच्या संघटनेचे सभासद या कामावर

मजूर म्हणून उपस्थित असताना देखील त्यांना संबंधित अधिकाऱ्यांकडून मजूरी प्राप्त न झाल्याने व ती त्यांना मिळवून देण्याच्या दृष्टीने त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आजपावेतो त्यांच्या कार्यालयाकडून कोणतीही माहिती पुरविली गेली नसल्याचे मान्य केले व आयोगास असे अवगत केले की, आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्यासाठी ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ प्रमाणे संपूर्ण माहिती देय होत आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्यामुळे, ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता अधिनियमातील कलम ७(६) च्या तरतुदीनुसार विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीचा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी यांना उपवनसंरक्षक, औरंगाबाद कार्यालयाकडून दि. ०७.०३.२००८ रोजी प्राप्त झाल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येते. उपलब्ध कागदपत्रांवरुन असेही आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, वनपरिक्षेत्र अधिकारी (दक्षिण) जालना व वन परिक्षेत्र अधिकारी (उत्तर) जालना यांच्याकडे उपलब्ध होती. या प्रकरणी माहिती अधिकारी म्हणून सहायक वनसंरक्षक यांची नेमणूक झालेली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविण्यासाठी त्यांना वनपरिक्षेत्र अधिकारी (दक्षिण) जालना व वन परिक्षेत्र अधिकारी (उत्तर) जालना यांच्यावर अवलंबून राहावे लागत होते. यापैकी वनपरिक्षेत्र अधिकारी जालना (दक्षिण) यांनी अपिलार्थीस 'निरंक' माहिती त्यांच्याकडील

दि. ०७.०६.२००८ रोजीच्या पत्रान्वये म्हणजेच अधिनियमातील तरतुदीपेक्षा दोन महिने इतक्या विलंबाने 'निरंक' माहिती पुरविली आहे. 'निरंक' माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,जालना (दक्षिण) यांनी लावलेला प्रदीर्घ विलंब कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. वनपरिक्षेत्र अधिकारी जालना (उत्तर) यांनी यावरही कडी करुन अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत तर सोडाच परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) मध्ये अर्जदारास माहिती पुरविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणाऱ्या त्यांच्या सर्व सहायकांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज करतेवेळी वनपरिक्षेत्र अधिकारी जालना (दक्षिण) या पदावर श्री. इ. एल. कान्हेरे व वनपरिक्षेत्र अधिकारी जालना (उत्तर) या पदावर श्री. सिध्दार्थ वाय. भालेराव (सध्या बदलीवर) हे दोन अधिकारी कार्यरत होते, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केले. हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्यासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी (दक्षिण) जालना, श्री. इ. एल. कान्हेरे व वनपरिक्षेत्र अधिकारी (उत्तर) जालना, श्री. सिध्दार्थ वाय. भालेराव (सध्या स्थानांतर) हे दोघेही जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढण्यात येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल या दोन अधिकाऱ्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकत्रितपणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास ते जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. आयोगाचे सदर

आदेश श्री. कान्हेरे व श्री. भालेराव यांच्यापर्यंत पोहचविण्याची जबाबदारी उपवनसंरक्षक,वनभवन,औरंगाबाद यांची असेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. वनपरिक्षेत्र अधिकारी जालना (दक्षिण), श्री. इ. एल. कान्हेरे व वनपरिक्षेत्र अधिकारी जालना (उत्तर), श्री. सिध्दार्थ वाय. भालेराव (सध्या बदलीवर) यांना या प्रकरणी एकत्रितपणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. राजू निलामन राठोड,रा.एन-७, एफ-६२/४, अयोध्यानगर, सिडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल जालना (उत्तर) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रो.ह.यो.), जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. उपवनसंरक्षक, वनभवन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११७१
निर्णय दिनांक: २६.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. आसाराम त्रिबंक वाघ,<br>वैजापूर, जि.औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>रोटेगाव,ता.वैजापूर,जि.औरंगाबाद<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम),<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : सहायक अभियंता श्रेणी-१,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,
वैजापूर,जि.औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नसल्याने त्यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि त्यांनी या अपील अर्जावर निर्णय न देता, वेळकाढूपणा केला असल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.०९.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील, नाशिक - निर्मल रस्त्यासंदर्भात, वैजापूर शहरातून जाणाऱ्या या

रस्त्यावरील अतिक्रमणे दूर करण्यासाठी झाडे तोडण्यासंदर्भात व झाडांचा लिलाव करण्यासंदर्भात व धोंदलगाव ते करंजगाव या रस्त्याच्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - वैजापूर शहरातील नाशिक निर्मल रस्त्यावरील अतिक्रमणे पाडतेवेळी किती झाडी तोडली, झाडी तोडण्यास परवानगी घेतली होती काय, झाडी नियमानुसार लिलाव केली होती का? धोंदलगाव ते करंजगाव रस्त्याचे खंडोबाचे मंदिर ते करंजगावपर्यंत रोडची खोदाई न करता, खडी टाकून दबाई केली व हे काम नियमानुसार आहे का ? - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९(६) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही निर्णय न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नसल्याचे आयोगासमोर मान्य केले व आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीस दि.०२.०२.२००९ रोजी त्यांना देय असलेली माहिती पुरविली आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.१०.२००८ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात निर्णय देऊन अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले होते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना मूळात देय होत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांनी किती झाडे तोडली हा मुद्दा वगळता उर्वरित मुद्यांवर माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील, तोडलेल्या झाडांची संख्या, या व्यतिरिक्त मागितलेली उर्वरित माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असून या मुद्यांद्वारे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण अपेक्षित असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दलचा कोणताही खुलासा, स्पष्टीकरण विचारणे त्यांना अनुज्ञेय नाही, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना तोडलेल्या झाडांची संख्या त्यांच्या दि. ०२.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे कळविली आहे. तथापि या पत्रामध्ये झाडांच्या लिलावाबाबत कोणताही उल्लेख नाही. आजच्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी झाडांच्या लिलाव केला असून याबद्दल त्यांना अंदाजे रु.१५,०००/- रक्कम प्राप्त झाल्याचे आयोगास अवगत केले व ही माहिती अपिलार्थीस तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे मान्य केले, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली व वर स्पष्ट केल्याप्रमाणे देय असलेली, त्यांनी तोडलेल्या झाडांच्या लिलावासंदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीस जरी देय माहिती जन माहिती अधिकारी यांनी आता दिली असली तरी, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी असमर्थनीय विलंबाने दिल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, ही माहिती अपिलार्थीस

तीस दिवसांच्या आत देण्याकरिता त्यांना अशक्य वाटावे, अशी कोणतीही बाब सर्वसाधारण परिस्थितीमध्ये या प्रकरणी संभवत नाही. उपरोक्त प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त झालेल्या अर्जावर संबंधित जन माहिती अधिकारी यांनी केलेले दुर्लक्ष कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. अपिलार्थीच्या अर्जाकडे दुर्लक्ष करुन जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे तोडलेल्या झाडांच्या लिलावासंदर्भातील देय माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** — **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः २६-०८-२००९** — **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. आसाराम त्रिंबक वाघ, पाटील गल्ली, वैजापूर, जि. औरंगाबाद -४२३ ७०१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वैजापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११७३
निर्णय दिनांकः २६.०८.२००९

१. श्री. रंगनाथ किशनराव वसमतकर, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,
औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक आयुक्त पशुसंवर्धन,
प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालय,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १४.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाद्वारे मागितलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२२.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "जातीची कवचकुंडले घालून चालविलेल्या अत्याचार,अनागोंदी कारभार,भष्टाचार (नस्ती १(३)६/२८/सन २००१" या विषयावर एकूण चार मुद्याद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त

यांनी टिपणीवर दिलेल्या अभिप्रायानुसार दि.२२.०२.२००८ पावेतो काय कार्यवाही करण्यात आली, अद्यापि कार्यवाही न होण्याची कारणे, सदरील नस्ती कोणी प्रलंबित ठेवली होती त्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम व कार्यवाही न झाल्यास न्यायालयात जाण्याची परवानगी मिळणेबाबत एक आठवडा मुदत - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०९.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.०६.२००८ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. त्यावरुन असे आढळून आले की, अपिलार्थी यांच्याविरुध्द पशुसंवर्धन आयुक्त यांच्याकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या विषयावर निनावी तक्रार प्राप्त झाली होती. ही तक्रार कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्याने लिहिली आहे त्यांच्यावर कार्यालयाने कार्यवाही करुन त्या कर्मचाऱ्याला शिक्षा करावी, अशी अपिलार्थीची अपेक्षा आहे. वरील तक्रार निनावी असल्यामुळे प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालयाने ही तक्रार हस्ताक्षर तज्ज्ञाकडे पाठवून दिली आहे. या तक्रारीच्यासंदर्भात अपिलार्थी हे विचाराधीन प्रकरणातील माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागवित आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीच्या दि. २२.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्र. २ व ४ शी संबंधित माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबाबतची अथवा त्यांनी घेतलेल्या निर्णयाबाबतची कारणे मागणे अनुज्ञेय नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र.४ द्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्याने व या मुद्याद्वारे अपिलार्थीस नेमके काय म्हणावयाचे आहे, याचा बोध होत नसल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. १ व ३ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती ही अपिलार्थीने अपेक्षिलेल्या माहितीशी सुसंगत नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ व ३ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील सादर करताना त्यांचे दि.२२.०२.२००८ व दि. १९.०४.२००८ रोजीचे असे दोन मूळ अर्ज जोडले आहेत. यापैकी अपिलार्थीच्या दि. २२.०२.२००८ रोजीच्या अर्जावर आज रोजी सुनावणी घेऊन निर्णय घेण्यात आला व अपिलार्थीस असे सूचित करण्यात आले की, त्यांनी, त्यांच्या दि.१९.०४.२००८ रोजीच्या प्रथम अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार वेगळ्याने द्वितीय अपील आयोगाकडे सादर करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ व ३ च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. वसमतकर रंगनाथ किशनराव,द्वारा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालय, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त पशुसंवर्धन,प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११७४
निर्णय दिनांकः २६.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अमृत मोतीराम जैस्वाल,<br>रा. जालना. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी,<br>नगर परिषद, जालना. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सामान्य प्रशासन),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २२.०१.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२०.०२.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती वेळेच्या आत न दिल्याने व दिलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे शास्तीची कारवाई करण्यात यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२०.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. मोतीराम रुपचंद जैस्वाल, फायरमन, नगर परिषद, जालना यांच्या मृत्यूनंतर अपिलार्थीस वारस म्हणून अनुकंपा तत्त्वावर नोकरी मिळणेबाबत एकूण सात मुद्यांद्वारे विविध प्रकारची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०२.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडे

उपलब्ध असलेली माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर दि. ०३.११.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य केले व अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर अपिलार्थीस काही माहिती प्राप्त झाली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. ०२.०४.२००७ व तदनंतर (जन माहिती अधिकारी यांना आज ही तारीख आठवत नाही.) रोजी संपूर्ण माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथम त्यांच्या दि. ०२.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद चुकीचा आहे. तथापि तदनंतर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. “ड” व्यतिरिक्त उर्वरित देय माहिती त्यांना दिलेली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती यांची तपासणी केल्यानंतर आयोगास असे आढळून आले आहे की, आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. “ड” च्या संदर्भात - नगर परिषद, जालना येथील वर्ग-३ च्या रिक्त जागांची संख्या - ही माहिती प्राप्त होणे बाकी आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस ही माहिती तीन दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ड च्या संदर्भातील जालना नगर परिषदेकडे वर्ग-३ च्या रिक्त जागांची संख्या अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ड वगळता उर्वरित माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २०.०२.२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी सर्वसाधारण परिस्थितीत जो प्रतिसाद दि. १९.०३.२००७ रोजी अगर तत्पूर्वी देणे अभिप्रेत होते तो प्रतिसाद त्यांनी अपिलार्थीस १४ दिवसांच्या विलंबाने दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जाच्या संदर्भात त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. "ड" च्या संदर्भातील संपूर्ण माहिती वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक: २६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. अमृत मोतीराम जैस्वाल,रा.अग्निशामक दल क्वॉर्टर्स, देऊळगाव राजा रोड, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११७५
निर्णय दिनांकः २६.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अरुण रामप्रसाद वर्मा,<br>अंबाजोगाई, जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल),<br>तहसील कार्यालय,अंबाजोगाई, जि.बीड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,अंबाजोगाई,जि.बीड | | |

प्रत्यक्षतः विद्यमान जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,अंबाजोगाई, जि.बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकीची माहिती प्राप्त झाल्यामुळे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील नामंजूर केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.०६.२००७ रोजी मोर्चाद्वारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या चार शिधापत्रिकाधारकांच्या तक्रारीच्या साक्षांकित प्रतींची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे

अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२५.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२०.०५.२००८ सुनावणी घेऊन अपिलार्थीस दि.२४.०४.२००८ रोजी माहिती दिल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. मात्र अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जासंदर्भात उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपविभागीय अधिकारी यांनी दि. २९.०४.२००८ रोजीच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक तो खुलासा केला आहे. यावरुन अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे चार शिधापत्रिकाधारकांच्या तक्रारी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्या नसल्याचे दिसून येत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती नक्की कोणती व ती चुकीची कशी आहे, हे आयोगास स्पष्ट करुन सांगण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: २६-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. अरुण रामप्रसाद वर्मा,रा. 'सतीधाम', सदर बाजार,अंबाजोगाई, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,अंबाजोगाई, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,अंबाजोगाई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११७७

निर्णय दिनांक २६-०८-२००९

१ श्री. विष्णू महादेव आंधळे, अपिलार्थी
मु. मरळवाडी, पो. मांडवा, तालुका परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
संचालक जलस्वराज्य प्रकल्प, जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्रामसेविका, ग्रामपंचायत, मरळवाडी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

जन अपिलीय अधिकारी : गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १७-०८-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दिनांक ३१-०५-२००८ रोजी मिळाली आहे व प्राप्त माहितीने त्यांचे समाधान झाले असून विचाराधीन अपिलाची सुनावणी रद्द करावी अशी त्यांनी आयोगास या पत्रामध्ये अखेरीस विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीनेच आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील रद्द करण्याची विनंती केली असल्याने अपिलार्थीची ही विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ११७७/२००८, दिनांक ११-०६-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विष्णू महादेव आंधळे, मु. मरळवाडी, पो. मांडवा, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेविका, ग्रामपंचायत, मरळवाडी, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११७८

निर्णय दिनांक २६-०८-२००९

१ श्री. प्रताप ओंकार शेळके, : अपिलार्थी
एस. टी. जनरल स्टोअर्स, बसस्थानक, भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि कार्यालय, भोकरदन,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि
अधिकारी कार्यालय, भोकरदन, जिल्हा जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरुनही अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०७-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील कृषि सहायक श्री. कोरडे यांनी सन २००७-२००८ या कालावधीमध्ये रोजगार हमी योजने अंतर्गत पिंपळगाव रेणुकाई व रेलगाव येथे कामे केली, त्या कामासाठी किती निधी प्राप्त झाला व खर्च कसा केला, तसेच कामावरील मजुरांचे हजेरीपत्रक अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २१४४ इतके त्यांना तालुका कृषि अधिकारी, भोकरदन यांच्या नावाने डी. डी. व्दारे भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने दिनांक ०८-०८-२००८ रोजी या शुल्काचा रोखीने भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे पावती क्रमांक ३९१०६९९ व्दारे केला. तथापि या नंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रोखीने दिनांक ०८-०८-२००८ रोजी भरले असून आजतागायत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद अथवा माहिती उपलब्ध झालेली नाही. यासंदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी का घेतली नाही असे विचारले असता त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने माहितीपोटीचे शुल्क भरले असल्यामुळे त्यांना माहिती देण्याचे ठरले होते त्यामुळे या प्रकरणी सुनावणी घेण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही व तसेच त्यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, त्यांना कृषि विभागाकडून अशा सूचना आहेत की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-नुसार द्यावयाच्या माहितीसाठीच्या प्राप्त होणा-या शुल्काचा भरणा त्यांनी प्रथमतः शासनाच्या महसूली खात्यामध्ये जमा करावा व तदनंतर त्यांच्या कार्यालयास देण्यात येत असलेल्या आकस्मिक खर्चाच्या तरतुदीमधून अपिलार्थीस माहिती देण्याची कार्यवाही यथावकाश करावी.

वरील घटनाक्रम, सर्व संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २१४४ इतके जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व त्याप्रमाणे अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०८-२००८ रोजी केला. एकदा अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर ही माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्वरीत देणे क्रमप्राप्त होते. हे पाहता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती दिनांक १७-०८-२००८ रोजी अगर तत्पूर्वी देणे त्यांना भाग होते, तथापि आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुनही एक वर्षाचा कालावधी व्यपगत झाल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिलेली नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे

आयोगास अवगत केले. या कथित माहितीची आयोगाने तपासणी केली असता या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहितीपैकी श्री. कोरडे यांनी केलेल्या कामांना किती निधी प्राप्त झाला व तो कसा खर्च केला या मुद्दयावरील माहितीचा त्यामध्ये समावेश नसल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी फक्त अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या मजुराच्या हजेरीपत्रकाच्या प्रती आयोगासमोर सादर केल्या. यावरुन असे दिसून येते की, आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलाथीने मागणी केलेली माहिती तयार नाही. अपिलार्थीस या मुद्दयावर माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने ज्या कालावधीशी संबंधित माहितीची मागणी केली आहे त्या कालावधीतील अपिलार्थीच्या अर्जातील कामांच्या संदर्भातील खर्चाच्या कॅशबुकाच्या प्रती त्यांना आता अपिलार्थीस देणे भाग आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती सात दिवसाच्या आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व तसेच याच कालावधीमध्ये अपिलार्थीकडून त्यांनी माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रुपये २१४४ इतके त्यांना परत करावे.

प्रसंगावशात् जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर त्यांनी सुनावणी न घेण्याच्या त्यांच्या कृतीच्या समर्थनार्थ जो युक्तिवाद केला आहे तो आयोगास मान्य नाही. या टप्प्यावर सचिव (कृषि) यांना असे सूचित करण्यात येते की त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्या आयोगासमोर केलेल्या युक्तिवादाप्रमाणे स्पष्ट केलेल्या सूचना जर त्यांच्या खात्यातर्फे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास देण्यात येत असलेल्या आकस्मिक खर्चाच्या तरतुदीमधून माहिती देण्याबद्दल यथावकाश कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या असतील तर या सूचनांमध्ये योग्य तो बदल करुन माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास कशा प्रकारे त्वरित माहिती पुरविता येईल यादृष्टीने आवश्यक त्या सूचना अथवा परिपत्रक त्यांच्या स्तरावरुन पारीत करावे.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेता अथवा कोणताही निर्णय न घेता आयोगाकडे वरील प्रमाणे युक्तिवादामध्ये नमूद करणे हे त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीचे द्योतक आहे असे आयोग मानतो. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद सचिव (कृषि) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून या प्रकरणी माहितीपोटीचे स्वीकृत केलेले शुल्क रुपये २१४४ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रताप ओंकार शेळके, एस. टी. जनरल स्टोअर्स, बसस्थानक, भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, कार्यालय तालुका कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११७९

निर्णय दिनांक २६-०८-२००९

१ श्री. साहेबराव देवराव पोटभरे, अपिलार्थी
रा. जंम्बोदिप निवास, नवीन भाटवडगांव मांजरथ
रोड, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, माजलगांव,
तालुका माजलगांव, जिल्हा बीड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : पोलीस अधीक्षक, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे आढळून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी पोलीस अधीक्षक, बीड यांना दिनांक ३१-०५-२००७ रोजी दिलेल्या

एकूण पाच मुद्दयांच्या पत्रावर व त्यासोबत दिलेल्या दिनांक २४-०५-२००७ रोजीच्या पत्रावरील एकूण १७ मुद्दयांच्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६ इतके त्यांना शासकीय कोषागारात भरणा करण्याचे सूचित केले व तदनंतर त्याच दिवशी अपिलार्थीस माहिती हस्तांतरीत केली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती बरोबर असल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याचा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे ज्या २२ मुद्दयांवर माहिती मागितली होती त्या २२ मुद्दयावर त्यांनी काय कार्यवाही केली याचा तपशील आयोगास सादर केला व ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील अभिलेख्यावरील उपलब्ध असलेली आवश्यक ती माहिती पुरविली आहे.

मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेल्या माहितीतील बहुतांश भाग हा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. तथापि एवढे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील २२ मुद्दयावर माहिती देऊन वस्तुस्थितीचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी झाली असून या अपील निर्णयाने ते समाधानी असल्याचे अभिप्राय त्यांनी दिले आहेत. सदर अभिप्राय अपिलार्थीने दिनांक १०-०३-२००८ रोजी नोंदविले आहेत. आता अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या २२ मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही सहज उपलब्ध होण्याच्या दृष्टीने, जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगास सादर केलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्या असे त्यांना या प्रसंगी सूचित करण्यात येत आहे व अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. साहेबराव देवराव पोटभरे, रा. जंम्बोदिप निवास, नवीन भाटवडगांव मांजरथ रोड, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११८०

निर्णय दिनांक २६-०८-२००९

१ श्री. घुमरे दत्तात्रय ज्ञानोबा, अपिलार्थी
मु. पो. पारगांव (घु.), तालुका पाटोदा,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा वन परिक्षेत्र अधिकारी,
वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप विभागीय वन अधिकारी, बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही आदेश त्यांना प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगा-कडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाअंर्तगत झालेल्या रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

१. " आपल्या कार्यालयामार्फत रो. ह. यो. ची कामे कोणत्या संस्थेअंतर्गत झाली त्याची सत्य प्रतीत माहिती दयावी.

२. सदरील कामावरील मजुरांच्या हाजरी पटाची माहिती सत्य प्रतीत दयावी.

३. या कामाची मोजमाप पुस्तिकेची माहिती व अदा केलेल्या रक्कमाची चेक नंबर सह माहिती सत्यप्रतीत दयावी. "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती. तसेच अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना कोणत्या कालावधीशी संबंधित माहिती अपेक्षित आहे ज्या मुद्दयासमोर " तात्काळ " असे लिहिले असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगा-कडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने या सुनावणी-साठी पुढील तारीख देण्याची आयोगासमोर विनंती केली, तथापि त्यांची विनंती अमान्य करण्यात येऊन या प्रकरणाची सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सादर केलेल्या त्यांच्या मूळ अर्जामध्ये ज्या कालावधीशी संबंधित माहिती त्यांना अपेक्षित आहे त्या कालावधीचा कोणताही उल्लेख केलेला नाही. रोजगार हमी योजनेची कामे ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, त्यामुळे या कामा-अंतर्गत जर अर्जदारास माहिती हवी असेल तर त्यांनी एखाद्या निश्चित कालावधीचा उल्लेख त्यांच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जामध्ये करणे अनिवार्य आहे, अन्यथा ही माहिती पुरविण्यासाठी कोणतीही सीमा राहणार नाही हे पाहता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची ठरते व अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अशा प्रकारे अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. तथापि असे जरी असले तरी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास व प्रथम अपीलास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी याप्रकरणी कोणताही प्रतिसाद दिला नाही, ही बाब देखिल येथे दुर्लक्षित करुन चालणार नाही. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन, आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीस स्वःतला पात्र ठरविले आहे. सबब मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक कार्यालय, वनवृत्त, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२.	मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक कार्यालय, वनवृत्त, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. घुमरे दत्तात्रय ज्ञानोबा, मु. पो. पारगांव (घु.), तालुका पाटोदा, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय वन अधिकारी, चितलांगे बिल्डींग, नगर रोड, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य वनसंरक्षक, प्रादेशिक कार्यालय, वनवृत्त, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७५०

निर्णय दिनांक २६-०८-२००९

१ श्री. सुरेश बी. पवार, अपिलार्थी

व्दारा - श्री. आर. एस. रामावत,

माहिती अधिकार मंच, जेल कॉर्नर, पहिला माळा,

अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परळी

वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत

वितरण कंपनी मर्यादित, वि. का. अंबाजोगाई,

तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, ओ ॲण्ड एम, उपविभाग, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी फेरनोंदणी केलेले नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसात विनामूल्य माहिती न

पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आयोगास अशीही विनंती केली आहे की, उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीनुसार जास्तीत जास्त २५००० रुपये शास्ती लावण्यात यावी व त्यांना ५००० रुपये इतका शासकीय दंड आकारावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सुदर्शन महिला बचत गट, पंचवटीनगर येथील विद्युत मीटरसाठी लागणारे कागदपत्र त्यातील भाडेचिठ्ठी, कोटेशन, विद्युत मीटरची क्षमता, विद्युत मीटर नसल्याचा दिनांक व विद्युत वितरण कंपनीला दिलेले त्यांचे संमतीपत्रक ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी यानंतर अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २४-०५-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन दिवसाच्या आत मुद्देसूद माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले, तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी ते स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती पुरविली आहे. तथापि या माहितीने अपिलार्थीचे समाधान झालेले नाही, या मुद्दयावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे असे अभिप्राय व्यक्त केले आहेत की, " अर्जातील काही त्रुटी असल्यामुळे

व कलम नंबर ४ मधील माहितीतील गैरसमजुतीमुळे झालेला आहे. "  जन अपिलीय अधिकारी यांना अशा प्रकारच्या अभिप्रायाव्दारे निश्चितपणे काय सूचित करावयाचे आहे याचा आयोगास बोध होत नाही, मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १९-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेली माहिती समाधानकारक नसावी असा त्यातून  निष्कर्ष निघत आहे. अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या मुद्दयावर समाधानकारक माहिती मिळाली नाही हे अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही.  अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती दिली व हे जन माहिती अधिकारी यांना मान्य असल्याचे आयोगाकडील अपिलार्थीने केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये  त्यांनी  नमूद केले आहे.  आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधितांपैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नसल्यामुळे  अपिलार्थीस आता नव्याने माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत. मात्र  उपलब्ध कागदपत्रावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १२-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जो प्रतिसाद अधिनियमातील तरतुदीप्रमाणे दिनांक १३-०३-२००७ पर्यंत  देणे आवश्यक होते तो त्यांनी दिनांक १९-०५-२००७ रोजी दिला आहे व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी ६६ दिवस इतका विलंब लावल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे.  या विलंबाचे  कोणतेही समर्थन आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आयोगास आढळून येत नाही. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याबद्दल ते या प्रकरणी अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीस पात्रता ठरत आहे.  सबब संबधित जन माहिती अधिकारी यांना उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या ६६ दिवसाच्या विलंबाबाबत विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये १६,५०० (अक्षरी रुपये सोळा हजार पाचशे ) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत  झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न

झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांनी विलंब लावल्याचे त्यांना मान्य आहे असा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबधित जन माहिती अधिकारी यांना एकूण रुपये १६,५०० (अक्षरी रुपये सोळा हजार पाचशे ) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुरेश बी. पवार, व्दारा - श्री. आर. एस. रामावत, माहिती अधिकार मंच, जेल कॉर्नर, पहिला माळा, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, ओ ॲण्ड एम, उपविभाग, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, वि. का. अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २०५ मधील कलम (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सीआर/११९२
निर्णय दिनांक २७-०८-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल युसुफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,
वसमत, जि.नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
हिंगोली.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियम,२००५ मधील तरतुदीनुसार त्यांनी जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वसमत यांच्याकडे पोस्टाद्वारे दि. २४.११.२००७ रोजी अर्ज पाठवून दिला असता,मुदतीच्या आत माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत यांच्याकडे दि.३१.०१.२००८ रोजी पोस्टाद्वारे प्रथम अपील दाखल केले असता, संबंधित अपिलेट अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी न घेता, प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे गट शिक्षणाधिकारी, पंचायत समितीकडे, वसमत येथील आदर्श महिला सेवाभावी संस्था संचालित

असास पूर्व प्राथमिक व प्राथमिक ऊर्दू शाळा, वसमत यांच्यासंदर्भात शैक्षणिक वर्ष सन २००६-०७ व २००७-०८ या कालावधीशी संबंधित काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागविली होती. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.३१.०१.२००८ रोजी अपील केले. तथापि या अपील अर्जावर सुनावणी न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगासमोर अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नाहीत. अपिलार्थीने आयोगाकडे त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत मूळ माहितीसाठीचा अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेले प्रथम अपील अर्ज, ही दोनच कागदपत्रे सादर केलेली आहेत. मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज व अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज सादर केला होता किंवा कसे, हे आयोगास आवश्यक त्या पुराव्याच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व संबंधित अधिकारी हे देखील आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल युसुफ,मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर,बसस्टॅण्डरोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,वसमत, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सीआर/१२५३
निर्णय दिनांक २७-०८-२००९

१. श्री. महेमुद म.उमर हाजी, रा.देवपूर,जि.धुळे. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, धुळे अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक, धुळे : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,धुळे,जि.धुळे

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,धुळे

त्रयस्थ पक्षः श्रीमती खातुनबी महमद उमर,श्रीमती रुखसाना महमद उमर,श्री.मुर्तुजा महंमद उमर,श्री.अकबर महंमद उमर,श्रीम.मुनवर बी महंमद उमर

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी त्यांचे वकिलासह व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने त्यांच्या वकिलामार्फत सदर अपील प्रकरणात पुढील तारीख देण्यासाठी लेखी युक्तिवादाद्वारे विनंती केल्यामुळे, त्यांची विनंती मान्य करण्यात येऊन सदर प्रकरणात आयोगाकडील सुनावणीची पुढील तारीख दि. ०९.०९.२००९ रोजी दुपारी ठीक ०३.०० वाजता आयोगाच्या औरंगाबाद स्थित कार्यालयात निश्चित करण्यात आली आहे.

अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्रयस्थ पक्षासह सदर अपिलाच्या दि. ०९.०९.२००९ रोजी आयोजित केलेल्या सुनावणीच्या वेळी आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहावे.

सदर सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही गैरहजर राहिले तर त्यांच्या गैरहजेरीत सदर प्रकरणी निर्णय घेण्यात येईल व तो दोन्ही पक्षास बंधनकारक राहील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक २७.०८.२००९**

**(वि.बा.बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. श्री. महेमुद म.उमर हाजी,रा. तलाठी ऑफीसजवळ,आग्रारोड,देवपूर,जि.धुळे

२ जन माहिती अधिकारी, धुळे अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,धुळे यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक**

**१२५५/०८ व १२५६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सीआर/१२५५ व १२५६
निर्णय दिनांक २७-०८-२००९

१. दि जळगाव पिपल्स को-ऑप.बँक लि.जळगाव : अपिलार्थी
द्वारा : श्री. विनोद महिपती झांबरे,
असिस्टंट जनरल मॅनेजर

**विरुध्द**

१. श्री. सन्मुखदास सुखरामदास मंधवानी, : प्रतिवादी
रा.जळगाव.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था,जळगाव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०८.२००८ रोजी नोंदणी केलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच, अपिलार्थीने त्यांचे वकिलामार्फत दि. २७.०८.२००९ रोजी आयोगास उद्देशून लिहिलेल्या निवेदनाद्वारे विचाराधीन दोनही अपिले मागे घेण्याची परवानगी आयोगाकडे मागितली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांची आयोगाकडे दाखल केलेली दोनही द्वितीय अपिले मागे घेण्याची परवानगी मागितल्यामुळे अपिलार्थीची विनंती मान्य करण्यात येत असून, त्यांची उपरोक्त

विचाराधीन दोनही अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.१२५५/०८ व १२५६/०८, दि.३०.०८.२००८ ही दोन अपिले खारीज करण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. दि जळगाव पिपल्स को-ऑप.बँक लि.जळगाव

२. श्री. सन्मुखदास सुखरामदास मंधवानी,सुखअमृत अपार्टमेंट, सेवामंडळ चौक,कंवर नगर,जळगाव ता.जि.जळगाव

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,जळगाव यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांच समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ११८१/०८ व ११८२/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सीआर/११८१ व ११८२
निर्णय दिनांक २७-०८-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी , : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड

तत्कालीन जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग (दक्षिण),
नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी विचाराधीन दोनही प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे

दि.१७.१२.२००७ रोजी काही माहिती मागविली असता, त्यांनी मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी दि.२५.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन, प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१७.१२.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या दोन स्वतंत्र अर्जापैकी माहितीसाठीच्या एका मूळ अर्जाद्वारे (अपील क्र. ११८१/०८) जन माहिती अधिकारी यांच्याकडे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व श्री.गुरु गोविंदसिंग मेमोरियल हॉस्पीटल, नांदेड आणि दुसऱ्या मूळ अर्जाद्वारे शासकीय आयुर्वेद महाविद्यालय यांच्यासंदर्भात एकसारख्याच समान मुद्यावर काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आर्थिक वर्ष २००३ ते दि. ३० नोव्हेंबर,२००७ या कालावधीशी संबंधित होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या इमारतीत कोणकोणत्या प्रकारची दुरुस्तीची व नवीन बांधकामे करण्यात आली, त्या कामांच्या नावाची यादी, कामे करण्यासाठी काढलेल्या निविदेच्या सत्यप्रती व अंदाजपत्रके, गुत्तेदारांची नावे व केलेल्या कामांच्या मोजमापपुस्तिकेच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या दोनही अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.१७.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२,६६४/-व रु.२०,७५०/- इतक्या रकमेचा भरणा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२५.०१.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिले केली. अपिलार्थीने सदर अपिले कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ज्यांची या प्रकरणी माहिती अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली आहे, यांच्याकडेच केली व त्यांनी अपिलार्थीचा अर्ज (अपील क्र. ११८१/०८ शी संबंधित) हा मूळ माहितीसाठीचा अर्ज समजून तो संबंधित उपविभागीय अभियंता, यांच्याकडे पाठवून दिला. परिणामी अपिलार्थी त्यांना आवश्यक

असलेल्या माहितीपासून वंचित राहिल्यामुळे व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २७.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दि.०७.०७.२००८ रोजी अपिलार्थीने दोनही अर्जांद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य दिली असून ही माहिती प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीने त्यांच्याकडे पोचसही दिली आहे. अपिलार्थीची पोचसही असलेली कागदपत्रे त्यांनी आयोगास सादर केले असून या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याकरिता आवश्यक त्या तपशीलासह कळवून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला होता. परंतु अपिलार्थीने या शुल्काचा भरणा करण्यासाठी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कधीही तयारी दर्शविली नाही. याही उपर अपिलार्थीस

त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपिले केल्यानंतर, मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१) अपील क्र.११८१/०८ व ११८२/०८ ही दोनही अपिले फेटाळण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग दक्षिण),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ११८५/०८ , ११८६/०८,११८७/०८,११८८/०८,११८९/०८,११९० व ११९१/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११८५,११८६,११८७,११८८,११८९,११९० व ११९१

निर्णय दिनांक २७-०८-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. **अपील क्र.११८५/०८**

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि कार्यालय, नायगाव (खै.) जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, नायगाव (खै.),जि.नांदेड : प्रतिवादी

२. **अपील क्र.११८६/०८**

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि कार्यालय, धर्माबाद, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद,जि.नांदेड

३. **अपील क्र.११८७/०८**

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि कार्यालय, देगलूर, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, देगलूर जि.नांदेड

४. **अपील क्र.११८८/०८**

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि कार्यालय, अर्धापूर, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर, जि.नांदेड

५. **अपील क्र.११८९/०८**

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि कार्यालय, कंधार, जि.नांदेड

जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कंधार,जि.नांदेड

६. **अपील क्र.११९०/०८**

जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि कार्यालय, मुखेड,<br>जि.नांदेड<br>प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी :<br>मंडळ कृषि अधिकारी, तालुका<br>कृषि कार्यालय, मुखेड,<br>जि.नांदेड.

जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>मुखेड,जि.नांदेड

७. **अपील क्र.११९१/०८**

जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि कार्यालय, लोहा, जि.नांदेड<br>प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी :<br>मंडळ कृषि अधिकारी, तालुका<br>कृषि कार्यालय,लोहा,<br>जि.नांदेड.

जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, लोहा,<br>जि.नांदेड

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०८.२००८ रोजी नोंदविलेली एकूण सात स्वतंत्र द्वितीय अपिले, क्र. ११८५/०८, ११८६/०८, ११८७/०८, ११८८/०८, ११८९/०८,११९०/०८ व ११९१/०८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या सातही द्वितीय अपिलाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे त्यांनी वेगवेगळया जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकाच स्वरुपाची माहिती एकाच दिवशी मागितल्याने व त्यावरील प्रथम अपिले देखील एकाच दिवशी केली असल्याने विचाराधीन सातही द्वितीय अपील अर्जांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

या सर्व द्वितीय अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१०.०३.२००८ रोजी रितसर अर्ज पाठवून दिला असता, माहिती अधिकाऱ्याने माहिती न देता उलटसुलट पत्रव्यवहार करुन माहिती देण्यासाठी विलंब केल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे दि. ०२.०५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता,

त्यांनी यावर कोणताही निर्णय न देऊन प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन सातही अपिले आयोगाकडे दाखल केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने दि.१०.०३.२००८ रोजी एकाच वेळी तालुका कृषि अधिकारी, नायगाव,धर्माबाद,देगलूर,अर्धापूर,कंधार,मुखेड व लोहा यांच्याकडे एकसारखीच व्यापक व्याप्ती असलेली त्यांच्या कार्यालयाची अंदाजे पाच वर्षे इतक्या कालावधीशी संबंधित माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे रोजगार हमी योजनेअंतर्गत कामासाठी धान्य योजनेअंतर्गत सी.सी.टी., लुज बोल्डर, शेततळे यांची संख्या, माती बंधारे,सिमेंट बंधारे यांची कामे केलेल्या मजूरांची नावे व पत्ते, धान्य वाटप करणाऱ्या स्वस्तधान्य दुकानदारांची नावे व पत्ते,मजूरांच्या हजेरीपटाच्या सत्यप्रती, मोजमापपुस्तिकांच्या सत्यप्रती, ऑगस्ट २००५ ते सन २००६ मध्ये अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना शासनातर्फे वाटप करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदानाची रक्कम, लाभार्थ्यांची यादी,अनुदान वाटप करतेवेळी शेतकऱ्यांच्या मस्टरवर घेतलेल्या सहया व त्यांची ओळख देणाऱ्या व्यक्तींच्या मस्टरच्या सत्यप्रती तसेच जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत झालेल्या टिश्युकल्चर योजनेअंतर्गत उपलब्ध झालेल्या अनुदानाची रक्कम, या योजनेच्या लाभार्थी शेतकऱ्यांची यादी आणि अनुदानाच्या खर्चाच्या तपशीलाची सत्यप्रत - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,मुखेड(अपील क्र.१०९०/०८) यांनी दि.३०.०३.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२४,६७२/-इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, लोहा (अपील क्र.१०९१/०८) यांनी दि.०९.०४.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस

आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.८७,८५०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व अपिलार्थीस गोषवाऱ्याच्या स्वरुपात काही माहिती विनामूल्य दिली.

तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही. उर्वरित जन माहिती अधिकारी यांच्यापैकी आज रोजी सुनावणीसाठी कोणीही उपस्थित नसल्याने तसेच अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज उर्वरित जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केला होता यासंदर्भात कोणताही पुरावा आयोगाकडे सादर केला नसल्याने अपिलार्थीच्या उर्वरित जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जावर आयोगाचे कोणतेही भाष्य नाही.कृषि अधिकारी, मुखेड व लोहा यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा त्यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार तालुका कृषि अधिकारी, मुखेड व लोहा यांच्याकडे दि.०२.०५.२००८ या एकाच दिवशी दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. यापैकी तालुका कृषि अधिकारी, मुखेड यांनी प्रथमतः दि.३०.०५.२००८ रोजी सुनावणी ठेवली असता, अपिलार्थीने सुनावणीसाठी मुदतवाढ मागवून घेतली. अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे दि.११.०६.२००८ रोजी तालुका कृषि अधिकारी यांनी सुनावणी ठेवली असता, अपिलार्थी या सुनावणीस गैरहजर राहिल्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. तालुका कृषि अधिकारी, लोहा यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात अपिलार्थीस त्यांचा निर्णय दि. ०९.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे कळवून अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्याने त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीच्या अशाप्रकारे सात प्रथम अपील अर्जांपैकी दोन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचा निर्णय कळविला आहे. तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज करताना संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी प्रकरण प्रलंबित ठेवल्याचे आयोगास अवगत केले आहे. उर्वरित पाच जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मूळात प्रथम अपील अर्ज केल्यापृष्ठ्यर्थ कोणतीही कागदपत्रे आयोगास त्यांच्या व्दितीय अर्जाबरोबर उपलब्ध करुन दिलेली नाहीत. तसेच यासंदर्भात

त्यांचे तोंडी म्हणणे आयोगासमोर मांडण्याकरिता देखील आज अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. परंतु त्यांनी विचाराधीन सातही प्रकरणी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या सात प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २७.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपील क्र. ११९०/०८ व क्र. १९९१/०८ मधील जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.कृषि अधिकारी, मुखेड व लोहा यांनी आयोगास आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अनुक्रमे रु.२४,६७२/- व रु.८७,८५०/- इतके माहितीपोटीचे शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले असता, अपिलार्थीने या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात न केल्यामुळे ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीच्या दि. ०२.०५.२००८ रोजी तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलावरील निर्णयाबाबत वरील परिच्छेदामध्ये उल्लेख झालेला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी (अपील क्र. ११९०/०८ व क्र.१९९१/०८) यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी एकाच प्रकारची माहिती वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या सात वेगवेगळया जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली होती.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात आहे. एकूण सात जन माहिती अधिकारी यांच्यापैकी मंडळ कृषि अधिकारी, मुखेड व लोहा यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क मुदतीत कळविले आहे. मात्र

अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी मुखेड व लोहा यांनी अनुक्रमे दि.११.०६.२००८ रोजी व ०९.०६.२००८ रोजी निर्णय देऊनही अपिलार्थीने आयोगाकडे दि.१४.०८.२००८ रोजी द्वितीय अपील सादर करताना संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याचे असत्य विधान त्यामध्ये केले. अपिलार्थीच्या उर्वरित ५ मूळ अर्जांस व अपील अर्जांच्या संदर्भात अपिलार्थीने संबंधित अधिकाऱ्यांकडे मूळात माहितीसाठीचा व प्रथम अपील अर्ज दाखल केल्याच्या संदर्भात कोणताही पुरावा आयोगाकडे, त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये जोडलेला नाही अथवा यासंदर्भात त्यांनी कोणताही वेगळा युक्तिवाद लेखी स्वरुपात आयोगास आजपावेतो सादर केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील अपील अर्ज संबंधितांच्याकडे प्राप्त झाला किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. अशाप्रकारे आयोगाकडे द्वितीय अपील करताना कोणताही पुरावा सादर न करणे, असत्य विधाने करणे व आवश्यक त्या माहितीपोटीच्या शुल्काची विहित मुदतीत कल्पना आल्यानंतरही, त्या शुल्काचा भरणा करण्याची कोणत्याही टप्प्यावर तयारी न दर्शविणे अशाप्रकारच्या अपिलार्थीच्या कृतीद्वारे त्यांनी, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे, सिद्ध केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या प्रकारे माहिती देणे हे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य असते, त्याचप्रमाणे अर्जदारास आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क भरणे हे देखील अर्जदाराचे तितकेच महत्त्वाचे कर्तव्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीने आपले कर्तव्य वेळेवर पार न पाडल्यामुळे व आयोगाकडे अपील अर्जासोबत आवश्यक असा कोणताही पुरावा सादर न केल्यामुळे, अपिलार्थीची सातही विचाराधीन अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र. ११८५/०८, ११८६/०८, ११८७/०८, ११८८/०८, ११८९/०८, ११९० /०८ व ११९१/०८,दि. १४.०८.२००८ फेटाळण्यात येत आहेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : २७-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, नायगाव (खै.), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, नायगाव (खै.), जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, धर्माबाद, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, धर्माबाद,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, देगलूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, देगलूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, अर्धापूर, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अर्धापूर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० जन माहिती अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, कंधार, जि.नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

११. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कंधार,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय,मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मुखेड,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१४. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, लोहा, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१५. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, लोहा,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ११८३/०८ व ११८४/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सीआर/११८३ व ११८४
निर्णय दिनांक २७-०८-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी,
नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,नांदेड

अपील क्र. ११८३/०८- त्रयस्थ पक्ष : श्री. साईनाथ राजेश्वर पालेपवाड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.०८.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये, अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी दि.१७.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागविली असता, ती त्यांना मुदतीत न मिळाल्यामुळे त्यांनी दि.२१.०५.२००८ रोजी प्रथम केले परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जावर सुनावणी न घेता, प्रकरण प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येत आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या अपील क्र. ११८३/०८ च्या संदर्भातील मूळ अर्ज, दि.१७.०४.२००८ द्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. पालेपवाड साईनाथ

राजेश्वर यांना सी.आर.नं.२४३३, दि. २७.१२.२००७ रोजी दिलेल्या 'मुन्नेरवारलु' जातीच्या प्रमाणपत्रासंबंधी काही खुलासेवजा व किनवट तालुक्याचे जातीचे प्रमाणपत्र असताना व तेथे विभागीय कार्यालय असताना जन माहिती अधिकारी यांनी नांदेड उप विभागीय कार्यालयातून कोणत्या नियमाप्रमाणे जातीचे प्रमाणपत्र दिले, अशी माहिती मागितली होती

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील क्र.११८४/०८ च्या संदर्भात दि. १७.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्वसाधारण स्वरुपाची व त्यांच्या कार्यालयाकडून 'मुन्नेरवारलु' जातीचे प्रमाणपत्र निर्गमित केल्याबाबत अशाचप्रकारचा खुलासा मागविणारी माहिती मागविली होती. या माहितीमध्ये - "त्रूटींची पूर्तता करण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी असताना कोणत्या नियमानुसार अर्जदाराने दि.३१.१२.२००७ रोजी अर्ज केला असताना त्याच दिवशी तात्काळ जातीचे प्रमाणपत्र देण्यात आले होते, याबाबत लेखी खुलासा देण्यात यावा" - या मुद्यांचा समावेश होता. या अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे बहुतांश माहिती ही त्यांच्याकडून खुलासे अपेक्षित करणाऱ्या स्वरुपात मागितली होती. अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज उपरोक्त दोनही प्रकरणात उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय,नांदेड यांच्याकडे केला होता. तथापि ही माहिती उपविभागीय स्तरावर उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीचे दोनही अर्ज दि. १९.०४.२००८ रोजी तहसीलदार,नांदेड यांच्याकडे पाठविले व त्यांनी दि.१९.०४.२००८ रोजी अपिलार्थीस त्यांनी दोनही प्रकरणाशी संबंधित नस्तीतील कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठवून दिल्या. सदर माहिती, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे पाठविल्याबाबत त्यांनी आवश्यक तो पुरावा आयोगाकडे सादर केला. तथापि ही माहिती अपिलार्थीस प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२०.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. तथापि या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही. मात्र अपिलार्थीस दि.०५.०६.२००८ रोजीच्या त्यांच्या

पत्राद्वारे संबंधितांकडून माहिती हस्तगत करुन घेण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक २७.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती मागविली होती, त्या प्रकरणाच्या नस्तीतील सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दि.१९.०४.२००८ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे विनामूल्य पाठविल्या आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने विचाराधीन दोनही अपील प्रकरणाशी संबंधित माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दल खुलासा अपेक्षित करणारी माहिती बव्हंशी प्रमाणात मागितली आहे. अपिलार्थीच्या दोन माहितीसाठीच्या मूळ अर्जांचे अवलोकन केले असता,अपिलार्थीच्या अपील क्र.११८३ च्या संदर्भातील अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, "किनवट तालुक्याचे जातीचे प्रमाणपत्र असताना तेथे विभागीय कार्यालय असताना, आपण नांदेड उपविभागीय कार्यालय कोणत्या नियमाप्रमाणे जातीचे प्रमाणपत्र दिले " व अपील क्र. ११८४/०८ च्या संदर्भातील मूळ अर्जातील, "त्रूटींची पूर्तता करण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी असताना कोणत्या नियमानुसार अर्जदाराने दि.३१.१२.२००७ रोजी अर्ज केला असताना त्याच दिवशी तात्काळ जातीचे प्रमाणपत्र कोणत्या शासकीय नियमानुसार व परिपत्रकानुसार देण्यात आले होते " या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी जरी अपिलार्थीस या

प्रकरणाशी संबंधित अभिलेख्यांतील सर्व कागदपत्रे विनामूल्य उपलब्ध करुन दिले असतील तरी अपिलार्थीने मागणी केलेल्या या दोन मुद्यांवरील माहिती संदर्भात शासन नियम / मार्गदर्शक परिपत्रके उपलब्ध असतील तर त्यांनी परिपत्रक, आदेशाच्या प्रती अपिलार्थीस विनामूल्य पुरवाव्यात. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलांशी संबंधित दोनही मूळ माहितीसाठीच्या अर्जातील, वरील दोन मुद्यांसंदर्भातील माहिती, त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.११८३/०८ व ११८४/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दि.१७.०४.२००८ रोजीच्या दोनही मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : २७-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४५/०८
निर्णय दिनांक २७/०८/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नारायण आत्माराम टाक,<br>ब्राम्हण गल्ली, सेलू, ता.सेलू<br>जि.परभणी | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक,<br>दि.परभणी पिपल्स को-ऑप.बँक लि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, परभणी | | |

<u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०.०२.२००८ रोजी नोंदविलेले अपील आज दिनांक २७.०८.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७ डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बॅक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ,नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी आदेश दिला आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे दि.परभणी पिपल्स को-ऑप. बँक लि. परभणी या नागरी सहकारी बँकेकडे माहितीची मागणी केली असल्याने व या बँकेस मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २७/०८/२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण आत्माराम टाक, ब्राम्हण गल्ली, सेलू, ता.सेलू, जि.परभणी.
२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, दि.परभणी को-ऑप.बँक लि.परभणी, मुख्य कार्यालय, नेहरु रोड, परभणी
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नेहरु रोड, परभणी

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४६/०८
निर्णय दिनांक २७/०८/२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. रामेश्वर बन्सीधर रेंगे,<br>नगर सेवक, नवा मोंढा, परभणी,<br>जि.परभणी | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>व्यवस्थापक,<br>शिव पार्वती बँक, परभणी | : | प्रतिवादी |
| २. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, परभणी | | |
| | त्रयस्थ पक्ष | : | श्रीमती गोमतीबाई |

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६.०८.२००८ रोजी नोंदविलेले अपील आज दिनांक २७.०८.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी व त्रयस्थपक्ष गैरहजर, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७ डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बॅक, अमरावती विरुध्द

राज्य माहिती आयोग खंडपीठ,नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी आदेश दिला आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे शिव पार्वती बँक, परभणी या नागरी सहकारी बँकेकडे माहितीची मागणी केली असल्याने व या बँकेस मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २७/०८/२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रामेश्वर बन्सीधरराव रेंगे, नगर सेवक, नवा मोंढा, परभणी
२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, शिव पार्वती बँक, परभणी
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नेहरु रोड, परभणी

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४७/०८
निर्णय दिनांक २७/०८/२००९

१ श्री. जयप्रकाश गणेशलाल मुंदडा, : अपिलार्थी
विठ्ठल मंदिर चौक,बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शाखाधिकारी,
वैद्यनाथ अर्बन को-ऑप. बॅक लि., परळी वैजनाथ
शाखा- सुभाष रोड, बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०३.२००८ रोजी नोंदविलेले अपील आज दिनांक २७.०८.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच आयोगाचे असे निदर्शनास आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७ डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बॅक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ,नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी आदेश दिला आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि. परळी वैजनाथ, शाखा सुभाष रोड, बीड या नागरी सहकारी बँकेकडे माहितीची मागणी केली असल्याने व

या बँकेस मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २७/०८/२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

४. श्री. जयप्रकाश गणेशलाल मुंदडा, विठ्ठल मंदिर चौक, बीड
५. जन माहिती अधिकारी तथा शाखाधिकारी, वैद्यनाथ अर्बन को-ऑप. बँक लि.परळी वैजनाथ, शाखा सुभाष रोड, बीड
६. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४८/०८
निर्णय दिनांक २७/०८/२००९

१ श्री. दिलीप भिमराज गोसावी (भारती), : अपिलार्थी
मु.दुर्गापूर, पो.हसनापूर, ता.राहाता, जि.अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
चेअरमन,
प्रवरा सहकारी बँक, मुख्य कार्यालय, लोणी बु.
ता.राहाता, जि.अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, अहमदनगर

<u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८.१०.२००८ रोजी नोंदविलेले अपील आज दिनांक २७.०८.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी गैरहजर, जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७ डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बॅक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ,नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी आदेश दिला आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे प्रवरा सहकारी बँक, मुख्य कार्यालय, लोणी बु. ता.राहाता, जि.अहमदनगर या नागरी सहकारी बँकेकडे माहितीची मागणी केली असल्याने व या बँकेस मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २७/०८/२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप भिमराज गोसावी (भारती), मु.दुर्गापूर, पो.हसनापूर, ता.राहाता, जि.अहमदनगर
२. जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, प्रवरा सहकारी बँक, मुख्य कार्यालय, लोणी बु. ता.राहाता, जि.अहमदनगर
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२४९/०८
निर्णय दिनांक २७/०८/२००९

१ श्री. चंगेडे शशिकांत पेमराज, : अपिलार्थी
३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नगर अर्बन बँक,
मुख्य शाखा अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर आयुक्त व विशेष निबंधक,
सहकारी संस्था, पुणे

<u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७.०१.२००९ रोजी नोंदविलेले अपील आज दिनांक २७.०८.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच आयोगाच्या असे निदर्शनास आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७ डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बॅक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ,नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी आदेश दिला आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे नगर अर्बन बँक, मुख्य शाखा अहमदनगर या नागरी सहकारी बँकेकडे माहितीची मागणी केली असल्याने व या बँकेस मा.उच्च न्यायालयाच्या

वरील आदेशाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २७/०८/२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. चंगेडे शशिकांत पेमराज, ३४६३, खिस्त गल्ली, अहमदनगर
२. जन माहिती अधिकारी तथा नगर अर्बन बँक, मुख्य शाखा अहमदनगर
३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, पुणे

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १२५०/०८ व १२५१/०८**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५० व १२५१/०८
निर्णय दिनांक २७/०८/२००९

१ श्री.एच.व्ही.मोदी, : अपिलार्थी
प्रभारी व्यवस्थापक,
दि पाचोरा पिपल्स को.ऑप.बँक लि. पाचोरा,
जि.जळगांव

विरुध्द

१. जन अपिलीय अधिकारी तथा प्रतिवादी
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जळगांव

<u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३.०७.२००८ रोजी नोंदविलेली दोन अपिले आज दिनांक २७.०८.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, श्री. शेख अख्तर शेख महेबुब यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे दि.पाचोरा पिपल्स को-ऑप. बँक लि. पाचोरा, जि.जळगांव या नागरी सहकारी बँकेकडे माहितीची मागणी केली असता, सदर प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०६.२००८ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले केली आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशाद्वारे श्री. शेख अख्तर शेख महेबुब यांना सशुल्क माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, दि.पाचोरा पिपल्स को.ऑप.बँक मर्या. पाचोरा यांना आदेशित केले होते. जन माहिती अधिकारी यांनी विचाराधीन अपील, जन अपिलीय अधिकारी यांचे दि.१६.०६.२००८ रोजीचे आदेश रद्दबातल करण्यासंदर्भात, आयोगाकडे केले आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व श्री.शेख अख्तर शेख महेबुब हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित अपिलार्थी यांच्या प्रतिनिधीच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७ डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बॅक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ,नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी आदेश दिला आहे.

या आदेशाचे अवलोकन करता दि पाचोरा पिपल्स को.ऑप. बँक लि. यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब, अपिलार्थीची विचाराधीन अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील क्र.१२५०/०८ व १२५१/०८ मान्य करण्यात येत आहेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक : २७/०८/२००९ राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री.एच.व्ही.मोदी, प्रभारी व्यवस्थापक, दि.पाचोरा पिपल्स को. ऑप. बँक लि. पाचोरा, जि.जळगांव
२. श्री. शेख अखतर शेख मेहेबुब, डॉ.आंबेडकर रोड, शिवाजीनगर, पाचोरा, जि.जळगांव
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५२/०८
निर्णय दिनांक २७/०८/२००९

१ श्री. मिलिंद भास्कर सोनवणे, : अपिलार्थी
'ध्येय' कार्यालय, देशमुखवाडी, पाचोरा,
ता.पाचोरा, जि.जळगांव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
दि पाचोरा पिपल्स को-ऑप बँक लि. पाचोरा,
जि.जळगांव

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, जळगांव

<u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५.०९.२००८ रोजी नोंदविलेले अपील आज दिनांक २७.०८.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी गैरहजर , जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७ डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बॅक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ,नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी आदेश दिला आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे दि.पाचोरा पिपल्स को-ऑप. बँक लि. पाचोरा, जि.जळगांव या नागरी सहकारी बँकेकडे माहितीची मागणी केली असल्याने व या बँकेस मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २७/०८/२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मिलिंद भास्कर सोनवणे 'ध्येय' कार्यालय, देशमुखवाडी, पाचोरा, ता. पाचोरा, जि.जळगांव
२. जन माहिती अधिकारी, दि.पाचोरा पिपल्स को-ऑप.बँक लि. पाचोरा, जि.जळगांव
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/१२५४/०८
निर्णय दिनांक २७/०८/२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्रीमती भारती राजेंद्र फेगडे,<br>कुलकर्णी प्लॉट, उप डाकघरासमोर, आयुर्विमा<br>महामंडळ कार्यालयाच्या पाठीमागे, भुसावळ,<br>जि.जळगांव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>दि.जळगांव पिपल्स को-ऑप. बँक लि.जळगांव<br>२. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जळगांव | : | प्रतिवादी |

<u>निर्णय</u>

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०३.०७.२००८ रोजी नोंदविलेले अपील आज दिनांक २७.०८.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी गैरहजर, जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७ डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बॅंक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग

खंडपीठ,नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी आदेश दिला आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे दि.जळगांव पिपल्स को-ऑप. बँक लि. जळगांव या नागरी सहकारी बँकेकडे माहितीची मागणी केली असल्याने व या बँकेस मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २७/०८/२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती भारती राजेंद्र फेगडे, कुलकर्णी प्लॉट, उप डाकघरासमोर, आयुर्विमा महामंडळ कार्यालयाच्या पाठीमागे, भुसावळ, जि.जळगांव
२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, दि.जळगांव पिपल्स को-ऑप.बँक लि. १५२, पोलन पेठ, दाणा बाजार, जळगांव
३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२७५५/०७
निर्णय दिनांक २७/०८/२००९

१ श्री. घनश्यामदास रामेश्वर इनानी, : अपिलार्थी
रा.बालाजी मंदिर कॉलनी, गाडीपुरा, नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शाखाधिकारी,
पिपल्स को-ऑप बँक, नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
रिझर्व बँक ऑफ इंडिया, सेंट्रल ऑफिस, मुंबई-१

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २०.०४.२००७रोजी नोंदविलेले अपील आज दिनांक २७.०८.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांच्या प्रतिनिधींच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७ डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बॅक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग खंडपीठ,नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी आदेश दिला आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे पिपल्स को-ऑप. बॅंक, नांदेड या नागरी सहकारी बॅंकेकडे माहितीची मागणी केली असल्याने व या बॅंकेस मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २७/०८/२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. घनश्यामदास रामेश्वर इनानी, बालाजी मंदिर, गाडीपुरा, नांदेड.
२. जन माहिती अधिकारी तथा शाखाधिकारी, पिपल्स को-ऑप बॅंक, नांदेड
३. जन अपिलीय अधिकारी तथा रिझर्व बॅंक ऑफ इंडिया, सेंट्रल ऑफिस, मुंबई-१

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२७५६/०७
निर्णय दिनांक २७/०८/२००९

१ श्री. नंदकुमार हरिभाऊ उदावंत, : अपिलार्थी
विद्यानगर, मु.पो.लासलगांव, ता.निफाड,
जि.नाशिक

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
शाखाधिकारी,
दि.नाशिक मर्चंट को-ऑप.बँक लि.
शाखा लासलगांव, ता.निफाड, जि.नाशिक
२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
दि.नाशिक मर्चंट को-ऑप.बँक लि. नाशिक

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २४.०७.२००६ रोजी नोंदविलेले अपील आज दिनांक २७.०८.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी गैरहजर, जन माहिती अधिकारी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७ डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बॅक, अमरावती विरुध्द राज्य माहिती आयोग

खंडपीठ,नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी आदेश दिला आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे दि.नाशिक मर्चंट को-ऑप. बँक लि. शाखा लासलगांव, जि.नाशिक या नागरी सहकारी बँकेकडे माहितीची मागणी केली असल्याने व या बँकेस मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २७/०८/२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदकुमार हरिभाऊ उदावंत, विद्यानगर, मु.पो.लासलगांव, ता.निफाड, जि.नाशिक.
२. जन माहिती अधिकारी तथा शाखा अधिकारी, दि. नाशिक मर्चंट को-ऑप. बँक लि. शाखा लासलगांव, ता.निफाड, जि.नाशिक.
३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, दि.नाशिक मर्चंट को-ऑप. बँक लि. नाशिक, ए-१६, पद्मश्री बाबुभाई राठी चौक, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/२७५७/०७
निर्णय दिनांक २७/०८/२००९

१ श्री. सुनिल रंगनाथराव जोशी, : अपिलार्थी
श्रीनिकेतन, क्रांतीनगर, तहसील कार्यालयाच्या
पाठीमागे, नगर रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पूर्णवादी नागरी सहकारी बँक,
बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहनिबंधक,
सहकारी संस्था, लातूर

निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २०.०५.२००६ रोजी नोंदविलेले अपील आज दिनांक २७.०८.२००९ रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सुनावणीसाठी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी गैरहजर, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच उपस्थित संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रं. ५६६६/०७ डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बॅंक, अमरावती विरुध्द राज्य माहिती

आयोग खंडपीठ,नागपूरच्या निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँकांना लागू होत नाही, असा दि.१३.०१.२००९ रोजी आदेश दिला आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे पूर्णवादी नागरी सहकारी बँक, बीड या नागरी सहकारी बँकेकडे माहितीची मागणी केली असल्याने व या बँकेस मा.उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याने, अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

आदेश

१) अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक : २७/०८/२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुनिल रंगनाथराव जोशी, नटराज फोटो स्टुडिओच्या बाजूला, सराफा रोड, बीड.
२. जन माहिती अधिकारी तथा शाखा अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, पूर्णवादी नागरी सहकारी बँक, सुभाष रोड, बीड
३. जन अपिलीय अधिकारी तथा सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३२

निर्णय दिनांक २९-०८-२००९

१ श्री. सुधीर मारुती जोर्वेकर, : अपिलार्थी
मु. पो. जुनी गिरमे चाळ, कोपरगांव, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अध्यक्ष / जिल्हा अधिकारी, संनित्रण समिती यांचे
कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,
अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तहसीलदार (सामान्य प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुन बुजून दिशाभूल करणारी व चुकीची माहिती दिली असल्यामुळे आणि जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो निर्णय न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन

अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १३-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. सुधीर मारुती जोर्वेकर यांनी आपल्या कार्यालयास दिनांक २५-११-२००८ रोजी एक तक्रार अर्ज व अनेक लेखी साक्षांकीत केलेले भ्रष्टाचा-याच्या पुराव्यासह सहपत्र समक्ष सादर केले होते. तरी सदर तक्रार अर्जाची फाईल आपल्या कार्यालयात पुढील कार्यवाहीसाठी कोणकोणत्या अधिका-याच्या टेबलावर गेली व संबंधित अधिका-याच्या टेबलावर कार्यवाहीसाठी किती दिवस ठेवली होती. आज रोजी सदर फाईल कोणत्या अधिका-याकडे आहे त्या अधिका-याचे नांव, हुद्दा व फाईल त्यांच्याकडे कार्यवाहीसाठी असल्याबाबतचा कालावधी (दिवस) ही माहिती साक्षांकीत स्वरुपात व रजिस्टर्ड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे अपिलार्थीस देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०४-२००९ रोजी अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांनी मागणी केलेली मूळ माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने, फेटाळून लावले. या सर्व प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला आहे. या युक्तिवादाव्दारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन माहिती अंशतः प्रश्नार्थक जरी असली तरी ती देण्याविषयी जन माहिती अधिकारी यांना सूचित करावे अशी आयोगास विनंती केली आहे व अपिलार्थीस भ्रष्टाचाराची प्रकरणे तडीस काढतांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून दिरंगाई झाली किंवा कसे हे त्यांना पाहावयाचे आहे जेणेकरुन ती माहिती अपिलार्थीस मिळाल्यास संबंधित अधिका-यावर दप्तर दिरंगाई कायद्यानुसार कार्यवाही होऊ शकेल असे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा युक्तिवाद लिखित स्वरुपात आयोगास सादर केला आहे त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस पुरविण्यात आलेली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही जरी सकृतदर्शनी प्रश्नार्थक स्वरुपात अशी असल्याचे दिसून येत असले ती माहिती अपिलार्थीने वेगळ्या स्वरुपात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असती तर ती माहिती प्रश्नार्थक स्वरुपात होत नाही. उदा. अपिलार्थीने केलेल्या तक्रार अर्जाची तपासणी करण्यासाठी अथवा छाननी करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांची नांवे, हुद्दे, फाईल कार्यवाहीसाठी असलेला कालावधी अशी माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही. केवळ अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे म्हणून अपिलार्थीस ती देय होत नाही, ही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती नाकारतांना घेतलेली भूमिका योग्य नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे आणि ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील कलम ७ (१) नुसार देणे क्रमप्राप्त आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी

लागणा-या कालावधीविषयी विचारले असता त्यांनी अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी दहा दिवस इतका कालावधी पुरेल असे आयोगास अवगत केले. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांना अपिलार्थी यांनी सादर केलेल्या तक्रार अर्जामधील प्रत्येक अर्ज ज्या ज्या अधिका-याकडे तपासणीसाठी अथवा अभिप्रायासाठी पाठविला आहे अशा सर्व अधिका-यांची नांवे, हुद्दा व दिनांक ही माहिती त्यांनी अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत साक्षांकीत करुन रजिस्टर्ड पोस्टाव्दारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत साक्षांकीत करुन रजिस्टर्ड पोस्टाव्दारे विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुधीर मारुती जोर्वेकर, मु. पो. जुनी गिरमे चाळ, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सामान्य प्रशासन), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,

अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३३/०९

निर्णय दिनांक २९-०८-२००९

१ श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, : अपिलार्थी
घर नं. १०/८, गजानन हौसिंग सोसायटी, (जुना मुकूंदनगर),
औरंगाबाद रोड, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कामगार तलाठी, मौजे भानसहिवरे, तालुका नेवासा,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका
नेवासा, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी तहसीलदार, नेवासा यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००९ रोजी प्रथम अपील केल्यानंतर संबंधितांनी या अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०१-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे मौजे भानसहिवरे, तालुका नेवासा येथील गट नंबर ३१६/३१७ च्या मालकी संदर्भात या गट क्रमांकाच्या ७/१२ च्या उता-यावरील नावाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती विचारली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व अपिलार्थीस आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रतीकरिता माहितीपोटी एकूण १५० रुपये इतक्या शुल्काचा भरणा चलनाव्दारे करण्याचे सूचित केले. तथापि प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर तहसीलदार, नेवासा यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, तहसीलदार व महसूल विभागाचे सर्व अधिकारी यांनी मिळून त्यांनी ज्या जमिनीविषयी माहिती मागितली आहे त्या जमिनीच्या कागदपत्रामध्ये अनधिकृत फेरफार करुन मोठा भ्रष्टाचार केलेला आहे व त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरःसर वंचित ठेवले आहे. त्यामुळे या प्रकरणी संबंधित तहसीलदार, नेवासा व जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडनीय किंवा खातेनिहाय चौकशीची कार्यवाही व्हावी व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस दिनांक १८-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे व त्यांची तलाठी या पदावर नव्याने

नियुक्ती झाली  असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीपैकी " जन माहिती अधिकारी यांच्या घरातील संसारपयोगी साहित्य ज्याची किंमत रुपये ५००० च्या वर आहे अशांची सविस्तर यादी  " या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.  कारण जन माहिती अधिकारी यांच्याशी संबंधित असलेली ही माहिती मिळाल्याने  कोणतेही व्यापक जनहित साध्य होईल असे आयोगास वाटत नाही.  ही माहिती अपिलार्थीस केवळ त्यांच्या स्वतःकरिता हवी आहे तसेच ही माहिती उघड केल्याने जन माहिती अधिकारी यांच्या खाजगी बाबीमध्ये  अगंतूक हस्तक्षेप होईल असे आयोगास वाटत असल्याने अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही.  उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे.  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०२-२००९ रोजी पुरविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस चुकीची माहिती पुरविल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे.  याच पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असणा-या कागदपत्राच्या प्रतीकरिता १५० रुपये इतके शुल्क स्टेट बँकेत भरण्याचे सूचित केले आहे.  तथापि या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी या शुल्काचा तपशील  जो त्यांनी अपिलार्थीस पुरविणे अधिनियमातील कलम ७ (३) (क) नुसार अनिवार्य आहे  तो अपिलार्थीस पुरविलेला  नाही त्यामुळे ही माहिती आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होत आहे.  सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, जन माहिती अधिकारी यांच्या खाजगी बाबीशी संबंधित माहिती वगळता, उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी  हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस चुकीची माहिती देऊन स्पष्ट केलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना करण्यात येत आहे व तसेच या प्रकरणी तहसीलदार, नेवासा यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेऊन स्पष्ट केलेल्या कार्यशैलीतील बेजबाबदारपणाची यथायोग्यरित्या नोंद घेण्याचेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. देशमुख मोईन अब्दुल लतीफ, घर नं. १०/८, गजानन हौसिंग सोसायटी, (जुना मुकूंदनगर), औरंगाबाद रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कामगार तलाठी, मौजे भानसहिवरे, तालुका नेवासा,

जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नेवासा, तालुका नेवासा, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिलहाधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३४

निर्णय दिनांक २९-०८-२००९

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, अपिलार्थी
मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,
कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव,
तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस जन माहिती अधिकारी श्री. राजेंद्र सखाराम नवले, निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती

आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे विनादिनांकाचे एक पत्र आयोगास सादर केले आहे. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली संपूर्ण माहिती मिळाल्याने आयोगाकडील त्यांच्या व्दितीय अपिलाची सुनावणी रद्द करण्याची व त्यांचे विचाराधीन व्दितीय अपील निकाली काढण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थी यांची ही विनंती आयोग मान्य करीत असून अपिलार्थीच्या विनंतीप्रमाणे त्यांचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ३४/२००९, दिनांक ०५-०५-२००८ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दिलीपराव नायकू थोरात, मु. पो. कोळपेवाडी, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३५

निर्णय दिनांक २९-०८-२००९

१ श्री. एल. एस. कोल्हे, : अपिलार्थी

रा. इंदिरा पथ, कोपरगांव, तालुका कोपरगांव,

जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, अपिलार्थी जालना येथे उप अभियंता म्हणून कार्यरत असतांना त्यांची एक वेतनवाढ रोखली होती त्यासंदर्भात काही माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अपिलार्थी यांची वेतनवाढ रोखण्याच्या आदेशाची प्रत, त्यांची कशा संदर्भात चौकशी झाली त्या प्रकरणातील कारणे दाखवा नोटीस वगैरे, अपिलार्थी यांच्या निवेदनावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात झालेल्या मूळ टिपणीची व अधीक्षक अभियंता यांच्या आदेशाची झेरॉक्स, माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांची नांवे आणि पदनाम - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न प्राप्त झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २६-०२-२००९ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी असे नमूद केले की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १६-०२-२००९ रोजी सुनावणी ठेवली असता या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हजर राहिले नाहीत. जन माहिती अधिकारी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकले नाहीत, असे जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांना सांगितले. या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर असल्याने जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राह्य धरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. अपिलार्थी प्रथम सुनावणीच्या वेळी देखील अशाच प्रकारे गैरहजर राहिले आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे मागितलेली माहिती तयार असल्याचे व अपिलार्थीस ही माहिती ते विनामूल्य उपलब्ध करुन देण्यासाठी ते तयार असल्याचे आयोगास अवगत केले. अपिलार्थीस पुरविण्यात येणा-या कथित माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य (पोस्टाव्दारे) उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य (पोस्टाव्दारे) उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एल. एस. कोल्हे, रा. इंदिरा पथ, कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३६

निर्णय दिनांक २९-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भास्कर देवराव येवले,<br>मल्हारवाडी रोड, राहुरी, तालुका राहुरी,<br>जिल्हा अहमदनगर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>नगर परिषद कार्यालय, राहुरी, तालुका राहुरी,<br>जिल्हा अहमदनगर | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, राहुरी,<br>तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रमुख लिपीक, नगर परिषद कार्यालय, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेळेवर माहिती न मिळाल्याने व जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद, राहुरी यांच्याकडे केलेल्या दिनांक २३-०९-२००८, १६-०४-२००८ रोजीच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही आणि जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०४-१२-२००७ रोजीच्या पत्रासंदर्भात केल्या गेलेल्या कार्यवाहीविषयी म्हणजे त्रयस्थ पक्ष श्री. कैलास माळी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दाखल केलेल्या सर्वे नंबर १०३/अ २ च्या ७/१२ उतारा नक्कल ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोस्टाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक १९-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात अर्ज फी म्हणून रुपये दहा इतक्या रकमेचा त्यांच्याकडे भरणा करण्याचे सूचित केले. याप्रमाणे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दहा रुपये इतकी अर्ज फी दिनांक ०२-१२-२००८ रोजी भरली. तथापि जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १९-११-२००८ रोजीचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-११-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-१२-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे सूचित केले. तथापि यापूर्वीच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-१२-२००८ रोजी माहिती पुरविली होती. ही बाब विचारात घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर दिनांक १८-१२-२००८ रोजी निर्णय पारीत केल्याचे दिसून येत आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास अवगत केली. त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष श्री. माळी यांची निवासस्थाने एकमेकांच्या शेजारी असून श्री. माळी यांच्या हद्दीतील झाडाचा पालापाचोळा अपिलार्थी यांच्या घरातील पाण्याच्या टाकीवर पडत असल्याने अपिलार्थीस त्यांच्या शेजा-याच्या घरातील झाडाच्या फांद्याची छाटणी करुन हवी आहे म्हणून या विषयावर ते नगरपरिषदेकडे वारंवार अर्ज करीत राहतात. तथापि श्री. येवले व श्री. माळी या दोघांच्या संबंधीत जागेची मालकी व हद्दी अद्यापपावेतो निश्चित झाल्या नाहीत, ती जमीन राज्य शासनाच्या जलसंपदा विभागाने संपादित केलेली आहे. या जागेची मालकी व हक्क निश्चित करुन घेण्यासाठी जलसंपदा विभागाने भूसंपादन कार्यालयाकडे पत्रव्यवहार केलेला आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-१२-२००८ व दिनांक २३-१२-२००८ रोजी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आणि या प्रकरणाची पाश्वभूमी लक्षात घेता प्रथमत: असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीच्या अर्जावर प्रतिसाद देतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अर्ज फी म्हणून एकूण दहा रुपये इतकी रक्कम त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज करतांना त्याच्यावर दहा रुपये किंमतीचा कोर्ट फी स्टॅम्प डकविला होता. नगरपरिषद राहुरी या सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधित, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर नगरपरिषदने अर्ज फी म्हणून दहा रुपये प्रतिअर्ज अशा प्रकारच्या शुल्काची निश्चिती करणे ही नगरपरिषदेची कृती नियमबाह्य आहे, कारण माहिती अधिकार अधिनियमाशी संबंधीत,

अशा प्रकारचे कोणतेही आदेश अथवा अधिसूचना राज्य शासनाने जारी केलेली नाही. त्यामुळे प्रथमत: जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्याकडून अर्ज फी म्हणून घेतलेले रुपये दहा इतके शुल्क त्यांना परत करावे लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ते ३ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशी माहिती दिली आहे की, त्यांच्याकडे अपिलार्थीने केलेल्या अर्जावरील कार्यवाही प्रलंबीत असल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी कोणत्याही प्रकारे संबंधित नसल्याने त्यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे कळविले आहे, जे बरोबर आहे. तसेच अपिलार्थीने त्रयस्थ पक्ष श्री. कैलास माळी यांनी दाखल केलेल्या सर्वे नंबर १०३/अ २ चा ७/१२ चा उतारा जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमत: उपलब्ध नव्हता. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतर दिनांक २३-१२-२००८ रोजी या उता-याची प्रत त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे, हे पाहता अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ३ शी संबधित माहिती देय होत असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षासंदर्भात मागणी केलेल्या माहितीचे सार्वजनिक स्वरुप पाहता ही माहिती उघड करण्यास त्रयस्थ पक्षाचा कोणताही आक्षेप असेल असे आयोगास वाटत नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ३ शी संबधित माहिती अपिलार्थीस द्यावी असे त्यांना आयोगाातर्फे सूचित करण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने " त्यांच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही " अशा प्रकारच्या मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात अपिलार्थीचा तक्रार अर्ज व त्यांनी दिनांक २०-१०-२००८ रोजीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज करेपर्यंतच्या कालावधीमध्ये या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेगवेगळ्या प्राधिकरणाशी केल्या गेलेल्या पत्रव्यवहाराच्या व या प्रकरणाशी संबधित या कालावधीतील अभिलेख्यावरील नोंदीच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्याव्या लागतील. सबब जन माहिती अधिकारी यांना

असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ३ शी संबंधित वरील परिच्छेदात स्पष्ट केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ३ शी संबधित माहिती त्यांना, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. भास्कर देवराव येवले, मल्हारवाडी रोड, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक, नगर परिषद कार्यालय, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३७

निर्णय दिनांक २९-०८-२००९

१ श्री. विजय अशोक पवार, : अपिलार्थी

डावखर खळवाडी, नाका नं. ५, राहुरी, तालुका राहुरी,

जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

सामान्य प्रशासन विभाग-१, जिल्हा परिषद, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

सामान्य प्रशासन विभाग-१, जिल्हा परिषद, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : कु. आरती किसन जाधव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०२-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्या या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली असता अपिलार्थीच्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर न देता जन अपिलीय अधिकारी यांनी 'तुमच्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी मी बांधील नाही ' असे उत्तर दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर्ग-३ मधील कर्मचा-यांना देण्यात आलेल्या नेमणुकीसंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत न मिळाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. मात्र अपिलार्थीस दिनांक ०२-०१-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असल्याचे एक पत्र सदर कागदपत्रामध्ये उपलब्ध आहे. यावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले नाही व त्यामुळे त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्या-पैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन काही अनुमान काढण्यात येऊन ही सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीपैकी अपिलार्थी हे दोन मुद्दयावर समाधानी नाहीत असे दिसून येते. त्यापैकी पहिला मुद्दा म्हणजे, कनिष्ठ सहायक भरती २००७ ची अंतीम निवड यादी दिनांक १८-०१-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे प्रसिध्द करण्यात आली, मात्र या दिनांकाच्या आधी दिनांक २७-१२-२००७ रोजी श्रीमती आरती किसन जाधव यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून जात पडताळणीसाठी पत्र दिले गेले होते,

असा आहे, अपिलार्थीच्या अर्जातील दुसरा मुद्दा असा आहे की, या प्रकरणी शासननिर्णय डावलून श्रीमती आरती किसन जाधव यांना निवड कशी देण्यात आली या प्रश्नाचे उत्तर त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले नाही. अपिलार्थीचे हे दोनही मुद्दे विचारात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने उपस्थित केलेले हे दोनही मुद्दे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील प्रशासकीय बाबींशी संबंधित आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-नुसार अर्जदाराने माहितीची मागणी केली असता जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यासंदर्भात, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती अधिका-याने कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दलची कारणे अथवा खुलासे अपेक्षित करणारी माहिती विचारणे अनुज्ञेय नाही. कारण ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या ' माहिती ' या शब्दाच्या व्याखेच्या व्याप्तीबाहेरचे आहे. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जे वरील दोन मुद्दे उपस्थित केले आहेत त्या मुद्दयांची तड लावण्यासाठी अपिलार्थीने वरील दोन मुद्दे हे जन माहिती अधिकारी यांच्या वरिष्ठांना अथवा प्रशासकीय बाबी-संबंधी इतर सक्षम प्राधिकरणाकडे कळवून त्यांच्या पातळीवर आपल्या शंकांचे निरसन करुन घ्यावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील अशा प्रकारच्या शंकांचे निरसन करणे व उत्तर देणे हे वरीलप्रमाणे आयोगाच्या कक्षेत नसल्याने व तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिली असल्याने व अपिलार्थीच्या शंकांचे निरसन करुन घेण्यासाठी आज आयोगासमोर देखील अपिलार्थी अनुपस्थित आहेत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक २९-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. विजय अशोक पवार, डावखर खळवाडी, नाका नं. ५, राहुरी, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-१, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग-१, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३८

निर्णय दिनांक २९-०८-२००९

१ श्री. शेख शाकीरभाई अब्दुल सत्तार, : अपिलार्थी
तवकल वस्ताद मळा, टिळक रोड,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपसंचालक (सं), अनु. जमाती प्रमाणपत्र तपासणी
समिती, आदिवासी विकास भवन, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसंचालक (संशोधन), अनु. जमाती प्रमाणपत्र
तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, नाशिक

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. बल्लाळ कल्याण यशवंत

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०५-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक २१-११-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काही मागविली असता विहित मुदतीत त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९

(१) च्या तरतुदीनुसार दिनांक २०-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही आदेश पारीत न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. कल्याण यशवंत बल्लाळ यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्रा-संदर्भात एकूण ७ मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १३-१२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे त्रयस्थ पक्षाची संमती प्राप्त होताच आवश्यक ती कागदपत्रे अपिलार्थीस पुरविण्याचे आश्वासीत केले. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०१-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ०७-०२-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्रयस्थ पक्ष श्री. बल्लाळ यांनी त्यांची माहिती उघड करण्यासाठी परवानगी दिली नसल्याचे अपिलार्थीस अवगत केले व सदर उत्तराने त्यांचे समाधान झाले नसल्यास सुनावणीसाठी दिनांक २५-०२-२००९ रोजी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी सूचित केले. तथापि सदरचे पत्र अपिलार्थीस २६-०२-२००९ या तारखेला प्राप्त झाल्याने अपिलार्थी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २५-०२-२००९ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहू शकले नाहीत. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निश्चित कोणता निर्णय घेतला हे आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे आढळून येत नाही. तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे हजर आहेत. त्यांना त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता असल्याचे आढळून आले.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (संशोधन), अनु. जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी लक्षात घेऊन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (संशोधन), अनु. जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०१-२००९ रोजीच्या प्रथम अपील

अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी लक्षात घेऊन सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख शाकीरभाई अब्दुल सत्तार, तवकल वस्ताद मळा, टिळक रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनु. जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (संशोधन), अनु. जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/३९

निर्णय दिनांक २९-०८-२००९

१ श्री. अमोल जगन्नाथ राळेभात, : अपिलार्थी
मार्केट यार्ड समोर, बीड रोड जामखेड, तालुका जामखेड,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, तालुका जामखेड,
जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा,
उपविभाग, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : शाखा अभियंता, जिल्हा परिषद, उपविभाग, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०६-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही, अपिलार्थीच्या मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी मुदत संपल्यानंतर प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याचे विनादिनांकाचे पत्र पाठवून

त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ६३५० इतके त्यांच्या कार्यालयात चलनाव्दारे भरण्याचे सूचित केले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे सन २००८-२००९ या कालावधीशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील बारावा वित्त आयोग, रस्ते दुरुस्ती व पूल बांधकाम, रोजगार हमी योजना व आमदार व खासदार यांच्या निधीतील कामाच्या अंदाजपत्रकांच्या, मोजमाप पुस्तिकांच्या सत्यप्रतीची माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०४-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहितीपोटीचे शुल्क ६३५० इतके अपिलार्थीस भारतीय स्टेट बॅकेत भरुन चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे सूचित केले. तथापि या पत्राने समाधान न झाल्याने आणि या अर्धवट पत्रावर सही नसल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार परत उप अभियंता यांच्या-कडे दिनांक २०-०४-२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०५-२००९ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे लागणारे शुल्क बँकेत भरण्यासाठी सूचित केले. तथापि अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही अंतीम निर्णय पारीत केला नाही. या सर्व प्रकाराने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक ०४-०४-२००९ रोजीच्या पत्रावर सही न करण्याचे कारण विचारले असता त्यांनी आयोगास असे अवगत केले की, कामाच्या गडबडीमुळे अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क कळविणा-या या पत्रावर सही करण्याचे त्यांच्या हातून राहून गेले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. परंतु अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे ती माहिती त्यांना व्यक्तिशः हवी असल्याचे नमूद केले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर या संदर्भातील पुढील घडामोडी, माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारे आवश्यक ते शुल्क, माहितीचा तपशील इत्यादी प्राप्त करुन घेणे हे अर्जदाराचे संपूर्ण उत्तरदायित्व असते. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे किती वेळा गेले यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. मूळात व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक असणा-या माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची राहत नाही. एवढे असूनही या प्रकरणी अपिलार्थीने अर्ज केल्यापासून त्यांनी तीस दिवसाच्या आत अपिलार्थीच्या अर्जावर प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क विनासहीच्या पत्राने का होईना अपिलार्थीस कळविले आहे याचा अर्थ अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अनौपचारिकरित्या त्यांना ज्ञात झाले आहे. परंतु या शुल्काचा भरणा करण्याची अपिलार्थीने कोणत्याही टप्प्यावर तयारी दर्शविली नाही. तसेच या पत्रावर अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती वेळा गेले हे आयोगास अवगत करुन देण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता माहिती प्राप्त करुन घेण्यासाठीचे त्यांचे उत्तरदायित्व अपिलार्थीने पार न पाडल्यामुळे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होऊ शकली नाही असे आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती

त्यांच्याकडे तयार असल्याचे आयोगास अवगत करुन दिले आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी या माहितीपोटीचे प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे शुल्काचा भरणा करुन ती प्राप्त करुन घ्यावी लागेल असे अपिलार्थीस या टप्प्यावर सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अमोल जगन्नाथ राळेभात, मार्केट यार्ड समोर, बीड रोड जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, जिल्हा परिषद, उपविभाग, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा, उपविभाग, जामखेड, तालुका जामखेड, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४०

निर्णय दिनांक २९-०८-२००९

१ श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे, : अपिलार्थी

रा. लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम

उपविभाग, कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,

अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोाकडे सादर केलेले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०८-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या उपविभागाशी संबधित काही माहिती एकूण १७ मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०९-२००८

रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहितीबाबतचे शुल्क ४७४ रुपये इतके अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दिनांक १४-११-२००८ रोजी पारीत करुन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विनाशुल्क देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या आदेशानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना आवश्यक असल्याचे व त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथम अर्जासंदर्भात माहिती प्राप्त झालेली नाही असे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी, अपिलार्थीने शुल्क भरले नसल्याने अपिलार्थीस माहिती पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५, ६, ७, ८, १० व मुद्दा क्रमांक १३ व्दारे मागितलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदी-नुसार पूर्णपणे विसंगत आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयातील शाखा अभियंत्याच्या विरुध्द आलेल्या सर्व तक्रारीच्या छायांकीत प्रती ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. ही माहिती उघड केल्याने कोणतेही व्यापक जनहित साध्य होण्याची शक्यता आयोगास वाटत नसल्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस उघड करता येणार नाही. उर्वरित मुद्दा क्रमांक ६, ७, ८, १० व १३ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती मागितल्याने दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाबद्दलची त्यांची स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे अर्जदाराला अनुज्ञेय नाही. त्यामुळे या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होणार नाही. तथापि हे मुद्दे वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देणे भाग आहे. या प्रकरणामध्ये असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविला आहे. अपिलार्थी त्यांच्या दिनांक २५-०९-२००८ च्या पत्रात म्हणतात त्याप्रमाणे त्यांच्या अर्जातील प्रत्येक मुद्दयावरील माहितीकरिता वेगळे शुल्क कळविण्याची अथवा त्यांनी या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे फी च्या सूचीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला नाही अथवा तो भरण्याची तयारी देखील अपिलार्थीने या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर दर्शविल्याचे आढळून येत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५, ६, ७, ८, १० व १३ वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक ५, ६, ७, ८, १० व १३ वगळता उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत सशुल्क पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोकुळ त्रिंबक शिंदे (पत्रकार), रा. लोणी खुर्द, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कर्जत, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४१

निर्णय दिनांक २९-०८-२००९

१ श्री. रामचंद्र बाप्पाजी रत्नपारखी, : अपिलार्थी
राम मंदिर रोड, मु.पो. कोपरगांव, तालुका कोपरगांव,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, शिर्डी नगर पंचायत कार्यालय, शिर्डी,
तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्याधिकारी, शिर्डी नगर पंचायत कार्यालय, शिर्डी,
तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वसुली लिपीक, शिर्डी नगर पंचायत कार्यालय, शिर्डी,
तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०१-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी, दिशाभूल करणारी माहिती दिली व माहिती दिल्याचे कारण दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे प्रथम अपील निकाली काढले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २६-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शिर्डी नगर पंचायत कार्यालय, शिर्डी, तालुका राहाता हद्दीतील स्थावर मालमत्तेविषयी एकूण आठ मुद्दयाव्दारे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" १. अनंत बाप्पाजी रत्नपारखी यांची घ. नं. ४९०/१ व ४९०/२ वर नोंद करणेबाबतचे अर्जाची नक्कल याच बाबतची कोर्ट नक्कल.

२. लक्ष्मीबाई अनंत रत्नपारखी यांचे मुखत्यार शशिकांत अंबादास कुलकर्णी यांनी त्यांचे तारीख १/१२/२००४ हस्त लिखित नकाशा आपणांकडे दिलेला त्याबाबत संपूर्ण माहिती.

३. लक्ष्मीबाई अनंत रत्नपारखी यांनी वरील इमारतीचे मंजुरी करता दिलेल्या ता. २/४/०८ चा प्लॅन व त्यासंबंधी सपूर्ण माहिती.

४. लक्ष्मीबाई अनंत रत्नपारखी यांनी मे. कोपरगांव कोर्टात मिळकतीचे दावे चालू असता दत्तकपूत्र वैभव यांचे नांव मिळकतीवर कोणाचे हुकूमाने लागले ती माहिती.

५. बाप्पाजी लक्ष्मण रत्नपारखी यांचे शिर्डी येथील घ. नं. ६०६ चे दुरुस्ती ठराव नं. १५ ची माहिती ता. १३/८/१९८५.

६. शिर्डी घ. नं. ६०६ यातून लक्ष्मीबाई अनंत यांनी भिंती फोडून पाण्याचे नळ घेतले बाबतची पूर्ण माहिती.

७. लक्ष्मीबाई अनंत यांनी रत्नपारखी वाड्यात केलेल्या अतिक्रमणाची माहिती.

८. रामचंद्र बाप्पाजी रत्नपारखी, रा. शिर्डी यांनी सन १९६४ साली ग्रा. पं. घ. नं. ४९०/२ मधील चार खण सागवाणी उभे घर अनंत बापपाजीकडून खरेदी घेतले त्याची नोंद न. नं. ८ वर नोंद नाही याची माहिती पाठवावी. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १७५ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी

यांच्याकडून प्राप्त झालेल्या सूचनेनुसार अपिलार्थीने दिनांक २८-०८-२००८ रोजी या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे पावती क्रमांक ६३०६१ व्दारे केला व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०८-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-१२-२००८ रोजी आपला निर्णय पारीत करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर समाधान झाले नसल्याचे आयोगास नमूद केले आहे. त्यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर केला आहे. या युक्तिवादाचे अवलोकन करता असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही माहिती खोटी असल्याचे नमूद केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६, ७ व ८ व्दारे मागणी केलेली माहिती मूळात अपिलार्थीस तिचे स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. यामध्ये अपिलार्थीने घ. नं. ६०६ यातून लक्ष्मीबाई अनंत यांनी भिंती फोडून पाण्याचे नळ घेतल्याबाबतची पूर्ण माहिती, लक्ष्मीबाई अनंत यांनी रत्नपारखी वाड्यात केलेल्या अतिक्रमणाची माहिती, रामचंद्र बाप्पाजी रत्नपारखी यांनी सन १९६४ साली ग्रामपंचायत घर नं. ४९०/२ मधील चार खण सागवाणी उभे घर अनंत बाप्पाजीकडून खरेदी घेतले त्याची नोंद नमुना नं. ८ वर नोंद नाही याची माहिती, अशा प्रकारची माहिती मागितल्याचे

दिसून येते.  या माहितीचे एकूण स्वरुप मूळात इतके मोघम व अर्थहीन आहे की अपिलार्थीस या मुद्दयावर कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांना आवश्यक त्या तपशीलाशिवाय देणे शक्य नाही.  जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिलेली आहे या माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असे दिसून येत नाही.  सबब अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी संबधित सर्व अभिलेख्यांची तपासणी करण्याची विनंती जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वेगळ्या अर्जाव्दारे करावी म्हणजे त्यांना आपल्या आक्षेपांचे निराकरण करता येईल.  अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, श्री. बाप्पाजी अनंत रत्नपारखी यांचे शिर्डी येथील घराच्या दुरुस्तीचा दिनांक १३-०८-१९८५ रोजी मूळात ठराव संबंधित ग्रामपंचतीने घेतला होता किंवा कसे हे त्यांना माहिती नाही.  कारण शिर्डी नगर पंचायत कार्यालय हे १९९० साली आस्तित्वात आले असून या पूर्वीचे सर्व अभिलेखे पंचायत समितीकडे पाठविली गेली आहेत.  या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती पंचायत समिती, राहाता यांच्याकडून स्वतः प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व अपिलार्थीस त्यांच्याकडून माहिती पोटीचे दिनांक २८-०८-२००८ रोजी घेतलेले शुल्क रुपये १७५ इतके त्यांना परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी त्यांनी स्विकारलेले शुल्क रुपये १७५ इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसात परत करावे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१	श्री. रामचंद्र बाप्पाजी रत्नपारखी, राम मंदिर रोड, मु.पो. कोपरगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर.

२	जन माहिती अधिकारी तथा वसुली लिपीक, शिर्डी नगर पंचायत कार्यालय, शिर्डी, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, शिर्डी नगर पंचायत कार्यालय, शिर्डी, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४२

निर्णय दिनांक २९-०८-२००९

१ श्री. चंगेडे शशिकान्त पेमराज, : अपिलार्थी
३४६०, खिस्त गल्ली,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी
कार्यालय, अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०३-२००९ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्यांचे प्रथम अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलीय अधिका-याचे नांव व पत्ता दिला नाही असे आयोगास अवगत केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेच्या मंजूर कामांच्या हजेरीपत्रकाची व मोजमाप पुस्तिकाची सन २००३ ते २००४ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण सात मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - चेडे चांदगाव या गावामध्ये झालेल्या संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत कामाच्या व मजुराच्या हजेरीपत्रकाच्या व मस्टरच्या क्रमांकासह प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडून व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीचा सदरचा अर्ज जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी यांच्या कार्यालयास त्यांना दिनांक २७-११-२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे प्रत्यक्षतः उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडील दिनांक २७-११-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्याच्या कार्यक्षेत्रातील ज्या तालुका कृषि अधिका-याशी संबधित होती त्यांच्याकडे पाठविला व दिनांक २७-११-२००८ रोजीच्या या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही तालुका कृषि अधिकारी, शेवगांव यांच्या कार्यालयाशी संबधित होती. तथापि विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याकडे दिनांक २६-१२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील अर्जासंबंधात जन अपिलीय अधिकारी म्हणून तालुका कृषि अधिकारी, शेवगांव यांची नियुक्ती झाली असल्याने उपसंचालकानी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज दिनांक ३१-१२-२००८ तालुका कृषि अधिकारी, शेवगांव यांच्याकडे पाठविला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०१-२००९ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंरही अपिलार्थीस माहिती

प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन आयोगाकडे त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात सादर केला आहे. या लेखी युक्तिवादामध्ये अपिलार्थीने त्यांना अनुज्ञेय माहिती प्राप्त न झाल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर २५००० रुपये इतकी शास्ती लावण्याची व त्यांच्या खातेनिहाय चौकशीचे आदेश देण्यासंदर्भात आयोगास विनंती केली व तसेच त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त व्हावी अशीही अर्जात विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाशी प्रत्यक्षपणे संबंधत नसल्याने त्यांनी प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून हस्तगत करुन घेण्यासाठी अपिलार्थीस सूचित केले होते. तथापि अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही उपस्थित न राहिल्याने त्यांनी दिनांक १९-०१-२००९ रोजी अर्जदारास ही माहिती पोस्टाव्दारे पाठविली होती. जन माहिती अधिकारी यांनी वरील दोनही पत्रे अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगच्या पावतीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. ही माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी अधिनियमातील कलम ६

(३) (एक) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचा मूळ अर्ज व अपील अर्ज विहित केलेल्या मुदतीत पाठविण्याची कार्यवाही या प्रकरणी केलेली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक १४-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचित केले होते. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, मात्र हे पत्र अपिलार्थीस पाठविल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला आहे. दिनांक १९-०१-२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती पाठवून दिल्याचा पुरावा आयोगास सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केल्याचे आढळून येत आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी तालुका कृषि अधिकारी, शेवगांव यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना आयोगासमोर विनामूल्य हस्तांतरीत केली आहे हे पाहता आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात कोणतेही आदेश देण्यात येत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची व शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याची विनंती आयोगास केली आहे. त्याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांना व्यक्तिशः माहिती हवी असल्याचे नमूद केले आहे. व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यास आपल्याला आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व अपिलार्थी यांच्यावर येते. त्यामुळे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ती माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात पुढील सर्व घडामोडी ज्ञात होण्यासाठी अपिलार्थीने स्वतः होऊन जन माहिती अधिकारी यांच्याकडे संपर्क साधणे अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत राहिले असते. तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर राहिल्याचा कोणताही पुरावा आयोगास सादर केला नाही उलट अपिलार्थीस माहिती दिल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी सादर केला आहे. त्यामुळे अपिलार्थीपासून संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने माहिती दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे संबंधित जन माहिती

अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कार्यवाही आयोग आदेशित करीत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. चंगेडे शशिकान्त पेमराज, ३४६०, खिस्त गल्ली, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२२२

निर्णय दिनांक २९-०८-२००९

१ श्री. संजय यशवंतराव भंडारे, : अपिलार्थी
११, शिवश्री, बुरुडगांव रोड, वैभव हॉटेलजवळ,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप प्राचार्य,
न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा प्राचार्य,
न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-१२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने सादर केलेल्या लेखी व तोंडी निवेदनाची दखल न घेता सुनावणीचा असत्य व खोटा अहवाल तयार करुन माहित देण्याचे नाकारले व अपिलार्थीस व्यथित करुन अन्याय केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १९-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांच्याकडे, कॉलेजच्या संगणक विभागामध्ये काम करणा-या कर्मचा-यांना त्यांच्या मासिक वेतनाव्यतिरिक्त महाविद्यालयाच्या लेखा विभागामार्फत पुणे विद्यापीठ, महाराष्ट्र शासन अथवा महाविद्यालयाच्या जमा निधीतून अदा करण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या रकमांचा तारखेनुसार व कारणांचा तपशील, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने माहिती मागण्यामागे त्यांचा हेतू प्रमाणिकपणाचा नाही, अपिलार्थी हे संस्थेचे सेवक आहेत, संस्थेच्या सेवकाने आणि तो कार्यरत असणा-या संस्थेचीच माहिती अधिकाराखाली माहिती मागविण्याचा हेतू हा प्रामाणिकपणाचा होऊ शकत नसल्याचे कारणावरुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज नामंजूर केला. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादामुळे समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार प्राचार्य, न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांच्याकडे दिनांक ०४-०९-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०७-१०-२००८ रोजी निर्णय दिला व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही कोणत्याही सार्वजनिक हिताची व समाजाशी निगडीत नसल्याने अपिलार्थीस ही माहिती देण्याची आवश्यकता नाही असे अनुमान काढून अपिलार्थीचे प्रथम अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०८-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्यांचे वकील हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री. शेलार यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या कॉलेजची माहिती मागितली आहे ते कॉलेज पब्लिक ट्रस्ट ॲक्टखाली नोंदणी केलेले कॉलेज असून अपिलार्थीने ज्या कोर्सच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे त्या कोर्सकरिता शासनाकडून अथवा पुणे विद्यापीठाकडून कोणतेही अनुदान प्राप्त झालेले नाही. तसेच अपिलार्थी हे संस्थेचे सेवक असल्याने व अपिलार्थीचा माहिती मागण्याचा हेतू चांगला नसल्याने आणि ही माहिती उघड केल्याने कोणतेही सार्वजनिक हित साध्य होणार नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार ज्या प्राधिकरणाकडे मूळ अर्ज केला ते प्राधिकरण म्हणजे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर हे होय. या कॉलेजास शासनाकडून अनुदान प्राप्त होत असते त्यामुळे हे कॉलेज सार्वजनिक प्राधिकरण होत आहे व या कॉलेजला माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या सर्व तरतुदी तंतोतंत लागू होत आहेत. अपिलार्थीने संस्थेशी संबंधित कार्यालयाकडे कोणतीही माहिती मागितली नाही. अपिलार्थीने या कॉलेजसाठी नेमलेल्या जन माहिती अधिका-याकडे काही माहिती मागितली होती. त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात तात्काळ कार्यवाही करण्याचे जन माहिती अधिकारी यांचे कर्तव्य ठरते. तथापि अपिलार्थीच्या अर्जाबाबत निरर्थक शंका उपस्थित करुन त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास टाळले. त्यामुळे वरील बाबी विचारात घेता अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना संस्थेकडून देय होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देतांना हा निर्णय नि:पक्षपातीपणाने न देता अपिलार्थी विषयी एक विशिष्ट भाव ठेऊन हा निर्णय दिल्याचे आयोगास प्रतीत होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अशा प्रकारे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी मूळात सुसंगत असल्याने ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल. सबब संबधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित

करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक २९-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. संजय यशवंतराव भंडारे, ११, शिवश्री, बुरुडगांव रोड, वैभव हॉटेलजवळ, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप प्राचार्य, न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४३
निर्णय दिनांक ३१-०८-२००९

१. श्री. सदाफुले राहुल मधुकर, : अपिलार्थी
मु.पो.ता.जामखेड,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामसेवक, ग्रामपंचायत,
जामखेड,जि. अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, जामखेड,जि.अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०६.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले असता, सदर अपील दाखल करुन घेण्यास जन अपिलीय अधिकारी यांनी नकार दिल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०४.२००९ रोजीचा मूळ अर्ज, जो जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२०.०४.२००९ रोजी प्राप्त झाला, त्याद्वारे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, जामखेड यांच्याकडे इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २००६-०७ व २००७-०८ या कालावधीत झालेल्या घरकुलाविषयी काही माहिती त्यांनी मूळ अर्जासोबत जोडलेल्या अर्जाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०५.२००९ रोजी प्रथम अपील केले असता, सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी स्वीकारण्याचे नाकारल्यामुळे, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०८.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधीही उपस्थित नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा विषय व तिची व्याप्ती पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि.२५.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेणे अगत्याचे राहील, असे आयोगास वाटते. सबब अपिलार्थीच्या दि. २५.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, जामखेड यांना या आदेशाबरोबर पाठविण्यात येऊन असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी अथवा या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अहमदनगर यांच्या कार्यालयाकडून नियुक्त केल्या गेलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दि.२५.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला आदेश पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२५.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला आदेश पारित करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : ३१-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सदाफुले राहुल मधुकर,मु.पो.ता.जामखेड,जि.अहमदनगर-४३१ २०१.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,जामखेड,ता.जामखेड जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत),पंचायत समिती, जामखेड, जि.अहमदनगर यांना अपिलार्थीच्या दि. २५.०५.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीसह, या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४६
निर्णय दिनांक ३१-०८-२००९

१. सौ.सुलोचना लक्ष्मण कोल्हे, : अपिलार्थी
रा. इंदिरापथ,कोपरगाव,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तहसील कार्यालय, कोपरगाव
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,कोपरगाव,जि.अहमदनगर.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय,कोपरगाव, जि.अहमदनगर.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,कोपरगाव, जि.अहमदनगर श्री. राजेंद्र सखाराम नवले यांनी अपिलार्थीचे दि. १२.०१.२००९ रोजीचे एक निवेदन आयोगास सादर केले असून या निवेदनामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती अधिकाराची माहिती प्राप्त झाली असून, याबाबत त्यांची काहीही तक्रार नाही व तसेच खंडपीठाकडील अपील त्यांना चालवावयाचे नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. अपिलार्थीने या अपिलाशी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती देखील अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

अपील क्र.४६/०९, दि.०९.०२.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ३१-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुलोचना लक्ष्मणराव कोल्हे,मु.पो.इंदिरापथ कोपरगाव,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,कोपरगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,कोपरगाव,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४७
निर्णय दिनांक ३१-०८-२००९

१. श्री. दिलीप नायकू थोरात, : अपिलार्थी
मु.पो.कोळपेवाडी,ता.कोपरगाव,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
निवासी नायब तहसीलदार,
कोपरगाव, जि.अहमदनगर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार,कोपरगाव,जि.अहमदनगर.

त्रयस्थ पक्षः श्री. अविनाश प्रभाकर पानगव्हाणे

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०३.२००९ रोजी नोंदविलेले दि. ०४.०३.२००९ रोजीचे द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,कोपरगाव, जि.अहमदनगर श्री. राजेंद्र सखाराम नवले यांनी आयोगास उद्देशून लिहिलेले दि.३१.०८.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली असल्याने त्यांचे विचाराधीन अपील रद्द करण्यात यावे व अपील अर्ज निकाली काढण्यात यावा.

अपिलार्थीची ही विनंती मान्य करुन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील क्र.४७/०९, दि.०६.०३.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ३१-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीपराव नायकू थोरात, रा.कोळपेवाडी,ता.कोपरगाव,जि.अहमदनगर -४२३६०२.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,तहसील कार्यालय,कोपरगाव, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,कोपरगाव,जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५०
निर्णय दिनांक ३१-०८-२००९

१. श्री. अभिजित सी पुप्पाल, अहमदनगर. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा व्हाईस चेअरमन, एसटी कास्ट स्क्रुटीनी कमिटी,नाशिक : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा एसटी कास्ट स्क्रुटीनी कमिटी,नाशिक

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती, नाशिक विभाग,नाशिक

जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती, नाशिक विभाग,नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट व विलंबाने माहिती दिली व हेतूपुरस्सर व दुष्ट हेतूने माहिती देण्याचे टाळल्याने, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचेवर शास्तीची कारवाई करण्याची विनंती आयोगास केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. १२.०३.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या समितीतील वरिष्ठ संशोधन अधिकारी यांच्यासंदर्भात एकूण ४

मुद्यांद्वारे, दि. ०१.०१.२००१ ते दि.१२.०३.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०२.०४.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने दि. १२.०३.२००९ रोजी खालील दोन वेगवेगळया अर्जांद्वारे मागितलेल्या माहितीपोटी शुल्क रु.७५९/- इतके त्यांच्याकडे चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.११.०४.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः दि.११.०५.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि या सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिल्याने त्यांनी परत दि.२६.०५.२००९ रोजी अपिलार्थीस त्यसांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याचे सूचित केले. तथापि दि.२६.०५.२००९ रोजी देखील अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीस उपस्थित न राहिल्याने त्यांनी अपिलार्थीचे अपील त्यांना माहितीची गरज नाही, असे अनुमान काढून अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०८.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, आयोगासमोर त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आजही आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दोन वेळा सुनावणी ठेवली होती, तथापि सुनावणीच्या या दोनही दिवशी अपिलार्थी अनुपस्थित राहिल्याने त्यांच्या प्रथम अपिलावर त्या निर्णय घेऊ शकल्या नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती

अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थीने आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दोन वेळा सुनावणी ठेवली असता, या दोनही वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित राहिले व त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न घेता, अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या प्रकरणी अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे शुल्क भरण्याची कार्यवाही न करता जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करणे, जन अपिलीय अधिकारी यांनी दोन वेळा आयोजित केलेल्या सुनावणीच्या दोनही दिवशी गैरहजर राहणे अशाप्रकारच्या कृती कायद्यास धरुन नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीच्या दि.११.०४.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय घेऊन निर्णय देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दि. ११.०४.२००९ रोजीच्या प्रथम अपील अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला आदेश पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.११.०४.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला आदेश पारित करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : ३१-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अभिजित सी पुप्पाल,३०१,आदर्श क्लासिक खिस्त गल्ली, अहमदनगर-४१४ ००१

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती, नाशिक विभाग,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र समिती,नाशिक विभाग,नाशिक या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५१
निर्णय दिनांक  ३१-०८-२००९

१. सौ.सुलोचना लक्ष्मण कोल्हे, : अपिलार्थी
रा. इंदिरापथ,कोपरगाव,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय),
अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०२.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुदतीत माहिती न मिळाल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील नागरिकांची सनद,अधिनियमातील कलम ४ च्या संदर्भात स्वयंप्रेरणेने प्रसिध्द करावयाची माहिती व त्यांच्या कार्यालयाशी संबंधित इतर मुद्यांवरील काही माहिती मागविली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.०४.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने

मागणी केलेली माहिती वेबसाईटवर प्रसिध्द करण्याची कार्यवाही चालू आहे व सदरची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अपिलार्थीस प्रसिध्द केलेली सर्व माहिती पुरविण्याचे आश्वासित केले. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित केलेल्या मुदतीत अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.०५.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०२.२००८, ०९.०३.२००९ व २४.०३.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी होऊन निर्णय होऊ शकला नाही. मध्यंतरीच्या काळात दि.०३.०२.२००९ रोजी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०८.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दि.१६.०२.२००९ रोजी विनामूल्य पुरविली असून ही माहिती प्राप्त झाल्याची अपिलार्थीची पोच त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील दि.०३.०२.२००९ रोजी नोंदविल्यानंतर दि.१६.०२.२००९ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली आहे. या माहितीच्या दर्जाबाबत अथवा त्याबद्दल कोणतेही आक्षेप अपिलार्थीने आयोगाकडे आजतागायत नोंदविलेले नाहीत त्यामुळे व तसेच अपिलार्थीची आजच्या सुनावणीसाठीची अनुपस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचे अनुमान काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.५१/०९, दि.०३.०२.२००९ खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३१-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुलोचना लक्ष्मणराव कोल्हे,मु.पो.इंदिरापथ, कोपरगाव,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय),अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४४
निर्णय दिनांक ३१-०८-२००९

१. श्री. रमेश वसंत शिंदे, कोपरगाव,जि.अहमदनगर : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, अध्यक्ष/जिल्हाधिकारी, सनियंत्रण समिती कार्यालय, अहमदनगर : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तहसीलदार सामान्य प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अर्जासंदर्भात जाणूनबुजून दिशाभूल करणारी, चुकीची व खोटी माहिती दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी दि. १६.०३.२००९ रोजी सुनावणी ठेवली होती. परंतु यासंदर्भात अपिलार्थीने लेखी युक्तिवाद नोंदविला असला तरी देखील सुनावणीचा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, शासनाने माहिती अधिकार अधिनियमातील आदेशाच्या अंमलबजावणी संदर्भात नियुक्त केलेल्या जिल्हास्तरावरील सनियंत्रण समितीविषयीची, माहे जानेवारी, २००९ अखेरपर्यंतची दोन मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - "जिल्हाधिकारी,मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्या समन्वयाने जिल्हास्तरावर स्थापन करावयाच्या सनियंत्रण समितीच्या कार्यपध्दतीविषयी संपूर्ण माहिती व संबंधित अध्यादेशाच्या साक्षांकित प्रती आणि सनियंत्रण समितीकडे प्राप्त प्रकरणांवरील कार्यवाहीची मुदत व प्रकरणामध्ये दिरंगाई झाल्यास संबंधित अधिकाऱ्यावर करावयाच्या कारवाईबाबतची माहिती"- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १३.०२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे नमूद करुन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले असता, सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०८.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधीही उपस्थित नाहीत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि.१३.०१.२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१३.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले असल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस माहिती नाकारताना जन माहिती अधिकारी यांनी दिलेले कारण आयोगास समर्पक वाटत नाही, त्यामुळे या प्रकरणी जन अपिलीय

अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२६.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब उपजिल्हाधिकारी (महसूल), जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांनी अथवा या प्रकरणी जिल्हा महसूल प्राधिकरणाकडून नेमल्या गेलेल्या जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दि. २६.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थी यांच्या दि.२६.०२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ३१-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रमेश वसंत शिंदे,गजानन नगर, इदगाह परिसर, कोपरगाव,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार सामान्य प्रशासन,जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल),जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४५
निर्णय दिनांक ३१-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. शाम सुदाम शिंदे,<br>अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>अध्यक्ष/सचिव,<br>अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज,<br>अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, अहमदनगर. | | |

त्रयस्थ पक्ष : श्री.निलेश सत्यवान म्हसे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०५.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना संबंधित संस्थेकडून माहिती मिळाली नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.१२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे अध्यक्ष/सेक्रेटरी, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संस्थेच्या संदर्भात सन २००० ते २००८ या कालावधीशी संबंधित एकूण १२ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जामध्ये ते

दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे व त्याचा पुरावा म्हणून त्यांच्या शिधावाटप पत्रिका क्र.YH No.550403 ची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. अपिलार्थीने सदर संस्थेकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये - " संस्थेने सन २००३-२००८ या आर्थिक वर्षामध्ये केलेल्या संपूर्ण खर्चाच्या बिलाच्या प्रती, खरेदीसाठी वर्तमानपत्रात वेळोवेळी दिलेल्या निविदेच्या प्रती व मंजूर केलेल्या निविदेची माहिती,जाहीरात,राज्य व केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीबाबतच्या नियोजनाची माहिती, संस्थाचालक व विश्वस्तांना दिल्या जाणाऱ्या मानधनाची रक्कम, अर्ज केल्या तारखेपासून मागील तीन पंचवार्षिक निवडणूकीची माहिती, संस्थेच्या स्थापनेपासून अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत संस्थेच्या सभासदांची संपूर्ण यादी, संस्थेची घटना, उद्देश व नियमावली, संस्थेला एन.सी.सी. व एन.एस.एस. च्या उपक्रमातून सन २००० ते आजतागायत प्राप्त झालेला निधी,खर्च, लेखापरीक्षण अहवाल, शासनाची मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वितरीत न केल्याची कारणे व दोषींवर केलेल्या कारवाईची माहिती, सन २००३ ते २००८ पर्यंत संस्थेने कार्यरत शिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या केलेल्या बदल्यांसंदर्भात सविस्तर माहिती"- अशा विस्तृत माहिती अपेक्षिणाऱ्या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे दि. २०.०१.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपिलार्थीस दि.०५.०२.२००९ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार सदर अपील धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे करावयाचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या उत्तराने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०८.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे वकील, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि.२०.०१.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी अपिलार्थीस दि.०५.०२.२००९ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांच्याकडे प्रथम अपील करण्याची केलेली सूचना चुकीची आहे, कारण अपिलार्थीने ही माहिती ज्या संस्थेकडे मागितली होती, त्या संस्थेने धर्मादाय आयुक्त यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केलेली नाही किंबहुना या संस्थेला अशी नेमणूक करता येत नाही, हे पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दि.२०.०१.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी सुनावणी घेऊन निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर तथा जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दि. २०.०१.२००९ रोजीच्या प्रथम अपील अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२०.०१.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

**अहमदनगर**
**दिनांक : ३१-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शाम सुदाम शिंदे, द्वारा निलेश सत्यवान म्हसे पा. इरीगेशन कॉलनी, फकीरवाडा, अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव,अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज,अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अहमदनगर या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४८
निर्णय दिनांक ३१-०८-२००९

१. श्री. विजय बबन वाळुंज, : अपिलार्थी
रा.कोपरगाव,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक नगर रचनाकार, अहमदनगर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
नगर रचना, नाशिक विभाग,नाशिक

त्रयस्थ पक्ष : श्री. राजेंद्र सिताराम दिक्षीत

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३०.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. २४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथमतः नाकारले, त्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी त्याच्यावर दि.२४.१२.२००८ रोजी निर्णय दिला, तो निर्णय समतोल नाही. त्यांनी त्यांच्या कनिष्ठ सहकाऱ्यांची तळी उचलून धरली आहे व त्यांच्या सहकाऱ्यांना पाठीशी घातले आहे व अपील फेटाळताना नैसर्गिक न्याय तत्त्वाची पायमल्ली केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.१०.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६५ मधील कलम ४५ व महाराष्ट्र

नगरपालिका अधिनियम १९६५ मधील कलम १८९(४) या बांधकामास दि.२९.०१.२००८ रोजी दिलेल्या मंजूरी संदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - 'श्री. राजेंद्र सिताराम दिक्षीत रा. कोपरगाव यांचा नगरपालिका हद्दीतील भूखंड क्र.१३३४ मध्ये नवीन बांधकाम करण्यासाठी सादर केलेला आराखडा शासकीय मापदंडास व नियमास अधीन राहून मंजूर करण्यात आला काय?', 'आराखडा मंजूर केला असल्यास त्याची प्रमाणित प्रत', '----------------आपली आराखडयास मंजूरी कोणत्या प्रयोजनासाठी दिली आहे', '----------------------आपण त्यांना रहिवास प्रयोजन व्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी मंजूर केलेला आराखडा नियमास आहे काय? नसल्यास आपण दिलेली आराखडयाची मंजूरी रद्द करणार का?', 'वरील मंजूरी जुना नगर मनमाड राष्ट्रीय हमरस्त्याच्या माध्यमातून किती अंतरावर बांधकामाची परवानगी देण्यात येते त्या नियमास धरुन आराखडा मंजूर केला काय?' - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.१०.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस देण्याचे नाकारले व अपिलार्थीस मंजूर नकाशाच्या प्रतींकरिता रु.८/- इतके शुल्क आकारले व या शुल्काचा भरणा अपिलार्थीने दि.२८.११.२००८ रोजी चलनाद्वारे भरुन सदर चलनाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १२.१२.२००८ रोजी सादर केल्यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती दि.१६.१२.२००८ रोजी पुरविली. तथापि यापूर्वीच अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ०५.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.१२.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०८.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि.२०.१०.२००८ रोजीच्या अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील त्यांना देय असलेली माहिती म्हणजेच, मंजूरीकरिता शिफारस करण्यात आलेल्या नकाशाची प्रत, अपिलार्थीस दि.१६.१२.२००८ रोजी सशुल्क पुरविली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात बांधकाम संदर्भातील प्राप्त प्रस्तावावर करावयाच्या कार्यवाहीची कार्यपध्दती आयोगास अवगत करताना असे सांगितले की, त्यांचे कार्यालय,नगरपालिका क्षेत्रातील कोणत्याही बांधकामास प्रत्यक्षात परवानगी देत नाही कारण बांधकाम परवानगीचे आदेश पारित करणारे ते प्राधिकरण नाही. बांधकामातील आराखडे मंजूर करण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित नगरपालिकेची असते. त्यांचे कार्यालय नगरपालिकेने त्यांच्याकडे संदर्भ केल्यासच फक्त त्यावर आपले शिफारसवजा अभिप्राय देत असते.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्रयस्थ पक्ष श्री. राजेंद्र सिताराम दिक्षीत यांच्या बांधकामाच्या मंजूरीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.१,४ व ५ या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी ती विसंगत असल्याने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेलीच माहिती अर्जदारास देण्यासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याइतपतच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१,४ व ५

द्वारे मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दलची कारणे व स्पष्टीकरणे अपेक्षिल्याचे दिसून येते. अशाप्रकारची माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेरची आहे. त्यामुळे या मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या कार्यपध्दतीचे जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले स्पष्टीकरण पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्षाच्या बांधकामाच्या आराखडयाच्या मंजूरीसंदर्भात माहिती हवी असल्याचे दिसून येते. मूळात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे कोणत्याही बांधकामास मंजूरी दिली जात नसल्याने, या मुद्यावरील माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांच्या कार्यालयाची कार्यपध्दती पाहिल्यास, देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दि.१६.१२.२००८ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ च्या माहितीसंदर्भात (अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी ती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती उघड करण्यास जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय नाही.) अपिलार्थीस अतिरिक्त माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने, जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थ पक्षाच्या बांधकामास मंजूरीची शिफारस त्यांनी ज्या छाननी अहवालाद्वारे केली आहे, त्या छाननी अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी जेणेकरुन अपिलार्थीच्या मनातील त्रयस्थ पक्षाच्या बांधकामाच्या मंजूरीसंदर्भातील आक्षेपाच्या निवारणास मदत होईल, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस अतिरिक्त माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने, त्रयस्थ पक्ष श्री. राजेंद्र सिताराम दिक्षीत यांच्या बांधकामाच्या मंजुरीच्या शिफारस प्रकरणातील छाननी अहवालाची प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ३१-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विजय बबन वाळुंज, आंबेडकरनगर, सुभाषनगर, कोपरगाव, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचनाकार, अहमदनगर यांना या निकालपत्रा- तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, नाशिक विभाग, नाशिक रोड, विभागीय आयुक्त कार्यालय, मध्यवर्ती इमारत, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/४९
निर्णय दिनांक ३१-०८-२००९

१. श्री. अभिजित सी पुप्पाल, अहमदनगर. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा व्हाईस चेअरमन, एसटी कास्ट स्क्रुटीनी कमिटी,नाशिक : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी, एसटी कास्ट स्क्रुटीनी कमिटी,नाशिक

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक विभाग,नाशिक

जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक विभाग,नाशिक

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०३.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अर्धवट माहिती पुरविली व दुष्ट हेतूने माहिती देण्याचे नाकारले व अपिलार्थीस अद्यापपावेतो कोणतीही माहिती न दिल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार शास्तीची कारवाई करण्यात यावी, याबरोबर त्यांनी आपल्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०९.०१.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ संशोधन अधिकारी,श्रीमती जे.एस.साने यांच्यासंदर्भात दि. ०१.०१.२००१ ते ०९.०१.२००९ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये प्रकरण क्र. ANG/COMP/01/07 प्रकरणी दिलेल्या आदेशाच्या प्रमाणित प्रती, जात पडताळणी समिती वापरत असलेल्या वाहनाच्या दि.०१.०८.२००८ ते ०९.०१.२००९ या कालावधीतील लॉगबुकच्या प्रती, समितीच्या उपाध्यक्ष व सदस्य यांच्या दि.०१.१०.२००८ ते ०९.०१.२००९ या कालावधीतील उपस्थितीची नोंद दर्शविणाऱ्या रजिस्टरच्या सत्यप्रती, श्रीमती जे.एस.साने यांना परवानगी प्रदान केलेल्या आदेशाची प्रत,सेवापुस्तिका,शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्राच्या प्रती, त्यांच्या नेमणूकीच्या आदेशाच्या प्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि.२३.०१.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती दिली व त्यांना माहितीच्या प्रतींचे शुल्क रु. ११३/- त्यांच्या कार्यालयात चलनाद्वारे भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०३.०२.२००९ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०८.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, आयोगासमोर त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दोन वेळा सुनावणी ठेवली होती, तथापि सुनावणीच्या या दोनही दिवशी अपिलार्थी अनुपस्थित राहिल्याने त्यांच्या प्रथम अपिलावर त्या निर्णय घेऊ शकल्या नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१, २ व ३ शी संबंधित माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस उघड करण्यास कोणतीही अडचण नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.४ द्वारे त्यांनी त्रयस्थ पक्ष श्रीमती जे.एस.साने यांच्यासंदर्भातील मागणी केलेली माहिती देखील सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाची जरी हरकत असली तरी, ती उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असणार नाही. कारण अपिलार्थीने या मुद्याद्वारे मागणी केलेली माहिती ही, श्रीमती जे.एस.साने यांच्या कोणत्याही वैयक्तिक बाबीशी संबंधित नाही. त्यांनी श्रीमती साने यांना कार्यालयाने दिलेले आदेश, दिलेले परवाने, त्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्राच्या प्रती, नेमणूकीचे आदेश, ही माहिती मागविलेली आहे. ही माहिती त्रयस्थ पक्षाच्या सेवाविषयक अथवा आस्थापनाविषयक अभिलेख्यांवर वेगवेगळया प्रकारे,वेगवेगळया नस्तीवर स्वतंत्रपणे उपलब्ध असते. तसेच या माहितीचे स्वरुप देखील खाजगी नसल्याने या मुद्यावरील माहिती देखील उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणताही प्रत्यवाय असू नये. या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.११३/- त्यांना त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सशुल्क पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सशुल्क पुरवावी.

**अहमदनगर**
**दिनांक : ३१-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अभिजित सी पुप्पाल,३०१,आदर्श क्लासिक, खिस्त गल्ली, अहमदनगर-४१४ ००१

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००९/रामाआ/अपील/सिआर/५३
निर्णय दिनांक ३१-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. रघुनाथ जगन्नाथ आंबेडकर,<br>रा. भाळवणी, ता.पारनेर,जि.अहमदनगर | : | अपिलार्थी |
| **विरुध्द** | | |
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा व्यवस्थापक,<br>संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास<br>महामंडळ मर्यादित, अहमदनगर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय अधिकारी,<br>संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास<br>महामंडळ मर्यादित, नाशिक | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२९.०४.२००९ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी हेतूपुरस्सर माहिती दिली नाही व संबंधित जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांनी पाठीशी घातल्याने या दोघांच्यावरही दंड लावण्याचे आयोगाने आदेश द्यावेत. अशाप्रकारच्या विनंतीबरोबर अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी या अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.११.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, चर्मकार विकास महामंडळांतर्गत सन २००६-०८ पर्यंतच्या कर्ज

प्रकरणासंदर्भात एकूण ५ मुद्यांद्वारे काही मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - अर्जदाराचे नाव, वय,जात व वर्ष, कर्जाचा प्रकार, रक्कम,प्रलंबित अर्ज व मंजूर प्रकरणांची संख्या, पात्रतेसाठी आवश्यक असलेल्या लाभार्थ्यांच्या वयाच्या निकषाबाबत शासन अध्यादेशाची प्रत, हे महामंडळ कोणत्या समाजाकरिता काय करीत आहे याचा लेखी खुलासा व प्रकरण प्राप्त करते वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने स्वीकारलेल्या कर्जदाराच्या वयाच्या पुराव्याच्या झेरॉक्स प्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून रजिस्टर्ड पोस्टाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२०.१२.२००८ व दि. २४.१२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०१.२००९ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीने त्यांच्याकडे झालेल्या सुनावणीमध्ये त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाल्याचे कबूल केल्याने, अपिलार्थीचे प्रथम अपील खारीज केले. तथापि हा निर्णय अपिलार्थीस मान्य नसल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०८.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विलंबाने माहिती पुरविली. त्यांना पुरविलेल्या माहितीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ५ द्वारे त्यांनी विचारलेल्या माहितीपैकी - " प्रलंबित अर्ज व मंजूर प्रकरणे व अर्जदाराकडून त्यांच्या वयासंदर्भात प्राप्त झालेल्या पुराव्याच्या झेरॉक्स प्रती" या मुद्यावरील माहिती त्यांना अद्यापही जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. त्यामुळे आयोगाने

त्यांना अर्धवट व विलंबाने माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार शास्तीची व शिस्तभंगाची कारवाई करावी असेही त्यांनी या युक्तिवादामध्ये पुढे स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २०.१२.२००८ रोजी व दि. २४.१२.२००८ रोजी अशा दोन टप्प्यात विनामूल्य पुरविली आहे. त्यांच्या विधानापृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. २ शी संबंधित दिलेली कथित माहिती आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या युक्तिवादाच्या पृष्ठयर्थ योग्य तो पुरावा आयोगाकडे सादर करता आलेला नाही. आज रोजी त्यांनी आयोगासमोर अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भातील माहिती त्यांना विनामूल्य हस्तांतरित केली आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे आयोगासमोर प्रतिपादन केले, तथापि यासंदर्भातील पुरावा ते आयोगास दाखवू शकले नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती दिली नसल्याचे अनुमान काढण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १४.११.२००८ रोजीच्या अर्जास प्रतिसाद देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सहा दिवसांचा विलंब लावल्याचे तसेच अपिलार्थीस त्यांनी विलंबाने व अपूर्ण माहिती दिल्याचे देखील वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने प्रतिसाद व अपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ३१-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. रघुनाथ जगन्नाथ आंबेडकर,मु. पो. भाळवणी, ता.पारनेर,जि.अहमदनगर

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय अधिकारी,संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, नाशिक या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२४५
निर्णय दिनांक  ३१-०८-२००९

१. श्री. मच्छिंद्र नामदेव भांड, : अपिलार्थी
रा. भांडेवाडी (कर्जत), ता.कर्जत,जि.अहमदनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, आष्टी, जि.बीड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, आष्टी,जि.बीड
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, आष्टी,जि. बीड
त्रयस्थ पक्ष : श्रीमती स्वाती बापू गावडे, श्री. काका किसन गावडे, श्रीमती कलावती नामदेव भांड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.११.२००८ रोजी फेर नोंदणी झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमाद्वारे केलेल्या माहितीसाठीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी दि. २१.०४.२००८ रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्या अपिलावर अपर जिल्हाधिकारी, बीड यांनी त्यांच्याकडील दि. २५.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे सूचना देऊनही तहसीलदार, आष्टी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार,आष्टी यांच्याकडे श्रीमती स्वाती बापू गावडे विरुध्द श्री. काका किसन गावडे यांच्या दिवाणी न्यायालयातील रे.मु.नं.११३/९३ मधील निकाल क्र.५५, दि.२९.०९.१९९४ च्या हुकुमनाम्यानुसार तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडून मोजणी झालेले दरखास्त व कब्जा वाटप प्रकरणी एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी,बीड यांच्याकडे दि.२१.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, अपर जिल्हाधिकारी बीड यांनी तहसीलदार, आष्टी यांना त्यांच्याकडील दि. २५.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज पाठवून अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेण्याचे सूचित केले. तथापि या अपील अर्जावर संबंधित तहसीलदार यांनी कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०८.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष श्री. काका किसन गावडे उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीने अर्ज करतेवेळी माहिती अधिकारी या पदावर तत्कालीन नायब तहसीलदार, श्री. संजय पवार (सध्या पुरवठा निरीक्षक/पुरवठा तपासणी अधिकारी

या पदावर जिल्हा पुरवठा कार्यालय,बीड येथे कार्यरत) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, आष्टी या पदावर श्री. पी.के.कुरुडे (सध्या तहसीलदार, रेणापूर,जि.लातूर) हे अधिकारी कार्यरत होते.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत होती. या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री मोठया प्रमाणात वळवावी लागत असल्याची कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही, तरीही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः कोणतीही माहिती पुरविली नाही व तदनंतर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावरही कडी करुन अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न करुन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती प्राप्त होण्यापासून, कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत त्यांना आवश्यक असलेली माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले आहे. हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना उपलब्ध न करुन, अपिलार्थीस अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळ वंचित ठेवण्याच्या कृतीद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले

आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,आष्टी,जि.बीड,श्री. संजय पवार (सध्या पुरवठा निरीक्षक/पुरवठा तपासणी अधिकारी या पदावर जिल्हा पुरवठा कार्यालय,बीड येथे कार्यरत) यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागणी केलेली माहिती प्राप्त होण्यापासून अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळ वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास जन माहिती अधिकारी जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी. संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना या आदेशाची प्रत तात्काळ हस्तांतरित करण्याची जबाबदारी सध्या कार्यरत असलेल्या जन माहिती अधिकारी यांची राहील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी श्री. संजय पवार (सध्या पुरवठा निरीक्षक/पुरवठा तपासणी अधिकारी या पदावर जिल्हा पुरवठा कार्यालय,बीड येथे कार्यरत)यांनी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांना एकूण

रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**अहमदनगर**
**दिनांक : ३१-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मच्छिंद्र नामदेव भांड,रा. भांडेवाडी (कर्जत), ता.कर्जत, जि.अहमदनगर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, आष्टी,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, आष्टी,जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२४६
निर्णय दिनांक ३१-०८-२००९

१. सौ. सुवर्णा सुरेश संगमकर, : अपिलार्थी
ता.संगमनेर,जि.अहमदनगर
२. श्री. सुरेश खंडूजी संगमकर,
ता.संगमनेर, जि.अहमदनगर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
संगमनेर, जि.अहमदनगर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
संगमनेर, जि.अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
संगमनेर, जि.अहमदनगर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१९.०६.२००८ रोजी नोंदविलेले सादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती ही भ्रष्टाचार दडविण्याकरिता व जाणूनबुजून नंतर कळविल्याचे त्यांना आढळून आले आहे. अपिलार्थीने वीज चोरी केली नसतानाही वीज चोरी केल्याचा खोटा बनाव करुन त्यांच्यावर वीज चोरी प्रकरणात कारवाई करण्यात आली, त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०७.०२.२००५ व दि.२६.१०.२००६ रोजी केलेल्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीविषयी व यासंदर्भात त्यांनी केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत आणि संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्याचे नाव आणि पदनाम मिळण्याविषयी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये अपिलार्थीस दि. ०७.०२.२००५ रोजी तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे व अपिलार्थीच्या दि. २६.१०.२००६ रोजीच्या तक्रार अर्जावर भरारी पथकाच्या कर्मचारी/अधिकारी यांनी दि. ११.११.२००६ रोजी केलेल्या कार्यवाहीची प्रत अपिलार्थीस पाठविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी,बीड यांच्याकडे दि.०१.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दि. २६.०३.२००८ पर्यंत अतिरिक्त माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. त्याप्रमाणे ही माहिती अपिलार्थीस दि. २८.०३.२००८ रोजी प्राप्त झाल्याची पोचसही जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली आहे. या माहितीने देखील समाधान न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३१.०८.२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास थोडक्यात विशद केली. त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने वीज चोरी प्रकरणी त्यांच्या कार्यालयाकडे दि. ०७.०२.२००५ व दि. २६.१०.२००६

रोजी तक्रार अर्ज केले असता, या तक्रारीच्या चौकशीच्यासंदर्भात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या कर्मचाऱ्यांनी संबंधित स्थळास भेट दिली असता, अपिलार्थी यांनी स्वतःच वीज चोरी केल्याचे त्यांना दि. १९.०६.२००७ रोजी आढळले. अपिलार्थीच्या वीज चोरी प्रकरणी प्रचलीत नियमानुसार पंचनामा देखील केला होता. तथापि त्याच दिवशी म्हणजे दि. १९.०६.२००७ रोजी अपिलार्थीने वीजचोरीपोटीची आकारणी रक्कम पूर्णपणे अदा करण्याचे लेखी हमीपत्र दिल्याने प्रथमतः एफ.आय.आर. नोंदविण्यात आला नाही. त्यांच्या या युक्तिवादाच्या समर्थनार्थ त्यांनी अपिलार्थीने वीज चोरी मान्य केल्याचे दि. १९.०६.२००७ रोजीचे पत्र आयोगास दाखविले. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती दि. २२.०१.२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती खोटी व चुकीची वाटत आहे. तथापि त्यांना प्राप्त झ ालेली माहिती खोटी व चुकीची कशी आहे,यासंदर्भात त्यांनी कोणताही पुरवा आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत, कोणत्याही युक्तिवादाद्वारे सादर केलेला नाही. याही उपर आयोगाकडे केलेले व्दितीय अपील श्री. सुरेश खंडुजी संगमकर यांनी केले आहे तर मुळ अर्ज व प्रथम अपील अर्ज सौ. सुवर्णा सुरेश संगमकर यांनी केल्याचे आयोगास आढळून आले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये ज्या व्यक्तिने प्रथम अर्जाव्दारे माहिती मागितली आहे त्याच व्यक्तिने या अर्जासंदर्भात प्रथम व व्दितीय अपील करणे अभिप्रेत आहे. अशा प्रकारे या प्रकरणी प्रथम अर्ज एका व्यक्तिने व नंतरची अपीले वेगळया व्यक्तिने केल्याने विचाराधीन अपील अर्जाचे पावित्र्य नष्ट होऊन आयोगाकडे श्री. संगमकर यांनी केलेला व्दितीय अपील अर्ज अवैध सिध्द होत आहे. हे

पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर**
**दिनांक : ३१-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सुवर्णा सुरेश संगमकर, रा. अकोले नाका, स.नं. ५५, भरीतकर मळा, मु.पो. ता.संगमनेर, जि.अहमदनगर

२. श्री. सुरेश खंडूजी संगमकर, रा. अकोले नाका, स.नं. ५५, भरीतकर मळा, मु.पो. ता.संगमनेर, जि.अहमदनगर

३. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

४. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,संगमनेर, जि.अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.